म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा क्र. १९०६६

# गूंजता हृदय है

IRBK-0119066
IRBK-0119066

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
क्रा. क्र. १००६८ नों. दि. २३/१/८२
वि. ....नाटक. क्र. ....................

नाटक
१९०६६
23/9/82

श्री. जयवंत दळवी यांच्या
'महानंदा' या कादंबरीवर
आधारित

# गुंतता हृदय हे...

शं. ना. नवरे

IRBK-0119066
IRBK-0119066

मॅजेस्टिक

महत्त्वाची जाणीव : या नाटकाचे पुनर्मुद्रण, प्रयोग, रूपांतर इत्यादी सर्व अधिकार सौ. अंजलि नवरे, 'सौमित्र', डोंबिवली (पश्चिम), जिल्हा ठाणे यांच्याकडे आहेत. प्रयोग करण्यापूर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास नैर्बंधिक इलाज केला जाईल.

नाट्य परीक्षण मंडळ यांनी प्रमाणपत्र क्रमांक डी आर एम् २३६/७४ खाली या नाटकास मंजुरी दिली आहे.

पहिली आवृत्ती :
सप्टेंबर १९७४
दुसरी आवृत्ती :
फेब्रुवारी १९७९

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका, मुंबई ४

मुद्रक :
अशोक केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ३०

मुखपृष्ठ :
अरुण घाटे

छायाचित्र :
राजदत्त

मूल्य : आठ रुपये

सुरुवातीस माझ्या नाटकाचे

दिग्दर्शक आणि आता स्नेही झालेले

*श्री. नंदकुमार रावते*

आणि

*सौ. सुनंदा रावते*

यांना............

—शन्ना

श्री. जयवंत दळवी यांची ' महानंदा ' कादंबरी प्रसिद्ध झाली आणि मी ती लगेच एका दमात वाचून काढली. पुस्तक मिटताना डोळे भरभरून आले होते.

माझ्या ' देवदास ' नाटकाच्या जातीतलीच ही प्रेमकहाणी. एक नाजूक प्रेमकहाणी मनाजोगी रंगमंचावर पाहायची माझी इच्छा अपूर्ण राहिली होती, ती पूर्ण करण्याची शक्यता मला ' महानंदा ' कादंबरीत आढळली. मी श्री. दळवींना म्हटले, "तुमच्या ' महानंदा ' वर नाटक लिहावं असं वाटतंय, तुमची परवानगी–" माझे वाक्य पुरे होण्याआधीच त्यांनी मोकळेपणी परवानगी दिली.

आकाशवाणीवर ' महानंदा ' अभूतपूर्वपणे गाजली. तसेच्या तसेच नाटक रंगमंचावर लगेच आणले असते तरी ते प्रेक्षकांना आवडले असते असे वाटत असूनही ' अभिजात 'चे श्री. अनंत काणे, नंदकुमार रावते, श्याम आडारकर यांनी ' महानंदा 'ची रंगावृत्ती पुन्हा नव्याने लिहिण्याची सूचना केली. मलाही तेच वाटत होते. नव्या हुरूपाने बैठक मारली. अनेकांशी अनेक वेळा चर्चा केल्या आणि हे नाटक मनासारखे लिहून तयार झाले. श्री. काणे यांनी नाटकाला नाव सुचवले ' गुंतता हृदय हे ... '. कादंबरीत आणि नभोनाट्यात मनू रेगे हे पात्र नव्हते, ते नाटकात आले. काही प्रसंगांचा क्रम बदलला गेला, काही प्रसंग नवे आले, तर काहीत बदल केला गेला. तयार रंगावृत्ती श्री. दळवींकडे मान्यतेसाठी दिली. त्यांनी मान्यता दिलीच, शिवाय कौतुकही केले. स्वतः उत्तम नाटककार असताना पूर्वी दिलेला शब्द पाळून मला त्यांनी आपल्या कादंबरीवर नाटक लिहायला परवानगी दिली, मनापासून कौतुक केले या गोष्टी मला अत्यंत मोलाच्या वाटतात. दळवींकडे मी आदर्श म्हणूनच पाहात आलो आहे, या प्रसंगाने तर त्यांच्याबद्दल मला किती वाटते ते लिहिणे कठीण आहे. त्यांचा मी ऋणी आहे.

चर्चेत बहुमोल सूचना केल्या सर्वश्री नंदकुमार रावते, अनंत काणे, श्याम आडारकर, शशिकांत राजाध्यक्ष, सिनेदिग्दर्शक वसंतराव जोगळेकर, डॉ.. काशिनाथ घाणेकर, विजय पितळे यांनी. त्यांचा मी आभारी आहे. तसाच श्री. राजा मयेकर यांचा. कल्याणीच्या तोंडी असलेली भाषा त्यांनीच 'गावाची ' केली.

आणखी आभार मानायचे ते ' अभिजात'च्या या नाटकातल्या पडद्यापुढील आणखी पडद्यामागील एकूण एक कलावंतांचे.

मराठी प्रेक्षकांना हे नाटक आवडावे अशी अपेक्षा आहे. कारण मुळातली दळवींची कादंबरीच इतकी गोड आहे.

दि. १०-८-१९७४ श. ना. नवरे

या नाटकाचा पहिला प्रयोग शनिवार, दि. १० ऑगस्ट १९७४ रोजी सायंकाळी सहा वाजता साहित्य संघ मंदिर, गिरगाव, मुंबई येथे 'अभिजात' या संस्थेने सादर केला.

**पात्र योजना :**

**बाबूल** : डॉ. काशिनाथ घाणेकर
**दमयंती** : नीना जोशी
**लखोबा** : गणा प्रधान
**मामा** : कमलाकर टाकळकर
**मामी** : सौ. मालती पेंढारकर
**मनू रेगे** : सतीश रणदिवे
**कल्याणी** : पद्मा चव्हाण
**महानंदा** आशा काळे
**सोमजी मास्तर** : राजा मयेकर

**दिग्दर्शक** : नंदकुमार रावते
**नेपथ्य** : श्याम आडारकर
**प्रकाश योजना** : बाब्रा पार्सेकर
**ध्वनिसंकलन** : अरविंद मयेकर
**ध्वनिमुद्रण** : शशांक लालचंद
**रंगभूषा** : शांताराम विचारे
**वेषभूषा** : कंक मॅन्सवेअर, मुंबई.
**निर्मिती व्यवस्था** : विजय पितळे
वामन शेळकर

**रंगमंच-व्यवस्था :**

अरुण भागवत
काशिनाथ समगिसकर
गफूर आणि मंडळी
प्रकाश सावंत
लक्ष्मण आंगणे
श्रीकांत रानडे
अरुण बांदेकर
मधू पवार
गजानन निकम
विठ्ठल चव्हाण

**व्यवस्थापक :**
विजय देसाई

**सूत्रधार :**
अनंत काणे.

गुंतता हृदय हे...

म. ... ालय शाखा.
क्रा. क्र. १००६६ २३/९/८२
वि. ....नाटक

# अंक पहिला

## दृश्य पहिले

[ गावचे रवळनाथाचे देऊळ. वेळ सकाळची. बस थांबल्याचा आवाज. क्षणभराने बाबूल हातात सामान घेऊन येतो. वयाने सेहेचाळीस-सत्तेचाळीसचा, पण अधिक म्हातारा दिसणारा. तो सामान ठेवतो. चपला काढतो. देवळात जातो. बाजूने दमयंती नाचत- बागडत येते. हातात फुलांची परडी. ती बाबूलची बॅग बघते. देवळाच्या ओवरीवर बसते. फुलांचा गजरा करू लागते. गाते : असा कसा देवाचा देव बाई टकडा ... मध्येच ती आत गाभाऱ्याकडे बघते. लखोबा येतो. खूप म्हातारा. बाबूलच्या सामानाला अडखळून पडतो. ]

**दमयंती** : ( हसत ) काय लखोबा, गडबडीत दिसतोएस ?...

**लखोबा** : हसायला काय झालं तुला ?

**दमयंती** : काही नाही. ( हसते. ) उगाचच.

**लखोबा** : तुझं हसणं ऐकायला टाईम नाही मला. आमचे धाकले धनी आलेत—

**दमयंती** : मनूकाकांनी बातमी दिली असेल ?

**लखोबा** : म्हंजी तुझ्यापर्यंत आली का बातमी ?

**दमयंती** : मनूकाका म्हणजे गावचं मुखपत्र. ( हसते. )— अंहं ! उगाच. तुझे धाकले धनी आत पाया पडायला गेलेत देवाच्या. बस. येतील.

**लखोबा** : त्यांचं सामान ?

**दमयंती** : अरे, त्यालाच अडखळून पडलास ना तू ? ( हसते. ) हे धाकले धनी म्हणजे ?

**लखोबा** : मामांचे भाचे. तिकडे पार लांब असतात. कालेजात मोठमोठी बुकं शिकवतात.

**दमयंती** : प्रोफेसर ?

**लखोबा** : असंच कायतरी म्हन्तात. रगड पगार आहे, राहायला हा एवढा

बंगला—(हात लांब करतो.)

**दमयंती :** अंहं ! हातात कसा मावेल ? (हसते.)

**लखोबा :** पण गावात आले, की पयलं पाऊल देवळात. मग मामांच्या घरी लहान होते तेव्हा इथल्याच साळंत होते. मनू रेग्याच्या बरोबर.

[गाभाऱ्यातून बाबूल बाहेर येतो. दमयंती खांबाआड लपते.]

**बाबूल :** कोण, लखोबा का रे ?

**लखोबा :** (रामराम करत) होय धनी.

**बाबूल :** मामी कशी आहे ?

**लखोबा :** आहे आपली.

**बाबूल :** गाव पार बदललं रे.

**लखोबा :** हो.

**बाबूल :** एस्. टी. नं आलो, पण तुझ्या सारवट गाडीची मजा नाही आली.

**लखोबा :** सगळं गेलं बघा.

**बाबूल :** वाटेत रावताचं भज्याचं दुकान दिसलं नाही, पूर्वीसारखं.

**लखोबा :** तिथं पिठाची गिरण पडलीय.

**बाबूल :** झालंच तर दुलाजीचं दुकान...

**लखोबा :** कधीच गेलं ते. सोसायटीचं गुदाम आलंय तिथं. भजी, लाडू मिळायचे तिथं लोक धान्याची कार्डे घेऊन उभे दिसतात.

**बाबूल :** (सुस्कारा सोडतो.) हं—

**लखोबा :** हे तुमचंच सामान. (सामान उचलतो. दमयंती त्याला मदत करते.)

**बाबूल :** हो ! सामान घेऊन तू हो पुढं. मी येतोच. जरा विश्रांती घेतो—

[लखोबा जातो. इतका वेळ दमयंती बाबूलकडे बघत असते, पण त्याचं लक्ष नाही. दमयंती पुढे होते.]

**दमयंती :** नमस्कार.

**बाबूल :** नमस्कार. (गोंधळून) कोण ग तू पोरी ?

**दमयंती :** मी ? मी दमयंती.

**बाबूल :** तूच गात होतीस ना गाणं ?

**दमयंती :** हो ! तुम्ही मामांचे भाचे. बाबूल ना ?

**बाबूल :** हो, पण—

दमयंती : तुम्हांला मी कधीच पाहिलं नाही. आई म्हणाली, तुम्ही खूप वर्षांनी येता आहात. किती वर्षांनी येताय हो ?

बाबूल : झाली वीसेक वर्षं.

दमयंती : वीस ? म्हणजे तेव्हा मी जन्माला देखील आले नव्हते ... तुम्ही मामींना भेटायला आला आहात ?

बाबूल : हो ! तुला कुणी सांगितलं ?

दमयंती : सांगितलं एका चिमुकल्या पक्ष्यानं.

बाबूल : तू लखोबाला ओळखतेस ?

दमयंती : हो ! तो येतो ना आमच्याकडे. पण असं का विचारलंत ?

बाबूल : म्हणजे लखोबानं तुला सगळं सांगितलं ! आणि म्हणे चिमुकला पक्षी !

दमयंती : ( हसते.) बरं बाई. म्हातारा पक्षी !

बाबूल : मामा वारले, आईचं पत्र आलं, एकदा मामींना भेटून जा.

दमयंती : हो, मामींना तेवढंच बरं वाटेल.

बाबूल : हो ना ! आता तीही थकलीय...बरंय. नाव काय म्हणालीस तुझं ?

दमयंती : दमयंती.

बाबूल : हो ! हे नाव मला फार आवडायचं. ( जाऊ लागतो. )

दमयंती : हे काय ? मी मुद्दाम तुमच्यासाठी थांबले होते.

बाबूल : माझ्यासाठी ?

दमयंती : हो ना. ( गळ्याला हात लावत ) खरंच.

बाबूल : का ग पोरी ?

दमयंती : तुम्हांला निरोप द्यायचाय माझ्या आईचा. तिनं तुम्हांला वरी बोलावलंय.

बाबूल : आधी मामींकडे जायला हवं. मग आहेच मी इथं चारेक दिवस.

दमयंती : पण आईनं तुम्हांला आत्ताच घेऊन यायला सांगितलंय.

बाबूल : आणि नाही आलो तर ग ?

दमयंती : तर— ( हसते.) काही नाही.

[ दोघे हसतात. ]

बाबूल : आई म्हणजे ?

दमयंती : माझी आई ?

**बाबूल :** हो, पण तिला काही नावबिव असेल ना ?
**दमयंती :** हो आहे ना. महानंदा.
**बाबूल :** ( दचकतो. ) महानंदा.

[ बाबूल अस्वस्थ होतो. मनात मागल्या आठवणी येऊ लागतात... काळोख. ]

## अंक पहिला

## दृश्य दुसरे

[ पहिल्या दृश्यापूर्वीचा वीसेक वर्षांचा काळ. मामांचे घर. अंगणात मामा लाकडे फोडत आहेत. मामा मध्यम वयाचे. बरेचसे अबोल. मामा घाम टिपतात. उरलेल्या लाकडांकडे बघतात. मामी आतून येतात. देहयष्टीने किरकोळ. त्या मामांकडे बघतात. क्षणभराने—]

**मामी :** बाबूल येणार आहे, माहीत आहे ना ? ( मामा गप्पच ) इथं लाकडं फोडत बसण्यापेक्षा बंदरावर गेला असतात, तर भाच्याला तेवढंच बरं वाटलं असतं. ( मामा बोलत नाहीत. ) बंदरावर लखोबा तरी गेलाय ना गाडी घेऊन ? ( मामा गप्पच ) इतका वेळ मी विचारतेय, एका प्रश्नाला तरी उत्तर द्यावं माणसानं !
**मामा :** हो !
**मामी :** हो काय ?—लखोबा गेलाय बंदरावर ?
**मामा :** गेलाय.
**मामी :** तुम्ही सांगितलं नसेल. तोच गेला असेल. बंदरावर जाताना त्या सटवीच्या पोरांना गाडीतून मिरवायला मिळेल ना ? म्हणून ही अक्कल. आता ती लाकडं राहू देत, म्हणते. घरात येऊन बसा. भाचा इतक्या वर्षांनी येतोय. बोला म्हणते काहीतरी. बोलून बोलून माझं तोंड दुखलं.

मामा : दुखणारच.

मामी : मला मेलीला लाज नाही म्हणून वाजवते मी तोंड. भाचा येणार, माणसानं घरात बसावं, त्याच्याशी दोन गोष्टी बोलाव्यात. सगळ्यांची चौकशी करावी. पण इथं कश्श्याचं काही नाही. भाचा तिकडे येऊ दे, नाही तर नको येऊ दे. ( बैलगाडी आल्याचा आवाज ) आला वाटतं लखो. तुम्ही आधी आत चला. कपडेबिपडे घालून—

मामा : ( अंगणाबाहेर बघत— ) लखोबा नाही. मनू रेगे.

मामी : मनू रेग्या ना ? वाटलेच. आमच्याच घरावरून नाचवत नेणार गाडी. दुसरे सगळे रस्ते दुरुस्तीला टाकले आहेत ना ? तीनशे रुपये घालून नवी जोडी घेतलीय बैलांची, ती दाखवतोय. दुसरं काय ? हा लखो नाहीतर आवडाच्या पोरांना खेळवत बसायचा आणि बंदरावर जायचं विसरायचा. ( बैलगाडी थांबल्याचा आवाज. बाहेर बघत— ) रेग्याचीच गाडी. म्हणावं, आमच्या घराला प्रदक्षणा घालत राहा दिवसभर.

मामा : इथंच येतोय—

[ मनू रेगे येतो. पोशाख ऐटबाज. वयाने तरुण. ]

मनू : काय मामा, बाबूल आला नाही अजून ? लखोबा गाडी घेऊन बंदरावर गेलाय ना ?

मामा : गेलाय.

मनू : मग एव्हाना यायला हवा बाबूल.

मामी : खळनाथाचं दर्शन घेऊन मग येईल वाटतंय.

मनू : वाः ! एवढा शिकलाय पण देवाला विसरला नाही.

मामी : देवाधर्माला विसरून कसं चालेल बाबा ?

मनू : नाहीतर मी देवळाकडे चक्कर टाकून येतो.

मामी : बस रे. येईल तो एवढ्यात. घरी सगळी बरी ?

मनू : बरी.

मामी : बायको कशी आहे तुझी ? मध्ये तब्येत ठीक नाही म्हणून ऐकलं होतं—

मनू : या अवस्थेत असं होणारच. ( हसतो. )

मामी : मोठी--मुलगी ना रे ?

मनू : हो.

मामी : किती वर्षांची झाली ?

मनू : अडीच. आता बघायचं पोरगा होतो का. इस्टेटीला वारस हवा.

[ मामा–मामी दोघे गप्प होतात. ]

मनू : काल मामा, तारीख होती कोर्टात.

मामा : हं.

मनू : बापूकाका एवढंसं थोबाड करून बसले होते. त्यांना आता तडजोड करून पाहिजे आहे.

मामी : मग कर की. सख्खा काका ना तुझा ?

मनू : मामी, कोर्टात कुणी कुणाचा काका नाही, बाप नाही, की भाऊ नाही. सगळे फायटिंग. कालचा धरून बारावा हेलपाटा पडला काकाला. ( हसतो. )

मामा : तुलासुद्धा तेवढेच हेलपाटे.

मनू : खरं सांगू, मामा ? आपल्याला बुवा कोर्टाचं व्यसन आहे. त्यासाठीच परवा बैलजोडी घेतली. अहो, नाहीतर या गावात वेळ घालवायचा कसा ? घरात मला काही बघावं लागत नाही. दुकानात मुनीम ठेवलाय, तो सगळं दुकान सांभाळतो. मग मला करायला दुसरं काय आहे ?

मामा : हं—

[ बैलगाडी थांबल्याचा आवाज. ]

मामी : आला वाटतं लखो.

[ लखोबा येतो. हातात ऐटबाज बॅग, पिशवी. सामान ठेवून पुन्हा बाहेर जातो. सामानाचा गोणता आणून ठेवतो. गोणत्यावर बाबूलचे नाव. मामांचा पत्ता. ]

लखोबा : आणले हो तुमचे भाचे.

मामी : मग आहे कुठं बाबूल ?

लखोबा : खळनाथाचं दर्शन घेऊन येताहेत. मला म्हणाले, तू हो पुढं, मी आलोच दर्शन घेऊन.

मामी : लहानपणापासूनची सवय आहे बाबूलची. ( मामांना ) ती काय सगळीच लाकडं फोडायची आहेत लगेच ? भाचा परत जाईपर्यंत सुद्धा आटपायचं नाही ते काम. पुरे झालं आता. ( लखोबा हसतो. ) तुला काय झालं दात काढायला ? बंदरावर गाडी घेऊन एकटाच गेला होतास की त्या आवडाच्या पोरांना—

लखोबा : माझीच पोरं ती.

[ मनू हसतो. ]

मामी : ते गावाला माहीत आहे सगळं. मी विचारतेय—

लखोबा : पोरांना घेऊन गेलो होतो बंदरावर. बोट बघून धाकटा तर नाचायला लागला.

मनू : नाचेल नाहीतर काय ? फुकटाची गाडी आणि फुकटाचा बाप.

लखोबा : पोरांना घरी सोडलं आणि आलो. आता पाव्हण्यांना पोचवायला जाईन तेव्हा नेईन पोरांना.

मामी : आधी येऊ तर दे बाबूल्ला.

लखोबा : चहाचं आधण ठेवा चुलीवर. आत्ता येतील ते.

[ मामी आत जातात. ]

मनू : तर काय लखोबा, विष्णु भावनाक कधी भेटला होता ?

लखोबा : रोजच भेटतो तो.

मनू : ( हसत ) आणि जगू गाडेकरसुद्धा यायला लागलाय म्हणे आताशा.

लखोबा : कुठं ?

मनू : तुझ्या आवडाच्या कोर्टात. तू फटिंग. तुला वाटतो, येतो माणूस तो केशी ऐकायला येतो. अरे, आवडाची पोरं यांना 'मामा मामा' म्हणतात त्याच्यावर जाऊ नकोस. काय मामा ?

मामा : हं —

मनू : नुसतं जज्जासारखं-'हं-हं' करू नका, मामा. तुमचा निकाल द्या. (मामा गंभीर) तर लखोबा, तू बाबा सावध राहा हो.

लखोबा : खरं आहे. माझ्याहून तू वयानं मोठा. तूच शिकवायचंस मला. लहानपणी तुझ्या खांद्यावर खेळलो मी –

मनू : तसं नाही लखोबा. एक विचारू ? आवडाच्या अंगावर नवीन लुगडं आहे ना आज ?

लखोबा : ( गोंधळून ) आहे.

मनू : कुठून आलं ते विचार. काल माझ्याच दुकानातून विष्णु भावनाक घेऊन गेला.

लखोबा : गेला तर गेला. भाऊ काय बहिणीला काही देत नाही ?

मनू : फटिंगा, दिवाळी तोंडाशी आली आणि ह्या भावाला काय धीर धरवत नाही ? मामा, त्या विष्णु भावनाकाची बायको अंगावर चिंध्या वाळगते आणि आवडाच्या अंगावर कोरं लुगडं !

लखोबा : असू दे. असू दे.

मनू : तुझं काय जातं 'असू दे' म्हणायला ? उधारी माझ्या बोडक्यावर चढतेय. बघेन बघेन नाही तर एक दिवस त्याला कोर्टात खेचीन. हां –

[ एवढ्यात बाबूल येतो. तरुण, देखणा. ऐटबाज पोशाखात. ]

बाबूल : मामा—( मामांकडे बघून हसतो. मामा हसत नाहीत. ) काय मनू ? कसा आहेस ?

मनू : आहे तसाच आहे. तू बाकी आता पक्का मुंबैकर दिसायला लागलास. मामा, पाहिलंत का भाच्याला ?

मामा : ( बाबूलला ) बावीवर जाऊन हातपाय धू जा.

बाबूल : होय. ( बाजूच्या विहिरीकडे जातो. )

लखोबा ( आत बघत ) मामी, झाला का चहा ? पाव्हणे आलेत.

मामी : ( आतून ) झालाच बघ.

मनू : मामा, बाबूलकडे पाह्यल्यावर वाटतं, आपणसुद्धा चांगलं शिकायला पाहिजे होतं. फायनल झाल्यावर त्याच्यासारखा मुंबईला गेलो असतो, शिकलो असतो, तर बापसानं शाळा सोडून दुकानात घातलं ...

लखोबा : पण पैसा किती मिळतोय !

मनू : पैसा ? अर्धा उधारीत राहातो आणि मिळतो अर्धा, तो कोर्टात जिरतो.

[ बाबूल हातपाय धुवून येतो. ]

बाबूल : ( मनूला डोळा घालत ) मामा, हातपाय धुवून आलो हं. हे बघा. हात पुढे करतो. ( हसतो. ) माणूस कसा ? स्वच्छ पाहिजे. मामी कुठं आत आहे ? ( मामा गप्प. ) बघावं तेव्हा मामी चुलीशी आणि मामा लाकडाशी. ( आत जात हाक मारतो. ) मामी—

[ मामी बाहेर येते. ]

बाबूल : मामी, मी आलोय.

मामी : तेवढं दिसतंय मला. केव्हा आलास रे ?

बाबूल : हा आत्ताच येतोय.

**मामी** : त्रास झाला बोटीचा ?

**बाबूल** : नाही. या लखोबाच्या गाडीचा मात्र झाला. गाडीत ही पोरं भरलेली. कशी आहेस तू ?

**मामी** : माझं मेलीचं काय ?

**बाबूल** : तेच मेलं विचारतोय मी. ( हसतो. ) लखोबा, मामींची तब्येत काही ठीक दिसत नाही.

**मामी** : आता या वयात काय तब्येत सुधारणार ? माझी लाकडं केव्हाच गेली आहेत.

**बाबूल** : अंहं ! इथंच आहेत !–मामा–मामा तसे ठीक दिसताहेत.

**मामी** : आधी बस बघू. पण थांब, हातपाय धुतलेस ना ?

**बाबूल** : वा ! ते तर आधी आटपलं !

**मामी** : हो, नाहीतर तेवढ्यानंच तुझे मामा डोकीत राख घालून घ्यायचे.

**मनू** : मामी, चहा झालाय ना ?

**मामी** : तर ? आत चला आता.

**बाबूल** : ( मामांना ) चला मामा चहाला. ( मामा लक्ष देत नाहीत. ) नाहीतर मामी, चहा इथंच घेऊ अंगणात, मामांच्या बरोबर. काय मामा ?

[ मामी आत जातात. ]

**बाबूल** : मनू, कसं काय चाललंय तुझं ?

**मनू** : ठीक.

**बाबूल** : दुकान ?

**मनू** : वा ! आहे ना. छान चाललंय.

**लखोबा** : उधारी आहे भरपेट–

**मनू** : लखोबा, तू आत जा. मामींना जरा मदतबिदत कर–

[ लखोबा आत जातो. ]

**मनू** : या मामा—( मामा गप्प. )

**बाबूल** : मामा, ही लाकडं सागाची का हो ?

**मामा** : नाही.

**बाबूल** : देवदार, चंदनबिंदन इथं नसेल, नाही ?

**मामा** : नाही.

बाबूल : जंगली लाकडं आहेत ?

मामा : हं—

बाबूल : पाहिल्याबरोब्बर ओळखलं मी. ( हसतो. )

[ मामी चहा आणतात. ]

मामी : ( मामांना ) या आता. चहा आणलाय बाहेर.

[ बाबूल आणि मनू कप घेतात. बाबूल मामांना कप देतो. ]

मनू : तुम्ही नाही चहा घेत मामी ?

मामी : अंहं ! संध्याकाळी चहा घेतला तर रात्रभर झोप येत नाही.

बाबूल : कमाल आहे ! मुंबईच्या माणसांना चहा घेतला नाही तर झोप येत नाही !

बाबूल : चहा झकास झालाय नाही, मामा ?

मामा : हं. ( बशीने चहा पिऊ लागतात. )

बाबूल : नुसता कपानं घेऊन पहा. घोटाघोटानं.

मनू : काही प्यावं. पण कसं ? घोटाघोटानं.

[ मामा चहा पटकन संपवतात आणि कपबशी घेऊन विहिरीच्या बाजूला जातात. ]

मामी : तू एमे झालास ना रे ?

बाबूल : हो.

मामी : मग आता काय करणारेस ?

बाबूल : कॉलेजात नोकरी घेतलीय.

मामी : बरं आहे. मोठा हो, नाव काढ. पोरानं नाव काढलं, की आईबापांना बरं वाटतं. ( सुस्कारा सोडतात. ) मला मुलगा असता, तर तो तुझ्याएवढाच असता आज. चांगला शिकला असता. ( उठतात. कपबशा घेऊन आत जातात. )

मनू : आपण एका शाळेत होतो इथं. आज तू एमे झालास. आम्ही काय ? फटिंग ! ( हसतो. ) फटिंग म्हणजे कळलं ना ?

बाबूल : हो ! फटिंग म्हणजे मनू रेगे. ( दोघे हसतात. )

[ मामा कपबशी विसळून आणतात. तिथे आणून खाली ठेवतात आणि पुन्हा जाऊ लागतात. ]

बाबूल : आता कुठं निघालात मामा ?
मामा : माडांकडे पाहून येतो. (जातात.)
मनू : किती दिवस मुक्काम आहे ?
बाबूल : दिवाळी झाली की निघणार.
मनू : राहा की आणखी. तिकडे मुंबैला वाट पाहायला कोण आहे ? लग्नबिग्न केलं नाहीस ना ?
बाबूल : अंहं !
मनू : हे चांगलं. मुंबैला काय सगळीच चैन. जन्मभर लग्नाशिवाय राहिलास, तरी कशासाठी अडायचं नाही. (हसतो.)
बाबूल : तुझ्या लग्नाला किती वर्षं झाली ?
मनू : चार. तेवढ्यात एक पाळणा हलला, दुसरा करायला टाकलाय. (बाबूल हसतो.) हसतोस काय फटिंगा ? इथं गावात वेळ काढायला दुसरं साधन काय ? आहे तीच गंमत पुन्हा पुन्हा करायची. कधीकधी कोर्टाच्या कामासाठी शहरात राहायला मिळालं तर, दुसरी काय गंमत मिळेल तीच. बाकी आता गावात सुद्धा एक गंमत आहे.
बाबूल : कसली रे ?
मनू : आहे. केस दाखल केलीय त्या कोर्टात. नुसत्या तारखा पडताहेत सध्या. केस केव्हा उभी राहातेय पाहायचं.
बाबूल : कसली केस ?
मनू : फार नाजुक आहे. खिशाचं तोंड उघडं ठेवून जज्जाकडे फेऱ्या मारतोय.
बाबूल : म्हणजे ?
मनू : एवढा मुंबईत शिकलास पण फुकट. आपली कल्याणी माहीत आहे तुला ? —देवळातली भावीण रे—
बाबूल : लहानपणी पाहिली होती माझ्या ! तिच्याशी तू आत्ता जमवतो आहेस की काय ?
मनू : हँ ! मामीच्या वयाची ती ! मी बोलतोय तिच्या मुलीबद्दल. दिसायला अशी फक्कड आहे, सांगू ! काय तिचं रूप, काय तिचा तोरा ! नुसती तिनं नजर टाकली, तर काळीज हे असं थाड् थाड् उडायला लागतं.
बाबूल : असं ?—नाव तरी काय ह्या सुंदरीचं ?

मनू : महानंदा ! तोंडात नाव आलं तरी साखरेची चव घेऊन येतं ! तुझा मुक्काम आहे ना इथं ? एकदा तुला ह्या देवीचं दर्शन घडवतो, मग सांग—

[ एवढ्यात मामी बाहेर येतात. ]

मामी : कशाबद्दल विचारत होतास रे बाबूलला ?

मनू : ( उठत ) काही नाही. जरा खाजगीच विचारत होतो. बरंय. येऊ मी ? आता आहेसच तू इथं—

बाबूल : बरंय.

मनू : बरंय मामी. ( इतक्यात मामा तोंड पुसत येतात. आत जाऊ लागतात. ) बरंय मामा.

मामा : हं. ( आत जातात. )

[ मनू जातो... ]

मामी : ( बाबूलचे सामान पाहून ) हा लखो कुठं गेला ? हे तुझं सामान इथंच पडलंय बघ.

बाबूल : आतच गेला होता.

मामी : म्हणजे मागल्या दारानं पळाला तो–सटवीकडे.

बाबूल : ही कोण सटवी ?

मामी : आवडा. ही सटवी आहे पस्तीस वर्षांची. तिला नवऱ्यानं टाकलीय. आणि गावानं ठेवलीय. या लखोची लाकडं गेली मशणात. लग्न करायचं त्यावेळी पळून गेला. आता हे थेर करतोय.

बाबूल : आता कशाला हवंय ह्याला लग्न ?

मामी : अरे, लग्न कुठं केलंय ? हा जातो आणि तिला नुसता बघत बसतो टकमक. हा नसताना तिथं दुसरी माणसं येऊन जातात. त्यातलाच एक विष्णु भावनाक. आणि आताशा म्हणे जगू गाडेकरसुद्धा जातो. थोरली मुलगी झालीय ती हुबेहूब विष्णुसारखी आणि पोरगा झालाय तो गाडेकरासारखा. तिरळा आणि रंगानं शाळीग्राम. हा लखो ? ती आपलीच पोरं म्हणून घेऊन नाचतो. अख्खा गाव हसतो, पण ह्याला त्याचं काही नाही.

बाबूल : काम तरी नीट करतो ना इथं ? आई नेहमी नावाजत असते.

मामी : रामा शिवा गोविंदा ! ( बाबूलचे सामान दाखवत ) हेच काम बघ ना त्याचं ! काडीएवढं लक्ष नाही त्याचं कामावर. एक काम शंभर वेळा सांगावं

लागतं. पूर्वी विश्वासानं लखोबावर घर सोडत होते मी. पण आता सोय नाही नारळ म्हणू नको, लाडू म्हणू नको, फडकं म्हणू नको, उचलतो आणि त्या सटवीची भर करतो !

**बाबूल :** त्यापेक्षा बायकोपोरांना इथंच का आणून ठेवत नाही तो ? मागल्या पडवीत ?

**मामी :** अरे, असं म्हटलं कधी तर लगेच मिजास. म्हणतो, ती नाही यायची दुसऱ्याच्या दारात. हो, ती कशी इथं येईल ? तिला लखोबा हवा नुसता पोटापाण्याला आणि धंद्यासाठी हवा विष्णु भावनाक आणि जगू गाडेकर. इथं आली तर तिचा तो धंदा कसा चालेल ?

**बाबूल :** हो. म्हणजे स्वार्थत्यागाचा धंदा आहे. आवडाचा स्वार्थ आणि लखोबाचा त्याग !

[ मामा आतून कपडे करून येतात. हातात काठी. ]

**बाबूल :** बाहेर निघालात ?

**मामा :** हो.

**बाबूल :** थांबलात पाच मिनिटं तर मीसुद्धा येईन तुमच्याबरोबर.

**मामा :** नको.

[ मामा बाहेर जाऊ लागतात. चपलांचा करकर आवाज होतो. ]

**बाबूल :** मामा, या चपला नवीन का ? ( मामा उत्तर न देता जातात. )

[ क्षणभराने— ]

**बाबूल :** गेलो असतो जरा मामांबरोबर. जाताना गप्पा झाल्या असत्या.

**मामी :** ते गप्पा मारणार ? वाट बघ. त्यांना इथं नाही कंठ फुटत.

**बाबूल :** म्हणजे ?

**मामी :** मी दिसते ना इथं ?

**बाबूल :** मामा रोज जातात फिरायला ?

**मामी :** तर ? दर्शन व्हायला नको रोज ?

**बाबूल :** तू नाही जात त्यांच्याबरोबर ? ( मामी गप्प. ) ( उठतो. बॅग घेऊन आत जाऊ लागतो. ) कपडे बदलून फिरून येईन म्हणतो जरा.

**मामी :** कुठपर्यंत जाणार ?

**बाबूल :** अं ? जाईन खळनाथाच्या देवळापर्यंत.

**मामी** : अरे, येताना तर दर्शन घेऊन आलास ना ?

**बाबूल** : आता जातोय जरा पाय मोकळे करायला.

**मामी** : जा. पण काठी घे हातात आणि पायाखाली बघ. आता पाणी आटतंय. जीवजिवाणु बाहेर पडणार.

**बाबूल** : तू येतेस ?

**मामी** : नाही रे बाबा. आमच्या कर्माला लागलीय चूल. नारळ ने एक देवापुढे ठेवायला. देवाला गाऱ्हाणं घाल. अगदी चांगली मनासारखी बायको मिळू दे. म्हणजे ती सुखी होईल आणि तू देखील सुखी होशील.

**बाबूल** : बरं. बरं. ( दारात थबकतो. ) आणि देव चुकून प्रसन्न झाला आणि तिथल्या तिथंच त्यानं बायको दिली, तर तिला घेऊनसुद्धा घरी येतो.

[ काळोख ]

## अंक पहिला

## दृश्य तिसरे

[ रवळनाथाचे देऊळ. आत गाभाऱ्यात काळोख. समईचा मंद प्रकाश. कल्याणी लामणदिव्यात वाती लावत आहे. वाती लावून झाल्यावर ती तिथल्या खांबाला तेलाची बोटं पुसते. पुढल्या ओसरीवर येते. बाबूल गाभाऱ्यातून दर्शन घेऊन बाहेर येतो. जाऊ लागतो. ]

**कल्याणी** : आवस बरी आसा रे ?

**बाबूल** : होय.

**कल्याणी** : मी कल्याणी. देवाची भावीण. तुजा नाव बाबूल ना रे ?

**बाबूल** : होय.

**कल्याणी** : तू नाय माका वळखणार. तुजी आवस ओळखता ! नुसता कल्याणी भावीण म्हणून सांग. म्हंजे चटकन ओळखतली ! आता मुंबैकरीण झाली.

मोप हसते का नाय ? ( हसते. ) खूप हसायला, बोलायला पायजे तुज्या आवशीक. तुज्या मामाचीच भैण.

[ कल्याणी चांदीचे तबक घेऊन पुढे येते. बाबूलपुढे ठेवते. तबकात एक विडा. वेलचीचे बोंड. ]

**बाबूल :** हे काय ?

**कल्याणी :** हो आमचो धर्म. आमच्या जिवात जीव आसा तोवर करणार. आताच्या मुली खंय करतंत ? आताच्याकनी लगीन होयां. नरकाची लक्षणां ! भाविणीच्या पोरीनं देवाचे पाय सोडून लगीन केला, तर देव डोळे नाय फोडतलो आमचे ? खरा का नाय ?— ( बाबूल गोंधळतो. ) विडो घ्या. आमचा घराणा पूर्वापार तुमच्या मामाच्या घराण्याक लागलेला. विडो देवचो आमचो धर्म. तुमी तुमच्या मर्जीनं आणो, दोन आणे ठेवा.

[ बाबूल भीतभीत विडा तोंडात टाकतो. एक अधेली तबकात ठेवतो. ]

**कल्याणी :** अधेली ? ( हसते. ) अग्गे माझे बाये ! तुमी भाव किती ?

**बाबूल :** दोन.

**कल्याणी :** आणि भैणी ?

**बाबूल :** दोन.

**कल्याणी :** लग्नं झालीत ?

**बाबूल :** थोरल्या बहिणीचं झालंय.

**कल्याणी :** बरा जांव !

[ क्षणभर कुणीच बोलत नाही, कल्याणी बाबूलकडे बघते. हसते. ]

**कल्याणी :** तुका बोलाक नको. कोणाची रे बड इली ? बापसाची ? ( बाबूल किंचित हसतो. ) तुज्या आवशीक तर खिदळाक व्हया. ( हसते. ) लहानपणापासून माजी हयात गेली तुमच्या घरात ! तुज्याच आज्यान् आमका लहानाचा मोठा केला. कुणी ? मामाच्या बापसान ! देवमाणूस रे. आणि मामा म्हणून काय ? तेचोच नमुनो. तू नसशील पाहिलं आज्याला.

**बाबूल :** नाही पाहिलं.

**कल्याणी :** तुज्या आवशीचा लगीन झाला आणि दोन वर्सान गेलो. तुज्या आवशीच्या लग्नाक मी तिची पाठराखीण होतंय. तीन दिवस लग्नाचो बोवाळ.

जेवणाच किती झाली. अख्खो गाव जेवणाक. पालखीतून वरात गेली. सतरा वर्साची होती तुजी आवस. किती तेजवान दिशी होती? तिचो आंबाडा घालूची, दागिने बघूचे, शालू संभाळूचो— सगळी कामां माज्या अंगावर. लगीन झाला, तर आज्यान जरीकाठाची पैठण अंगावर टाकली. कालपरवापर्यंत नेसले. आता अगदी रे बोंदार झाला. आता तुज्या लग्नात. चुकवू नको रे. सांग आवशीक.

बाबूल : ( उठत ) सांगेन. ( जाऊ लागतो. मागून कल्याणी येते, बोलत. )

कल्याणी : चललंय घरांक ?

बाबूल : होय.

कल्याणी : किती दिवस रवतलंय ?

बाबूल : दहापंधरा दिवस राहीन. जत्रा–दिवाळी करून जाईन.

कल्याणी : जाताना कळव हां. लख्याक सांग. तुज्या आवशीक भेट देईन. बरोबरची रे ती. एकत्र खेळलो आमी.

बाबूल : हो कळवीन.

[ दोघे जात आहेत. देऊळ मागे पडते. रस्ता चालू ]

कल्याणी : मामी बरी आसा ना ?

बाबूल : होय, आहे बरी.

कल्याणी : तिच्या जिवाक हल्ली बरा नाय रे! आडदांड बाई. आता सामकी सुकान गेली. पदर धरीना तेची खंत, तिची तरी काय चूक? मामांच्या पाठी विस्टेटीक मालक नको? पूर्वापारची वतनवाडी काय वाऱ्यावर टाकून देवची आसा? पण बरी आसा ना ?

बाबूल : आहे बरी.

कल्याणी : असो बापडी. तिका येवन बघूचा बघूचा म्हणतंय. पण देवळातल्या कामान जमाना. मानूक जा म्हटला तर ती कधी जाता बघया.

[ रस्त्यावर कल्याणीचे घर येते. कल्याणी थांबते. ]

कल्याणी : ह्यां माझा घर. ( बाबूल क्षणभर थांबतो. ) ये ना आत.

[ कल्याणी आखंडा दूर करते. आत जाताना ' मानू गो '— अशा हाका मारत जाते. बाबूल थांबलेलाच. ]

बाबूल : मानू?

**कल्याणी :** ( आत जाता जाता ) मानू म्हंजे माझा चेडू... माझी मुलगी. महानंदा. ( आत जाते. )

[ बाबूल स्वतःशीच ' महानंदा ' असे पुटपुटतो. मनू रेगेबरोबरचे बोलणे त्याला आठवते. तो परत जाण्यासाठी वळतो.

एव्हापर्यन्त दुरून ' असा कसा देवाचा देव बाई ठकडा ' या गाण्याची ओळ ऐकू येते. बाबूल आखंडा ओलांडून जाणार एवढ्यात महानंदा येते. तिच्या हातात फुलांची परडी. महानंदा पटकन आखंडा काढते, बाबूल धडपडतो. दोघांची ' टक्कर ' होते. दोघे एकमेकांकडे पाहातात. प्रथमदर्शनी प्रेमाचे अंकूर दोघांच्याही मनात उगवतात. क्षणभराने— ]

**बाबूल :** आता पडलो असतो म्हणजे ? ( महानंदा गप्प ) काय ? बोल ना आता.

[ महानंदा खुणेने आपल्याला बोलता येत नाही असे दाखवते. ]

**बाबूल :** बोलता नाही येत ?

**महानंदा :** ( अंहं ! )

**बाबूल :** ( दुःखित होत ) लहानपणापासून ?

**महानंदा :** ( हो. अगदी एवढीशी होते तेव्हापासून )

**बाबूल :** पण आत्ता गाणं कोण म्हणत होतं ? ' असा कसा देवाचा देव बाई ठकडा ? '

**महानंदा :** ( कोण जाणे )

**बाबूल :** कुठे राहातेस तू ?

**महानंदा :** ( त्या तिकडे—लांब )

**बाबूल :** कल्याणीला भेटायला आली आहेस ?

**महानंदा :** ( नाही )

**बाबूल :** महानंदेला ?

**महानंदा :** ( छट )

**बाबूल :** मग कुणाला ?

**महानंदा :** ( तुम्हांलाच. )

[ बाबूल गोंधळतो. महानंदा हसते. एवढ्यात आतून कल्याणी येते. ]

**कल्याणी :** खंय गेला ह्या प्वार ? जरा म्हणून ह्येंचो पाय घरात नाय. ( महा-

नंदेला ) मी तुका शोधतंय आत. खंय गेललंस गो ?

**महानंदा :** फुला आणूक...

[ महानंदा बोलताना पाहून बाबूल दचकतो. महानंदा हसते. ]

**बाबूल :** ( कल्याणीला ) ही ?

**कल्याणी :** मानू. महानंदा.

**बाबूल :** ( आश्चर्याने ) महानंदा ?

**महानंदा :** हो ! का ?

**कल्याणी :** आणि हो बाबूल. मामांचो भाचो गो ! ( बाबूलला ) घरात ये ना. ( महानंदेला ) अगो त्येका बसूक तरी सांग.

**बाबूल :** अं ? नको. इथंच छान वाटतंय. ( महानंदाकडे बघतो. ती हसते. )

**कल्याणी :** अरे, घर तुजाच आसा. तुमच्या कृपेनंच आमी जगतंव. बस. च्याचा पाणी ठेवतंय. ( महानंदा आत जाऊ लागते. ) अगो, अगो, तू लाजून पळतंस खंय ? तो काय आमका परको नाय, दुर्गीचो झील तो. दुर्गीचा घरचा नाव पद्मावती नाय रे ?

**बाबूल :** हो. चांगलंच लक्षात आहे.

**कल्याणी :** ( हसत ) लक्षात नसूक काय झाला ? किती गोड नाव— ( महानदेला ) थांब गो तू. मी चा आणतंय—

[ कल्याणी आत जाते. महानंदा उगाचच आत जाण्याचे नाटक करते. ]

**बाबूल :** ( चिडवत ) अगो, अगो, लाजून पळतंस खंय ? मी काय परको नाय. दुर्गीचो झील मी. थांबशील तर खरी.

**महानंदा :** कशाला ?

**बाबूल :** उगाच.

**महानंदा :** उगाच असेल तर नाही थांबणार.

**बाबूल :** मग कशासाठी ?

**महानंदा :** अं ! तुमच्याशी बोलायला.

**बाबूल :** मग आपल्याला बोलता येत नाही म्हणून का म्हणालीस मघाशी ?

**महानंदा :** मी कुठं म्हटलं ? मी नुसत्या खुणा केल्या.

**बाबूल :** परक्याला अशा खुणा करत नाहीत.

महानंदा : त्याला कळत असतील तर करतात. ( चिडवत ) आणि तुम्ही काय परके नाय. दुर्गीचे झील तुम्ही. वाटेल त्याला नाही मी खुणा करत. माणूस बघून—

बाबूल : ( एकदम ) मनू रेगे येतो ना इथं ?

महानंदा : ( मुद्दाम ) हो. रोज येतो.

बाबूल : कशाला ?

महानंदा : वाटतं म्हणून येतो. येताना दुकानातून कापडं आणतो. लुगडी आणतो. झालंच तर—

बाबूल : तुझ्यासाठी ?

महानंदा : ( मोठ्याने हसते. ) आणतो बापडा. आपण कोण सांगणार, आणू नका म्हणून ? ( बाबूल अस्वस्थ होतो. महानंदेला गंमत वाटते. ) त्याला सांगू, येऊ नका; तुम्हांला आवडत नाही ?

बाबूल : माझ्या आवडण्याचा काय प्रश्न आहे ?

महानंदा : मग रागावलाय कशाला ?

बाबूल : मी कुठं रागावलोय ? मी नुसती चौकशी केली.

महानंदा : ( हसते. ) नुसती चौकशी ? मग हरकत नाही. आत्तादेखील येईल तो.

बाबूल : ( उठतो. ) मग मी जातो.

महानंदा : का ? बसा ना.

बाबूल : माझी कशाला अडचण उगाच ? तो येणार. तुझ्याशी गोडगोड बोलणार, तुला काही भेट देणार.

महानंदा : पण मी त्याच्याकडून काही घेते का ?

बाबूल : असशील घेत.

महानंदा : हीच परीक्षा केलीत एवढ्यात ?— मी त्याच्या वाऱ्यालासुद्धा उभी राहात नाही. तो येतो. आईशी बोलत बसतो. बोलावंच लागलं मला, तर मुद्दामच विचारते : तुमची बायको कशी आहे ? मुलगी कशी आहे ? मला ठेवायला बघतोय. भाविणीची मुलगी ना मी ?

[ कल्याणी आतून ' मानू गो ' करत बाहेर येते. हातात दोन कप. ]

कल्याणी : ( महानंदेला कप देत ) ही त्येका.

महानंदा : माका नाय च्या ?

कल्याणी : थांब गो ! जरा वेळान कुणी इलो तर होतलोच चहा. तेव्हा घे.

[ महानंदा आणि बाबूल 'मनूच्या' आठवणीने एकमेकांकडे बघतात. बाबूल महानंदेला खूण करतो. आपल्या कपातला चहा बशीत ओतून बशी महानंदाला देतो. ]

कल्याणी : बरो झालो च्या ? घड दिसता खंय माका ? जमात तसो करतंय ! बरो झालो चा ?

महानंदा : ( बाबूल बोलायच्या आधीच ) बरो झालोसा !

कल्याणी : तेच्यातला कित्याक घेतलंस तू ? आत्ता मनू इलो असतो म्हणजे झालो नसतो च्या ?

बाबूल : कोण ? मनू रेगे ?

कल्याणी : तू वळखतंस त्येका ?

बाबूल : इथल्या शाळेत त्याच्याबरोबर शिकत होतो मी.

कल्याणी : बरो माणूस रे. येता, आमची चौकशी करता. ह्या लुगडा तेनीच आणून दिला. मानूक देत होतो पण हिला नाय आवडला. आताची शिकलेली पोरा. सत्राशे आवडी आणि निवडी. बिचारो परत नेय होतो लुगडां. मग म्हटला ठेव. मी नेसान.

[ महानंदा हसते. बाबूलकडे बघते. ]

कल्याणी : आता देवाची जत्रा इली तोंडर, जत्रा झाली की इलीच दिवाळी. तू आसस ना तंवसर ?

बाबूल : ( महानंदाकडे बघत ) असायलाच हवं. मामीचा पण आग्रह आहे.

कल्याणी : आता तू मुंबईक काय करतस ?

बाबूल : एम. ए. झालोय.

कल्याणी : म्हणजे खूप बुका झाली असतील.

बाबूल : मराठी घेऊन.

कल्याणी : मराठी बुका ?

बाबूल : हो.

कल्याणी : आमच्या मानूक बुका वाचूचो लई सोस.

बाबूल : वाः ! काय काय वाचलंस ?

महानंदा : मी ? उषःकाल— हरिभाऊ आपट्यांची कादंबरी.

बाबूल : छान.

कल्याणी : पण इकडे या गावात कसला काय वाचूक गावता ? मागे त्या पोस्ट-मास्तराकडून गावंत बुका—

बाबूल : ( किंचित दुखावलेला ) तो रोज आणून देत असेल.

महानंदा : ( ते समजून ) हो. रोज द्यायचा बिचारा, खूप हुशार होता. वाचायचा वाचायचा इतका की बोलून सोय नाही.

कल्याणी : ( अभावितपणे ) गावाची सगळी पत्रासुद्धा वाची तो. काय गो तेचा तो नाव ?

महानंदा : विसरलीस ? आपटे मास्तर नाही का ?

कल्याणी : हो ! आपटे मास्तर.

बाबूल : केवढा होता ?

महानंदा : तो ना ? अवघा अठ्ठावन वर्षांचा होता. ( हसते. )

बाबूल : म्हणजे फारच लहान होता !

महानंदा : हो ना ! लहानपणीच रिटायर होऊन गेला. आता लोकांची पत्रं वाचायला मिळणार नाहीत म्हणून इतकं दुःख झालं होतं त्याला !

कल्याणी : ( अभावितपणे ) होतालच गो. तर आपटो मास्तर गेल्यापासून हिचा वाचान बंद झाला.

बाबूल : माझ्याकडे इथं आहेत चारसहा कादंबऱ्या. हव्या आहेत ?

महानंदा : कुणाच्या आहेत ?

कल्याणी : ( अभावितपणे ) त्येच्योच असतल्यो ! इतकी बुका काय फुक्कट झाली !

बाबूल : फडक्यांच्या आहेत कादंबऱ्या. वाचल्या आहेस ?

महानंदा : त्यांची ' कुलाब्याची दांडी ' वाचलीय मी.

बाबूल : मग आता ' काश्मिरी गुलाब ' देईन. ( महानंदा हसते. )

कल्याणी : इथं या गावात काय नाय हो. पोरीची कसली म्हणून हौस भागणा नाय.

बाबूल : मग हिला मुंबईला पाठवा. ( महानंदाकडे बघतो. )

कल्याणी : आमच्या घराक मुंबई कशी झेपात बाबा ? देवाचे पाय सोडून आमी खंय जावचा ? ( उठून कपबशा आत घेऊन जाऊ लागते. )

बाबूल : ( महानंदेला ) तुला आवडेल मुंबईला जायला ?

महानंदा : खूप आवडेल.

[ कल्याणी थांबते. ]

कल्याणी : काय रे ?

बाबूल : कुठं काय ? काही नाही.

कल्याणी : मानू खूप आवडात असा काय म्हणाला ?

बाबूल : ऑं ?

महानंदा : ( पटकन ) कादंबऱ्या गे.

कल्याणी : हां. हां. ( आत जाऊ लागते ) रात्र होतां रे बाबा. तू जा आता! नायतर पायाखाली खंय जिवाणु-बिवाणुं— ( आत जाते. )

बाबूल : ( उठत ) बरं येतो.

महानंदा : उद्या याल ना ?

बाबूल : नाही. उद्या नाही जमणार.

महानंदा : ( नर्व्हस ) मग परवा ?

बाबूल : परवा ? अंहं ! परवा पण नाही जमणार.

महानंदा : ( खूप नर्व्हस ) मग केव्हा ?

बाबूल : पुस्तकासाठीच ना ? लखोबाबरोबर पाठवतो ना उद्या पुस्तकं.

महानंदा : आम्हाला नकोतच पुस्तकं.

बाबूल : मग काय हवंय ? सांग ना.

महानंदा : पाखराला बोलता येत नाही, माश्याला रडता येत नाही आणि मुलीला असं सांगता येत नाही.

बाबूल : असं म्हणजे ?

महानंदा : आम्हांला नाही माहीत. ( आत जायला वळते. )

बाबूल : महानंदा—

महानंदा : आता कशाला बोलावता ?

बाबूल : जवळ ये, मग सांगतो का ते.

[ महानंदा जवळ जाते. परडीतून गजरा काढते. ]

बाबूल : आता का आलीस ?

महानंदा : ( गजरा देत ) हा गजरा घ्यायला.

बाबूल : रागावलीस ?

महानंदा : हो. म्हणूनच तर दिला ना गजरा. रागवायचं ते आपल्या माणसावर रागवायचं असतं. तुम्हांला काय ? उद्या वेळ नाही ईथं यायला, परवा नाही, कधीच नाही.

बाबूल : मग आत्ताच राहू इथं ?

महानंदा : हं !

बाबूल : महानंदा !

महानंदा : गजरा आवडला ?

बाबूल : कोजागिरी होती. चंद्रानं सुवासिक चांदण्या खुडल्या आणि त्याचा केला एक सुंदर गजरा. आवडणारच तो.

महानंदा : चंद्रासकट ?

[ कल्याणी आतून 'मानू गो' अशी हाक मारते. ]

महानंद : आयलंय गे– ( बाबूलला ) लौकर सांगा. उद्या—

बाबूल : मी येतो पुस्तकं घेऊन.

महानंदा : ( मुद्दाम ) जमलं तरच या. नाहीतर लखोबाबरोबर ( बाबूल महानंदा-वर खोटाच रागावतो. ) नाही, नाही. उद्या नक्की या. मी आत्तापासूनच वाट पाहाते.

बाबूल : तुझं हे बोलणं—

महानंदा : आज पहिल्यांदाच सुचलं आयुष्यात.

बाबूल : खरं सांगतेस ?

महानंदा : आपली दोघांची शपथ.

बाबूल : आता जाऊ मी ?

महानदा : अंहं !

[ कल्याणी बाहेर येते. दुरून चपलांचा 'कर्रकर्र' आवाज. ]

कल्याणी : मानू, मामा इले गो.

बाबूल : ( दचकून ) कोण, आमचे मामा ?

महानंदा : आधी मागल्या दारानं पळा— (त्याचा हात धरून आत नेऊ लागते.)

[ का ळो ख... ]

# अंक पहिला

## दृश्य चौथे

[ दुसऱ्या दृश्यानंतर चार दिवस झाले आहेत. वेळ रात्री आठची. मामांच्या घराचे अंगण. अंगणात बाबूलने आणलेला गोणता. त्यात नारळ बांधलेले. मामी दारात उभ्या. ]

**मामी :** लखो, ए लखो.

[ लखोबा बाजूने येतो. ]

**मामी :** कुठं गेला होतास रे इतका वेळ ?

**लखोबा :** लेकरांना बघून आलो.

**मामी :** चांगलं आहे हो. बाबूलला येऊन चार दिवस झाले. त्याला काही हवं नको पाहायला इथं राहायचं तर—

**लखोबा :** लेकरं दृष्टीला पडली नाय तर चैन पडत नाय हो.

**मामी :** मग इथंच आणून ठेवीनास त्यांना ?

**लखोबा :** ती नाही यायची हो दुसऱ्याच्या दारात.

**मामी :** वाः ! केवढा मान !

[ लखोबा गोणत्याकडे जाऊ लागतो. ]

**मामी :** हा बाबूल फिरायला गेलाय. अजून कसा आला नाही ? रोज बघावा तर कालच्याहून आज उशीर !

**लखोबा :** मी जाऊ का कंदिल घेऊन ?

**मामी :** जा बाबा. देवळाकडे जातो म्हणाला होता. रात्रीची वेळ आहे.

[ लखोबा कंदिल लावतो. एवढ्यात बाबूल येतो. खूप खुशीत आहे. हातात पुस्तके. ]

**बाबूल :** लखोबा, पोरांकडे निघालास ?

**लखोबा :** तुम्हांलाच बघायला निघत होतो.

**मामी :** शंभर वर्षं आयुष्य आहे तुला. अजून आला नाहीस, तेव्हा मग लखोबाला सांगितलं.

लखोबा : ( मुंडाशाची चुंबळ करून डोक्यावर घेत ) जरा हात लावता का ?

बाबूल : माझी गोण घेऊन कुठं चाललास ?

लखोबा : गोण तुमची, पण आतले नारळ मामांचे आहेत.

बाबूल : मग आता असं विचारतो, माझ्या गोणीत मामांचे नारळ घेऊन कुठं चालला आहेस ?

लखोबा : ऑं ? सावकाराकडे. सावकाराकडे टाकतो नेऊन. उद्या पैसे आणायचेत.

[ बाबूल गोणीला हात लावतो. लखोबा गोण घेऊन जातो. ]

बाबूल : हा लखोबा सावकाराकडे गोण नेतो म्हणाला—

मामी : नेऊ दे.

बाबूल : पण हा बरोबर देईल ना नारळ ? नाहीतर त्यातले पाच नारळ काढील आणि देईल त्या आवडाबायला.

मामी : काय वाटेल ते करू दे. तू जेवणार आहेस ना ?

बाबूल : तशी भूक नाहीच. पोट खूप भरलंय.

मामी : कुठं गेला होतास ?

बाबूल : तिकडेच. देवळात.

मामी : नाही, हल्ली उशीर व्हायला लागलाय तुला—

बाबूल : अग, मनू रेग्याकडे गेलो होतो, तिथं उशीर झाला.

मामी : मनू रेग्याकडे ?

बाबूल : हो तिथंच तर खूप खाणं झालं.

मामी : पण तो तर मघाशीच गेला इथून.

बाबूल : ( सावरून घेत ) बघ. तो घरी भेटला नाही. त्याच्या बायकोला म्हटलं, मनू मामांच्याच घरी गेला असेल. तर म्हणाली, तिकडे नाही जाणार ते.

मामी : मनूला माहीत होतं, तू येणारेस ते ?

बाबूल : मनूला ना ? हो. हो. कालच म्हटलं होतं मी त्याला.

मामी : काल ? पण तो तर म्हणाला, गेले दोन दिवस आपली-त्याची भेटच झाली नाही म्हणून.

बाबूल : ( दचकतो ) कमाल आहे.

मामी : तसलाच आहे रे तो. एक नंबरचा थापेबाज. नुसत्या गप्पा ऐकून घ्या त्याच्या. झोटिंग तो.

बाबूल : ( स्वस्थ होत हसत ) अंहं ! फटिंग. शाळेपासून असाच.

[ स्तब्धता. ]

मामी : रोज देवळात जातोस. म्हटलं तुझं एवढं काय तिथं ठेवलंय ? काल तर सकाळीसुद्धा गेला होतास.

बाबूल : तिथं कुणीना कुणी ओळखीचं भेटतं. गोष्टी होतात. ( मामी त्याच्याकडे नजर लावून बघतात. ) खरंच, तुला सांगायचं राहिलं. परवा देवळात कल्याणी भेटली होती. ( मामी बोलेल म्हणून वाट पाहातो. मग ) आईच्या लग्नाच्या इतक्या आठवणी सांगत होती.

मामी : कोण ?

बाबूल : कल्याणी. ( मामी गप्प. ) इतकं एकेक सांगत होती—

मामी : चुलीवरलं आधण बघून येते हां. बस.

[ मामी आत जातात. बाबूल खिशातून गजरा काढून त्याचा वास घेतो. ' असा कसा देवाचा... ' हे गाणं गुणगुणण्याचा प्रयत्न करतो. मामा आतून येतात. बाबूल पटकन गजरा लपवतो. मामांचे लक्ष नाही. ते सरळ पुढे होतात. गोणता उचलून नेला आहे ते पाहातात. ]

बाबूल : नारळाची गोण ना ? लखोबानं नेली. ( मामा गप्प ) आज फिरायला नाही गेलात ? ( मामा काहीतरी काम काढतात. ) देवळात गेलो होतो.

मामा : हं !

बाबूल : तिथं कल्ल्याणीने विडा आणून ठेवला. ताटात आठ आणे ठेवले मी. कमी नाही ना झाले ?

मामा : ( पुढे जातात, हाका मारतात. ) लखोबा–

बाबूल : तो गोण घेऊन गेलाय सावकाराकडे.

[ मामा वळतात, लखोबाने ठेवलेला कंदिल बारीक करतात. आत जाऊ लागतात. ]

मामा : जेवलास ?

बाबूल : नाही. भूक नाहीए फारशी. तुमचं जेवण—

मामा : झालं. लौकर जेवून घे आणि झोप.

[ मामी बाहेर येतात तसे मामा आत जातात. ]

बाबूल : मामी ग, ती कल्याणी वयाच्या मानानं किती तरुण वाटते नाही ?
मामी : न वाटायला काय झालं ? सतरा पुरुष नाचवायचे, वाढेल कशाला वय ?
बाबूल : बोलकी वाटली चांगली.
मामी : त्यांच्या धंद्याला हवंच ते. (क्षणभराने आत बघून) आणखी काय म्हणत होती ?
बाबूल : कोण ?
मामी : तीच रे. ती सटवी.
बाबूल : कोण ? आवडा ?
मामी : नाही, कल्याणी. ती काय म्हणत होती आणखी ?
बाबूल : काही नाही. आईची चौकशी करत होती. आईची बाळमैत्रीण आहे ती.
मामी : हो, मैत्रीण म्हणे. कसली मैत्रीण ? उगाच नादाला लावणाऱ्या बाया रे त्या. माझ्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी इथं येते. निमित्त चौकशीचं. (हातावर हनुवटी ठेवून स्वस्थ बसतात.)

[ स्तब्धता. ]

बाबूल : मामी, गावात आणखी कुणी 'मामा' म्हणून आहेत ?
मामी : का रे ?
बाबूल : नाही, सहज विचारलं.

[ स्तब्धता. ]

मामी : कल्याणी ह्यांच्याबद्दल काही सांगत होती ?
बाबूल : (गोंधळतो) कुणाबद्दल ?
मामी : तुझ्या मामांबद्दल ?
बाबूल : काही नाही.
मामी : खोटं बोलू नकोस. माझ्या गळ्याची शपथ आहे तुला—
बाबूल : खरंच नाही ग. खरंच, ती मामांबद्दल काहीसुद्धा बोलली नाही. उगाच तू संशय घेतेस आणि अशी सुकत चाललीएस.

[ स्तब्धता. ]

मामी : ही पुस्तकं कसली ?
बाबूल : कादंबऱ्या आहेत. मनूकडून आणल्या आहेत परत.
मामी : मानूकडून ?

बाबूल : मानू ? मानू कोण ?

मामी : नाही, कुणी नाही. मला आपलं वाटलं—

बाबूल : अग, आपला मनू रेगे नाहीए का ? त्याच्याकडून. (उठतो.) पुस्तके ठेवून येतो. उद्या दुसरी नेऊन द्यायची आहेत. (मामीजवळून जाऊ लागतो.)

मामी : छान जुईचा वास आला बघ. जुईचा गजरा जवळ असावा, तसा.

बाबूल : (गोंधळतो) जुईचा गजरा ? छेः ! मला नाही बुवा वास आला.

[ आतून मामा येतात. आता अंगात शर्ट आहे. हातात काठी. ते आपल्या खाटेजवळ जातात. तिथे काठी ठेवतात. मामी आणि बाबूल अजून तिथेच आहेत हे पाहून थबकतात. ]

बाबूल : मामा, आज हवा जरा थंड आहे, नाही ? शर्ट घातलात ते बरं केलंत.

मामा : अजून जेवण व्हायचंय ना तुझं ?

बाबूल : हो.

मामा : मग आटप लौकर. उगाच जाग्रणं—(आत जातात.)

मामी : देवळाकडे गेला होतास ?—

बाबूल : हो.

मामी : नारळ ठेवलास ना देवापुढे ?

बाबूल : हो : आठवणीनं ठेवला.

मामी : घेतलास देवाचा प्रसाद ?

बाबूल : प्रसाद—

मामी : प्रसाद घेणार होतास ना ?

बाबूल : हो ! हो ! घेतला. बरा झाला.

मामी : काय सांगितलं ?

बाबूल : आहे तीच कॉलेजची नोकरी ठेवू की सरकारी नोकरी घेऊ असं विचारलं. तर कॉलेजचीच नोकरी चालू ठेव म्हणून सांगितलं देवानं.

मामी : लग्नाचं नाही विचारलंस ?

बाबूल : कुणाला ?

मामी : कुणाला काय ? देवाला.

बाबूल : नाही. देवाला नाही विचारलं. त्यात काय विचारायचं ? मी करीन

तेव्हा लग्न. आई काही नाही म्हणायची नाही.

**मामी :** आमचे डोळे उघडे आहेत तोवर करून टाक, बाबा !

**बाबूल :** बघू.

**मामी :** इथली करणार की मुंबईची ?

**बाबूल :** इथली बघू. नाहीतर—

**मामी :** मनूनं नाही विचारलं ?

**बाबूल :** ( दचकून ) कुणी ?

**मामी :** तुझ्या मनू रेग्यानं रे. त्याची बहीण आहे लग्नाची. आज ना उद्या मनू विचारणार तुला.

**बाबूल :** मनू ! मी ऐकलं मानू.

**मामी :** बरी बघून कर. आमच्यासारखी नको.

**बाबूल :** म्हणजे कशी ? ( मामी मग गप्प. ) असं का म्हणालीस ? आपण बरी म्हणूनच करायची. पुढं आपण, ती आणि आपलं नशीब.

**मामी :** खरं रे बाबा. शेवटी आपलं नशीब हेच खरं. ( निःश्वास सोडतात. )

[ स्तब्धता. ]

**बाबूल :** ( हसत ) भाविणीची मुलगी करायला हवी. नाही ?

**मामी :** कर. तुम्ही आताची मुलं. कराल ते खरं.

**बाबूल :** त्यात वाईट काय ? आपल्या जातीतल्या वाईट मुलीपेक्षा भाविणीची बरीशी मुलगी मिळाली तर काय ते वाईट ?

**मामी :** मानू दृष्टीस पडली होती ?

**बाबूल :** ( गांगरतो. मग ) कोण मानू ?

**मामी :** खरंच, की वेड पांघरतो आहेस ?

**बाबूल :** नाही ग. खरंच माहीत नाही. कोण ही मानू ?

**मामी :** तिचीच मुलगी. कल्याणीची.

**बाबूल :** छेः ! खरंच नाही मी पाहिली तिला.

[ स्तब्धता. ]

**बाबूल :** पण त्यात काय वाईट ग ?

**मामी :** काऽही वाईट नाही. मागाहून ठेवण्यापेक्षा आधीच केलेली बरी. ( उठतात. )

[ एवढ्यात मामा बाहेर येतात. हातात टोपी. जाकीट. पण पांघरुणात गुंडाळून. मामी आत जातात. ]

बाबूल : इतक्यात झोपताय मामा ?

मामा : अं ! हो ! तूसुद्धा लौकर जा झोपायला.

बाबूल : जरा बसलो असतो बोलत.

मामा : मला झोप येतेय. आत गेलास की अडसर लावून घे दाराचा.

[ मामा खाटेवरचे अंथरूण नीट करतात. बसतात. डोळे मिटून नमस्कार करतात.

बाबूल आत जातो. दाराला अडसर घातल्याचा आवाज. मामा लवंडणार तोच लखोबा येतो. ]

लखोबा : मामा—

मामा : ( उठतात ) आलास पोचवून गोण ?

लखोबा : हो !

मामा : ( कनवटीचे पैसे काढून देत ) हे ठेव.

लखोबा : कशाला ?

मामा : तुझ्या पोरांना खाऊला ठेव. चुरमुऱ्याचे लाडू आणून दे त्यांना. उद्या लौकर येशील ना ?

लखोबा : येतो.

मामा : माणसं येणारेत कामावर. त्या झावळ्या काढून घ्यायच्या आहेत. नारळ उतरवायचे आहेत.

लखोबा : सक्काळीच येतो. भाचे झोपले ?

मामा : हं ! बाबूल देवळातून जाताना दिसला होता. मग कुठं गेला होता, माहीत आहे ?

लखोबा : नाही बा. मनूकडे गेले असतील. जुना मैतर ना तो ?

मामा : असेल. असेल. जा तू आता. पोरं वाट बघत असतील.

[ लखोबा जातो.

क्षणभराने मामा उठतात. पांघरूण पसरतात. कपडे घालतात. हातात काठी घेतात. कंदिल मोठा करून घेतात. पायांत चपला घालून निघतात. चपलांचा कर्र–कर्र—आवाज होतो. पटकन चपला

हातात काढून घेतात. बाहेर जातात.
रंगमंचावर काळोख होतो. एवढ्यात दाराचा अडसर काढल्याचा आवाज येतो. मामी हातात एक चिमणी घेऊन दाराशी येतात. बिछान्याकडे बघतात. बिछान्यावर मामा नाहीत असं पाहून सुस्कारा सोडतात. आत जायला वळतात. दारात त्यांच्यामागे बाबूल आलेला. ]

**बाबूल :** काय ग मामी ?

**मामी :** ( दचकून ) काही नाही. चल झोप जा तू.

[ काळोख ]

## अंक पहिला

## दृश्य पाचवे

[ कल्याणीचे घर. वेळ रात्रीची. जत्रेचा दिवस. देवाची पालखी निघण्याची धावपळ. कल्याणी खूप नटलेली. ती आणि मनू रेगे बोलत आहेत. मनूसुद्धा नव्या कपड्यांत. ]

**कल्याणी :** ह्यां नशीब न्हंय ? कसां चंद्रासारख्या दिशी व्हता प्वार. कुणाची तरी नजरच लागली बघ मेल्या चांडाळाची !

**मनू :** देवळात तू दिसली नाहीस. आज जत्रेच्या पालखीत पहिला मान तुझा. तू नाहीस तेव्हा चौकशी केली. तर तिथं समजलं. पण असं एकदम काय झालं मानूला ?

**कल्याणी :** म्हटला मा चांडाळाची दृष्ट लागली ? संध्याकाळी प्वार बरा नटून थटून तयार होतां. बरो गजरो केलो ! पोष्टापलिकडला चंद्रा, आपला गंगू-पुलाकडली देवीची भाविण रे-दोघी बोलावूक आयल्यो. मानूक ‘ चल ’

म्हटला तर म्हणाला, थांब जरा. बरा नाय वाटणां! थांबला थोडा वेळ. मग त्येका हात धरून ओढतच नेला म्हण ना देवळात. तर तिकडे ह्यां असा झाला.

मनू : असं एकाएकी काय झालं ?

कल्याणी : देवळात पाऊल ठेवला मात्र, म्हणाला कसासा व्हतां. चक्कर येतां—इतक्या बोलली आणि खांबाक धरून इतक्या म्हणता तोसर खालीच वसला. मग रे काय ? तसाच त्येका घराक आणला आणि निजवन ठेवलां—

मनू : ( उठत ) आत जाऊन बघून येतो.

कल्याणी : नको. बस. बघया कोण येता का विश्वासाचा ! कोण इला तर त्येका बसौन जातंय पालखेक ! पालखी चुकली तर देवाचो कोप नाय होवचो ?

मनू : ( बसत ) हो. तापबिप नाही ना आलाय ?

कल्याणी : नायरे—

मनू : नाहीतर जाऊन बघतो आत. तालुक्याला जाऊन डॉक्टरबिक्टर आणावा लागला तर उगाच उशीर नको. आपली गाडी आहे—

कल्याणी : तू तरी बाबा किती म्हणून करशीत आमच्यासाठी ?

मनू : मग ? करायला नको ? तुमच्यापुढं पैशाची काय किंमत ? कोर्टात केशीचा निकाल आहे परवा. नगद तीन हजार रुपये मिळतील मला. खरं सांगू ? आज जत्रेचा दिवस. खोटं बोलायचा नाही मी. या केशीतले पैसे आले की मानूला चार तोळ्यांची कंठी करायचं ठरवलंय मी.

कल्याणी : कित्याक इतक्या ?

मनू : कित्याक म्हणजे ? आलं मनात कंठी करायची.

कल्याणी : करशील बाबा तू. तुझा काय ?

मनू : ( उठतो ) काय आहे, काळजी वाटते असं एकदम काही झालं की.

[ आत जाऊ लागतो. ]

कल्याणी : ( उठते ) थांब. मीही येतंय—तां निजलासा—उठलाबिठला तर—

मनू : तू नको धावपळ करूस.

कल्याणी : जळली माझी धावपळ ! आता पालखीबरोबर माझीच मां होतली धांवपळ रात्रभर ? ( मनू नर्व्हस. )

[ दोघे दाराशी जातात. मनू दारातून बघतो. ]

**मनू** : स्वस्थ झोपलीय पांघरूण घेऊन.

**कल्याणी** : झोपू दे. चल आमी बाहेर बसाया. इतक्यात येईत कुणीतरी.

[ दोघे पुन्हा परत येतात. क्षणभराने ]

**मनू** : नाहीतर मी थांबू का ? तू खुशाल जा पालखीला.

**कल्याणी** : तुका कित्याक त्रास ? वर्साची एकदा जत्रा ! तुझा हौसेमौजेचा वय.

**मनू** : बुडेल एक वर्ष जत्रा. पण आपल्या आजारी माणसाला एकटं टाकून जाणं बरं दिसतं का ? तुला तर जायलाच हवं.

**कल्याणी** : हो ना !

**मनू** : माझं ऐक. तू हो पुढं. पालखीची वेळ होत आली.

**कल्याणी** : बघतंय जरा वाट. कोण ना कोण येइत खात्रीचा.

**मनू** : मी काय खात्रीचा नाही ?

**कल्याणी** : असा कसा ? गावातलो एवढो तालेवार माणूस तू. तुका मी असला काम सांगू ?

**मनू** : पण हे पहा—

**कल्याणी** : एकदा 'नाय' म्हटला म्हणजे 'नाय.' तुका मी असला हलक्या काम सांगूचंयच नाग—

[ एवढ्यात लखोबा गडबडीत येतो. ]

**कल्याणी** : देवासारखो इलंस बघ, लख्या—

**लखोबा** : आलो म्हणजे बघायला आलो तुला. देवळात पत्ता नाय ! मामा म्हणाले, जाऊन बघून ये.

**कल्याणी** : अरे, प्वाराची तब्येत बिघडली ना एकदम !

**लखोबा** : ते कळलं. पण पालखीची वेळ झालीय—

**कल्याणी** : ह्या चललंयच मी ! आता तू बस जरा मानूच्या सोबतीक ! त्येका एकटा टाकून कसा मी जांव ?

**लखोबा** : ( मनूकडे बघत ) कुणाच्या मनात केव्हा पाप येईल, कोण सांगणार ?

**कल्याणी** : तू खात्रीचो माणूस इलस. आता चिंता नाय माका ! जातंय मी—

**लखोबा** : निघा लौकर—मनूशेटसुद्धा बिचारे थांबले आहेत.

**मनू** : पण लखोबा, तुझ्या पोरांना जत्रेत कोण फिरवणार रे? जायचं असेल तर जा तू.

[ लखोबा हसतो. ]

**कल्याणी** : हसाक काय झालां ?

**मनू** : काय झालं रे ?

**लखोबा** : माझ्या पोरांची मनूशेट काळजी करताहेत म्हणून हासू आलं.

**मनू** : मग? सारखा 'माझी पोरं...माझी पोरं' करत असतोस.

**लखोबा** : ते झालं, पण मनूशेट, तिथं देवळात तुमची बायको आणि पोरगी तुमच्यासाठी थांबली आहेत त्याची तुम्हांला आठवण नाही म्हणून हसलो.

**कल्याणी** : चल रे मनू—बाईल वाट बघतां असताली! चल बेगीन.

**मनू** : तरी हिला म्हणत होतो, पोटात सात महिन्याचं पोर आहे, तू येऊ नकोस.

**कल्याणी** : वर्सातून एकदा येणारी जत्रा! हौस असता बाईलमाणसांक! जत्रा काय रोजरोज येतां ?

[ मनू नाइलाजाने उठतो. ]

**कल्याणी** : लखोबा, तुझ्यावर बाबा भिस्त टाकलीसा—

**लखोबा** : काही काळजी करू नको. जा तू!

[ कल्याणी आत जाऊन महानंदेला बघून येते. मनूला 'चल' म्हणते. दोघे जातात. लखोबा हसतो.

मग लखोबा दाराशी जाऊन महानंदेला बघून येतो. इतक्यात सोमजी मास्तर येतात. वयाने पंचावन्न. पण अजून फाजिल हिरवटपणा डोकावतोय.]

**सोमजी** : कोण रे?

**लखोबा** : मीच लखोबा.

**सोमजी** : अरे, कल्याणीबाई कुठं गेली?

**लखोबा** : आत्ता गेली पालखीला.

[ सोमजीमास्तर जाऊ लागतात. एवढ्यात बाबूल घाईघाईने येतो. ]

**बाबूल** : (बावरलेला) लखोबा—

**लखोबा** : काय मालक ?

**सोमजी** : हे कोण रे?

**लखोबा** : मामांचे भाचे. मुंबईला असतात.

**बाबूल :** आपण ?

**सोमजी :** मी सोमजीमास्तर. इथंच असतो.

**बाबूल :** मास्तर म्हणजे—

**लखोबा :** साधेच. पोस्टातले.

**सोमजी :** ( बाबूलला ) तुम्ही तिकडे जत्रेलाच निघाला आहात ना ? मग चला माझ्या बरोबर.

[ बाबूल घुटमळतो. ]

**लखोबा :** मालक, सोमजीमास्तरांना होऊ द्या पुढं. मामांचा तुम्हांला निरोप द्यायचा आहे. थांबा जरा.

[ सोमजीमास्तर जातात. ]

**बाबूल :** महानंदा कशी आहे ?

**लखोबा :** आत झोपली आहे. तुम्हांला कोण बोललं ?

**बाबूल :** येताना ऐकलं मी. तसाच इकडं वळलो. बघून येऊ ?

**लखोबा :** हं—

[ बाबूल आत जायला निघतो. रंगमंच फिरतो. आतील खोली दिसते. पलंगावर पांघरुणात महानंदा झोपलेली. बाबूल आत येतो. बाजूला कोपऱ्यात त्याचे नाव असलेली नारळाची गोण. बाबूल गोण बघतो. 'माझी गोण इथं ?' असे स्वतःशीच बोलतो. मग पलंगाजवळ जातो. हळूच 'महानंदा-मानू' अशी हाक मारतो. उत्तर नाही. तो थांबतो. मग विचार करून तिथेच पलंगाशी अव-घडून बसतो. हळूच 'तिला' हात लावतो. उत्तर नाही. 'मानू, मी बाबूल आलोय' असे म्हणत पांघरुण दूर करणार इतक्यात दाराआडून महानंदा पुढे होते.
जत्रेसाठी खूप सुंदर पोशाख केलेली. ती त्याच्यामागे येऊन उभी राहाते. आता तो पांघरूण उचलणार इतक्यात म्हणते ]

**महानंदा :** ( कल्याणीच्या पद्धतीने ) हां जाग्या करू नको तेका.

[ बाबूल दचकतो. वळून बघतो, महानंदेकडे बघतच राहातो. ]

**बाबूल :** तू ?

महानंदा : हं ! मीच. ( पांघरूण काढून दाखवते. पांघरुणात उश्या, लोड ठेवलेले. महानंदा असते. )

बाबूल : तुला बरं नव्हतं ना ?

महानंदा : काल कबूल केलंत आणि संध्याकाळी का नाही आलात ? मी सारखी वाट बघत होते.

बाबूल : काय झालं माहीत आहे का ?

महानंदा : नाही ! आणि सांगूसुद्धा नका. पालखीची वेळ होईपर्यंत थांबले. तुम्हांला काय ? आईनं शेवटी देवळात ओढून नेलं. म्हटलं, आजची भेट चुकणार. मग केलं नाटक.

बाबूल : नाटक ?

महानंदा : हं—नाहीतर झाली असती का अशी भेट ?

बाबूल : पण—

महानंदा : आधी हात करा पुढं.

बाबूल : तू काय, शिक्षा देणार आहेस मला ?

महानंदा : हं—

[ महानंदा त्याच्या हातात गजरा बांधते. बाबूल तिचा हात धरतो. ]

बाबूल : ही शिक्षा इतकी सुगंधी आहे—

महानंदा : आता काही नको लाडात बोलायला.

बाबूल : तुला बरं नाही असं कळल्यावर मी इतका घाबरलो होतो. ( तिला जवळ घेतो. )

महानंदा : बाहेर लखोबा आहे हं.

बाबूल : असं ? ( हाक मारतो. ) लखोबा.

महानंदा : त्याला कशाला बोलावताय ? ( बाबूल 'थांब' अशी खूण करतो. लखोबा येतो. )

बाबूल : हिला आता बरं आहे. तुला जत्रेला जायचंय ना ?

लखोबा : हो. पोरं मागं लागली होती.

बाबूल : ( खिशातून पैसे काढून देत ) जा त्यांना घेऊन.

लखोबा : पण कल्याणीबाई विचारतील—

बाबूल : हिलाच घेऊन येतो ना मी जत्रेला जराशानं. तू नको काळजी करूस. जा पळ.

[ लखोबा जातो. दोघे एकमेकांकडे बघतात. ]

महानंदा : बघत काय बसलात ? जत्रेला चलताय ना ?

बाबूल : मग ! ( महानंदा बसते. हसते. ) हा कितवा गजरा ?

महानंदा : तुम्हीच सांगा.

बाबूल : सातवा. माझ्या बॅगेत कालपर्यंतचे सहा गजरे जपून ठेवले आहेत मी. सहा भेटींचे सहा.

महानंदा : मामांना माहीत आहे तुम्ही इथं येता ?

बाबूल : अंहं ! पण मामीला जरा संशय आलाय. बाहेर जायला निघालो की रोज म्हणते, देवळात काय ठेवलंय रोजरोज ? त्यापेक्षा बंदरावर जात जा. मी आपला हो म्हणतो आणि या बंदराला येतो. मानू, तो सोमजीमास्तर कोण ग ?

महानंदा : का ?

बाबूल : मघाशी बाहेर भेटला. असा संशयानं पाहात होता... माझ्याकडे. तो कशाला इथं येतो ?

महानंदा : नुसतं बघत बसायला.

बाबूल : तुला ?

महानंदा : छट्. आईला.

बाबूल : म्हातारा तर आहे.

महानंदा : म्हणूनच नुसता बघत बसतो. कधी गमतीची पत्रं वाचून दाखवतो आईला.

बाबूल : कुणाची पत्रं ?

महानंदा : कुणाचीही. गावात येणारी.

बाबूल : म्हणजे तुला मी कधी मुंबईहून पत्र पाठवलं, की आधी हा थेरडा वाचणार. ( सोमजी मास्तरची नक्कल करत ) माझ्या खूप लाडक्या मानू–

महानंदा : ( आनंदित होत ) मी खरंच इतकी आवडते तुम्हांला ?

बाबूल : खूप खूप. आनंदी चेहऱ्याची. सुंदर. चालरीत आणि मर्यादा सांभाळणारी. देवाची आवड असणारी–

**महानंदा** : पुरे हं !
**बाबूल** : आणखी सांगतो ना. हवं तर कानात सांगतो पाहिजे तर.
**महानंदा** : अंहं !
**बाबूल** : का ?
**महानंदा** : गाल असतात ना कानाजवळ ? ते ओठावरले शब्द आधीच टिपून घेतात.
**बाबूल** : तुला कसं माहीत ?
**महानंदा** : या दहा दिवसांत शिकले ना मी. तुम्ही शिकवणारे.
**बाबूल** : मग या शिकवणीबद्दल—
**महानंदा** : फी तयार ठेवलीय. घेणार आत्ता ?
**बाबूल** : ( खुशीत येऊन ) हं—
**महानंदा** : आधी डोळे मिटा.
**बाबूल** : डोळे मिटून ! बरं.
**महानंदा** हं.

[ महानंदा ट्रंकेतून डबा काढते. त्यातले एक तोरण दाखवते. ]

**महानंदा** : आवडलं ?
**बाबूल** : सुंदर.

[ महानंदा आणखी तोरणे दाखवते. ]

**बाबूल** : दरवाज्याला लावली तर किती शोभतील. दाराला असं मखर आणि—
**महानंदा** : जाताना तुम्ही घेऊन जा ही मुंबईला.
**बाबूल** : आणि काय नेऊ ?
**महानंदा** : काय हवंय ?
**बाबूल** : दाराच्या मखरात उभी राहायला तू (महानंदा बोलत नाही.) गप्प का ?
**महानंदा** : उगीच कशाला आशा लावता ? मी भाविणीची मुलगी. देवदासी. तुम्ही मोठ्या कुळातले.
**बाबूल** : असू दे. जन्मानं येणारं मोठेपण आणि कमीपण मी मानत नाही.
**महानंदा** : बोलायला बरं असतं. आता दिवाळी झाली की तुम्ही जाल–
**बाबूल** : पण पुन्हा डिसेंबरात येईन. नाताळच्या सुटीत.

महानंदा : खरंच याल ?

बाबूल : यायलाच हवं. तिथं मुंबईत मी तडफडणार आणि इथं तू.

महानंदा : हो, पण पुन्हा तुम्ही जाल रजा संपल्यावर.

बाबूल : अंहं ! जाताना तुला घेऊन जाणार.

महानंदा : मला नेणार ? खरंच ?

बाबूल : माझा संशय वाटतो ?

महानंदा : अंहं ! मला भीती वाटत होती, तुम्हांलाच माझा संशय यायचा. संशय येण्याच्या जातीतच मी जन्म घेतलाय.

बाबूल : असं नाही बोलायचं. तू माझ्या घरी यायचं. माझी बायको म्हणून. आपल्या घराच्या दारादाराला तुझी तोरणं. आपण दृष्ट लागण्यासारखा संसार करायचा. मग काही वर्षांनी संसारात—

महानंदा : तुमच्यासारखा हुशार मुलगा.

बाबूल : अंहं ! मला पहिली मुलगी हवीय.

महानंदा : मुलगी नको.

बाबूल : का ग ?

महानंदा : आमची जात शिकवत आलीय-मुलीचा जन्म वाईट.

बाबूल : नाहीतर असं करायचं का ?

महानंदा : काय ?

बाबूल : पहिलं जुळंच मागायचं देवाजवळ. एक मुलगी. एक मुलगा. मुलीचं नाव ठेवायचं दमयंती.

महानंदा : आणि मुलाचं गुरुनाथ. दमयंती तुमची मुलगी. गुरुनाथ माझा मुलगा. मग भांडणच नाही.

बाबूल : हो ! नुसती गोडीच.

[ स्तब्धता ]

महानंदा : पण हे खरं होईल ना ? देवाचं नाव पुढं करून आई लग्नाला विरोध करील.

बाबूल : माझ्या आईला मी करीन ते पटेल. आणि नाही पटलं तर मुंबईहून बाहेरगावी बदली करून घ्यायची. तिथं कोण विरोध करणार ? मी राजा. तू राणी.

महानंदा : ( काहीशी स्वतःशीच ) तुम्ही राजा ... मी राणी.

( दोघेही स्वप्नात हरवतात. स्तब्धता. )

बाबूल : राणी, तू जत्रेला येणार ना राजाबरोबर ? ( दाराशी जातो. )

महानंदा : ( अजून स्वप्नात ) अं ?

बाबूल : तुझी आई येईल एवढ्यात.

महानंदा : अंहं ! पालखी झाल्याशिवाय ती नाही यायची.

बाबूल : पहाट होईल ?

महानंदा : हं.

बाबूल : तोपर्यंत राजा आणि राणीचं राज्य.

महानंदा : बाहेर आहे कुणी ?

बाबूल : ( बाहेर बघत ) आहे ना. जुईचा वेल, जुईची फुलं, त्यांचा गंध आणि–

महानंदा : खूप खूप आनंद. असंच ना राजा ?

[ बाबूल दाराला कडी घालतो. पुढे येतो. ]

बाबूल : राणी—

[ महानंदा दिव्याची ज्योत कमी करते. दोघे आवेगाने एकमेकांजवळ येतात ... काळोख ... ... ]

*

# अंक दुसरा

## दृश्य पहिले

[ कल्याणीचे घर. दिवाळीनंतरची संध्याकाळ. दिवाळीच्या वेळचा आकाश-कंदिल टांगलेला. मामा आणि कल्याणी बोलत बसली आहेत. ]

**कल्याणी :** कसलो इतको विचार करतासात ?

**मामा :** ( हसतात. ) विचार कसला डोंबलाचा ! नुसताच बसलोय.

**कल्याणी :** मी काय वळखणंय नाय तुमका !

**मामा :** कल्याणी, आमचा बाबूल तुझ्याकडे येतो का ग ?

**कल्याणी :** बाबूल ! दुर्गीचो झील ? त्या दिवशी इलो तितकोच—

**मामा :** खरं सांगते आहेस ना !

**कल्याणी :** गावाशी खोटा बोलान मी. पण तुमच्याशी नाय.

[ मामा सुस्कारा टाकतात. कल्याणी हुशारते. क्षणभराने— ]

**कल्याणी :** ( गळ्यातल्या सराशी खेळत ) हो सर नाय बघल्यात !

**मामा :** बघितला.

**कल्याणी :** कसो दिसता !

**मामा :** माझ्या मनात तुला चांगला चार तोळ्यांचा सर द्यायचाच होता दिवाळीच्या पाडव्याला. पण नाही जमलं. रागावली असशील हा एवढासा सर पाहून !

**कल्याणी :** काय तरी काय ! मी आपलं पाडव्याक धर्म म्हणून ओवाळला. तुम्ही निस्ती सुपारी दिली असती तरी गोड मानली असती. हो सर तरी दोनेक तोळ्याचो आसात नाय !

**मामा :** अडीच तोळ्याचा.

**कल्याणी :** अर्धो तोळो इकडे काय, तिकडे काय. घरात मामीक किती तोळ्याचो सर केल्यात ?

मामा : ( हसतात. ) ते सांग ? त्याला काही केलं तरी ते खूश व्हायचं नाही. मग कशाला काय करावं माणसानं ?

कल्याणी : पदर धरीना म्हणून मन खातां हो तिचां !

मामा : त्यात तिचीच चूक आहे... माझ्याकडून चूक नाही. ( कौतुकानं ) तुला काय सांगायला हवं ?

कल्याणी : पुरे हां. चहा आणतंय–( उठते. )

मामा : ( तिला हात धरून बसवत ) नको. घरून निघताना आमच्या वेडीनं कपभर पाजलाय. तोंडाची चवच नेली रांडेच्यानं. धड चहा करता येत नाही. रांधते तर अन्नाची चव घालवते... ( खिशातून पुडी काढत ) आज सांग बघू काय आणलं असेल ?

कल्याणी : वळखला तर काय दितल्यात ?

मामा : काही राह्यलंय आता द्यायचं ?—ओळख.

कल्याणी : रावताच्या दुकानातली भजी.

मामा : तू म्हणजे अशी आहेस ! ( पाठीवर थाप मारतात. )

कल्याणी : मानूक बोलावतंय.

मामा : आता तिला कशाला बोलावतेस ? तू ही खा आधी गरमगरम. ( कल्याणी खाऊ लागते. मग ) काल लखोबा बाजारात दिसला. रुपया मोडत होता. विचारलं, कुठून आणलास रुपया तर आधी पटकन म्हणाला, मानूनं दिला. मग बोलला, मनू रेगेनं दिला.

कल्याणी : मनू रेग्यानंच दिला असेल. मानूकडे कुठं आले पैशे ? मनूचो कसो सढळ हात ! उचलून दितलो. परवा दिवाळीक इलो तर बऱ्यो चार का पाच तोळ्याचो पाटल्यो घेऊन इलो !

मामा : तुझ्यासाठी ?

कल्याणी : गे बाये ! ( हसते. ) मानूसाठी हो. मी आता झालंय म्हातारी.

मामा : तुला कोण म्हातारी म्हणेल ?...आज इतकी वर्षं बघतोय तुला. आहेस तश्शी आहेस... पाटल्या ठेवल्यास ना ?

कल्याणी : आमचो धर्मच आसा... पोर पाटल्यो घेऊक लाजली तसां रेग्याक म्हटला, ठेवून दे. आज ना उद्या तांच पाटल्या घालून मिरयतलां. तुमच्या

बाबूलबरोबरचो रेगो. कसो ? लगीन करून मार्गाक लागलो. तुमच्या बाबूलचा लगीन कधी ?

मामा : खळनाथाला ठाऊक. शिकून आता नोकरीला लागलाय, करील लग्न तेव्हा करील.

कल्याणी : महिन्याक पगार किती बाबूलाक ?

मामा : असेला ढीगभर ! पण करायचीय काय नोकरी ? घरच्या सोंगानं काही पोर दिलं नाही मला. विचार आहे, माझी सगळी इस्टेट बाबूलच्या नावे करावी. लग्न करून त्यानं इथंच राहावं गावात.

कल्याणी : ( भजी खात खात ) दोन भजी उरलीयत ! मानूक दितंय. ( हाक मारते. ) मानू गो...गो मानू—

[ महानंदा येते. ]

महानंदा : काय गे ?

कल्याणी : मामांनी तुज्यासाठी रावताकडची भजी आणलीसत— ( भजी देत ) घे.

[ महानंदा भजी खाणार तेवढ्यात ]

कल्याणी : ( मामांना ) तुम्ही इतक्या सांगतासात म्हणजे बाबूल मुंबैचीच होकाल करतलो.

मामा : हं—कालेजात असेल ती. जमवलंसुद्धा असेल.

कल्याणी : बरा झाला ! इतक्या शिकलेल्या मुलाक कालेजातलीच पोरगी शोभतली.

मामा : एक दिवस घेऊन येईल इथं तिला. सांगेल, मामा, ही तुमची सून ! आपण नुसते आशीर्वादाचे धनी.

[ महानंदेच्या हातातले भजे दरम्यान तसेच राहते. ती खूप अस्वस्थ होते. ]

कल्याणी : ( महानंदेला ) उभ्या कित्याक गो ? बस थंय.

[ महानंदा आपल्याच विचारात. इतक्यात सोमजीमास्तरांची हाक ऐकू येते. ' कल्याणीबाई ' ]

कल्याणी : हो इलो म्हातारडो. ( उठते. ) या सोमजीमास्तर.

[ सोमजीमास्तर आणि त्यांच्या मागून मनू रेंगे येतो. मनू मामांन पाहून गांगरतो. महानंदा पटकन आत जाते. ]

**सोमजी :** हं, काय मामा ? ( मामा उत्तर देत नाहीत. मनूकडे बघतात. ) रस्त्यात मनू भेटला. म्हटलं, इकडेच जात असणार तेव्हा बरोबरच—

**मनू :** म्हणजे काय मामा, उद्या तालुक्याला कज्जा आहे ! कज्ज्यात देवळाच्या नारायण गुरवाची साक्ष काढली आहे. त्याला भेटावं म्हणून निघालो, तर मास्तर म्हणाले, दोन मिनिटं येऊन जा. महिना दोन महिन्यांत कल्याणीबाईची काही हकीकत कळली नव्हती. आज हा खटला उभा राहातोय, तर उद्या दुसरा, असं चाललंय ना माझं.

**सोमजी :** काय कल्याणीबाई, आम्हांला काय ' या-बसा ' म्हणत नाही रोजच्या-सारख्या ? बसू ना ? ( मामांकडे बघत ) की जाऊ ?

**कल्याणी :** बसा बसा ! गावचे पोष्टमास्तर तुमी. तुमका हो कोण जा म्हणात ? बस रे मनू. ( हाक मारते. ) गो मानू, हेंच्यासाठी जरा च्याचा पाणी ठेय.

[ महानंदा बाहेर येते. दोघे तिच्याकडे बघतात. ]

**मनू :** राहू दे. लगेच जायचंय मला.

[ महानंदा आत जाते. ]

**सोमजी :** मामा, काय बोलत नाही तुम्ही ?

**मामा :** अं ! बोलतोय ना.

**सोमजी :** भाच्याचा मुक्काम वाढलेला दिसतोय ?

**मामा :** उद्या सकाळच्या बोटीनं निघतोय. ( मामा उठतात. )

**कल्याणी :** ( मामांना ) चलल्यात ?

**मामा :** हो ! उद्या त्याच्याबरोबर नारळ, कोकम एकेक पाठवायचंय दुर्गीसाठी—

**सोमजी :** बसा हो.

**मामा :** अंहं !

**सोमजी :** काय यंदा पीक पाणी कसंय ते तरी सांगाल ?

**मामा :** आहे रुपयातलं सहा आणे.

**सोमजी :** हे मला तरी सांगू नका मामा. सहा आण्याच्या पिकात गावाला कुणी अडीच तोळ्याची गळसरी करून देईल ? या सोमजीमास्तरजवळ तरी कुणाची

लटपट चालायची नाही. उडत्या पाखराचे काही मी पाय मोजत नाही, पिसं मोजतो म्हटलं, पिसं.

[ मामा रागाने जातात. सोमजी मोठ्याने हसतात. मनूकडे टाळी मागतात. कल्याणीही हसते. ]

**मनू :** म्हातारा अजून हौशी आहे.

**कल्याणी :** आणि सोमजी मास्तर काय कमी हौशी आसत? (हसते.) माझ्याकडे सोमजी मास्तरचीसुद्धा लटपट चलूची नाय. काय?

**सोमजी :** हरलो बुवा आपण.

[ क्षणभराने ]

**कल्याणी :** मास्तर, हल्ली काय गंमतीची पत्रां नाय आणनात तुम्ही—

**मनू :** गमतीची पत्रं म्हणजे?

**सोमजी :** गमतीगमतीची पत्रं. तरी कल्याणीबाई, तुम्हांला सांगतो, आताची पत्रं काहीच नाहीत. लढाईच्या टायमाला यायची ती खरी पत्रं. अशा एकेक मसालेदार गोष्टी लिहिलेल्या असायच्या. वाटायचं, त्यांच्या बिछान्यातच आहोत आपण. तसं म्हणा, एक पत्र घेऊन आलोय आत्ता. (मनूला) तुला आवडेल ना ऐकायला?

**मनू :** तर?

**सोमजी :** (खिशातून पत्र काढतो.) मानू कुठाय?

**कल्याणी :** (हाक मारते.) मानू गो—

**महानंदा :** (आतून) मी पुस्तक वाचतेय.

**कल्याणी :** मानूच्या हातात एकदा पुस्तक पडला, की कश्शाची म्हणून शुद्ध नाय तिका. जाऊ दे. वाचा.

**सोमजी :** (पत्र वाचण्यापूर्वी) असं फर्मास पत्र आहे.

**मनू :** कुणाचं आहे?

**सोमजी :** माझ्या आणि तुझ्या चुलत सासूचं! रिकाम्या चवकशा! ऐक (पत्र वाचू लागतो.) माझ्या हृदयेश्वरी, त्या दिवशी माडाखाली मी तुला धरले आणि तू मग—

[ पत्रवाचन चालू असतानाच बाबूल येतो. वाचन थांबते. ]

**कल्याणी :** ये बाबूल.

सोमजी : वा: ! मामांचे भाचे.

मनू : ( आश्चर्यानं ) बाबूल, तू कुठं ?

सोमजी : कुठं काय ? रोजच्यासारखे इथंच. मी रोज पाहातो ना यांना इथं. संध्याकाळची फेरी चुकायची नाही यांची.

बाबूल : ( चिडून ) तुम्हांला कुणी विचारलंय ?

सोमजी : आम्ही पोष्टाची माणसं. विचारल्यावर उत्तर देणार नाही, पण मनात आलं, की खाजगीसुद्धा बोलून टाकू. हां...

कल्याणी : जांवया हो मास्तर. दोन शब्द नीट बालूचे !

सोमजी : बोलतो. काय भाचे, परवा जत्रेच्या दिवशी ओझरती ओळख झाली. कुठं असता तुम्ही ?

मनू : मुंबईला असतो तो.

सोमजी : मुंबईला लाख माणूस असतो. पण पोटापाण्याचा काही उद्योगधंदा ?

कल्याणी : खूप शिकलाय.

मनू : कॉलेजात शिकवतो.

सोमजी : तरीच ! सध्या आपल्या मानूची शिकवणी धरलेली दिसतेय.

मनू : मानूची ? पण...

सोमजी : दचकू नकोस. सोमजीमास्तरला सगळं कळतं. तिथं पोष्टात बसून.

मनू : बाबूल, मास्तर म्हणताहेत ते ?

बाबूल : यांचा कशाला हवाला मागतोस ? सरळ मलाच विचार ना.

कल्याणी : मनू, सोमजीमास्तरचा स्वभाव तू जाणतंस. चेष्टा करुची एकदा लहर इली की बघूक नको. बस रे बाबूल.

बाबूल : राहू दे.

सोमजी : इथं आमच्यात नाही गोड लागणार त्यांना.

बाबूल : ( चिडून ) मास्तर—

कल्याणी : उद्या चललंय तू ? मास्तर, बाबूलची आवस माजी बालमैत्रीण हो.

सोमजी : विषय बदलायचा नाही कल्याणीबाई.

बाबूल : ( कल्याणीला ) तुमचं चालू दे. महानंदा आहे आत ?

कल्याणी : ऑं ? बघतंय हां. ( हाक मारतो ) मानू गो—

महानंदा : ( आतून ) आता कोण आणखी आलंय ?

**सोमजी :** दुसरं कोण येणार ?

**बाबूल :** मी आलोय, मानू. बाबूल.

[ महानंदा धावत दारापर्यंत येते. लगेच रागाने आत जाते. ]

**कल्याणी :** जा भेटून ये त्येका. उद्या चललंय तू–

[ बाबूल आत जातो. ]

**कल्याणी :** सोमजीमास्तर, तुम्ही उगीच पराचो कावळो करू नकात. माज्या बालमैत्रिणीचो झील तो.

**सोमजी :** उद्या झीलाला झील होईल तेव्हा कळेल. पराचा कावळा का कावळ्याचा पर तो ! काय मनोबा ?

**मनू :** मास्तर, पण तुम्ही—

**सोमजी :** पाहातो ते सांगतो मी. मनोबा, तुमच्या पाटल्या फुकट गेल्या पाच तोळ्यांच्या.

**मनू :** पाटल्या म्हणजे ?

**सोमजी :** ( हसत ) कळलं ना ? आम्हांला सगळं कळतं ते !

**कल्याणी :** मास्तर, तां पत्र तसाच रवला तुमच्या हातात. वाचा तरी–

**मनू :** पत्राचं बास झालं. कल्याणी, तुला स्पष्ट विचारतो.

**कल्याणी :** काय विच्यारूचा तां उद्या विचार. रवळनाथाक स्मरून खरा सांगान.

**मनू :** मग जाऊ आता ?

**कल्याणी :** जातंय तर जा बापडो.

**मनू :** मास्तर, तुम्ही चलताय का बसताय इथंच ?

**सोमजी :** एवढं हे पत्र—

**कल्याणी :** नायतर मास्तर, जांव दे ! उद्या वाचयां, कसां ?

**सोमजी :** म्हणजे आम्ही जायचं. असंच ना ?

**कल्याणी :** बसतल्यात तर बसा. पण माका आत जाऊन आता बाबूलच्या आवशीसाठी भेट बांधू दे. उद्या चललो तो. पिशवी भरून शिवूक होयी. वसून कंटाळतल्यात तेव्हा म्हटला—

**सोमजी :** ( उठत ) कळलं. एकच बवा...बाबूलच्या आवशीला सुनेची भेट जायला नको. काय मनू ?...चला आता प्रसाद, मिळालाय ना तुम्हांला ?

[ दोघे जातात. मनू रागाने जाऊ लागतो. ]

कल्याणी : मनू, उद्या ये रे–

[ मनू थांबतो. रागाने बघतो. निघून जातो. कल्याणी फुलं घेऊन गजरा करायला बसते. प्रकाश कमी होतो.

आता आतली खोली दिसते. महानंदा रागावलेली. बाबूलशी अजून बोलत नाहीए. ती गजरा करतेय. ]

बाबूल : इतका वेळ विनवण्या करतोय, तू अक्षरसुद्धा बोलायला तयार नाहीस. मानू, महानंदा, तू बोलणार आहेस की नाहीस ? उद्या सकाळच्या बोटीनं परत जातोय मी. ही भेट तरी अशी रुसव्याची नको. आता जर बोलली नाहीस ना, तर मी जाईन हं.

महानंदा : तुम्हांला तेच हवंय. भेट झाली की गोडगोड बोलायचं आणि मग—

बाबूल : मग सांगू ? तुझं बोलणं सारखं सारखं आठवत राहायचं. तुझं बोलणं. तुझं वागणं, तुझं दिसणं—

महानंदा : हे असंच बोलता आणि मला वेड लावता.

बाबूल : आज तुझं काय बिनसलंय ? ( महानंदा गप्प. शब्द शोधतेय ) सांग ना.

महानंदा : तुमच्या कॉलेजात मुली असतात ?

बाबूल : असतात.

महानंदा : दिसायला सुंदर असतील ?

बाबूल : असतील.

महानंदा : म्हणूनच म्हणते.

बाबूल : काय ?

महानंदा : त्या दिसल्या, की मला विसरून जाल.

बाबूल : वाटतं तुला असं होईल ?

महानंदा : आईच सांगत होती.

बाबूल : तिला कुणी हे सांगितलं काहीतरी ?

महानंदा : कुणी सांगितलं तरी खरं आहे ना ?

बाबूल : साफ खोटं आहे. तू विश्वासच कसा ठेवलास या गोष्टीवर ? वेडी नाहीतर—

[ बाबूल पुढे जातो. महानंदा स्मित करते. दोघे एकमेकांकडे बघतात. जवळ येतात. इतक्या बाहेरून कल्याणीची हाक. ]

कल्याणी : ( बाहेरून ) मानू गो–( दोघांच्या चेहऱ्यावर किंचित नाराजी ) मी देवळात जावन येतंय. बाबूलाक सांग–

मानू : ( दचकून ) काय ?

कल्याणी : ( बाहेरून ) सांग, मी इल्याशिवाय जाव नको.

मानू : ( बाबूलकडे बघते. दोघेही खूप आनंदात ) सांगते. ते जायलाच निघाले होते. ( बाबूल डोळे मोठे करतो. )

कल्याणी : ( बाहेरून ) जावू नको रे बाबूल. बसून रव. ह्या आयलंच मी !

[ कल्याणी गेल्याची खात्री होईपर्यंत दोघेही स्तब्ध. मग— ]

बाबूल : सुटी किती भराभरा संपली. जायचा दिवस आलासुद्धा उद्या.

महानंदा : तुम्ही असेच आहात.

बाबूल : अग, नोकरी आहे ती.

महानंदा : काही सांगू नका.

बाबूल : पुन्हा मी येतोय ना नाताळात ?

महानंदा : कशाला ?

बाबूल : माझ्या राणीला न्यायला. संसार सजवायला.

महानंदा : पण नाताळ म्हणजे अजून कितीतरी थांबायचं आहे. 'उद्या येतो' म्हणून सांगून जात होता तरी माझं मन लागत नव्हतं. वाटतं, त्यापेक्षा भेटच झाली नसती––

बाबूल : पण खळनाथानंच ठरवलं होतं ना ?

महानंदा : त्याचं काय जातंय ठरवायला ? इथं वाट पाहावी लागते मला.

बाबूल : मी नाही वाट बघत ?

महानंदा : कुणास ठाऊक ?

बाबूल : मग काल रात्री घरी चपला विसरून ठेचाळत कशाला आलो असतो इथं चोरट्यासारखा ?

महानंदा : मी रात्रभर जागत राहिले होते ना वाट बघत !

बाबूल : आणि मी गेल्यावर ?

महानंदा : तुमची शाल पांघरून झोपले.

बाबूल : माझी शाल ?

महानंदा : ( हसते. ) जाताना इथंच विसरलात.

[ महानंदा गादीखालून शाल काढून त्याला देते. ]

बाबूल : तुझ्याजवळच ठेव ती. आठवण. ( हसतो. )

महानंदा : का हसलात ?

बाबूल : बंदरावरून डोंगरावरचा डाकबंगला दिसतो तो पाहिला आहेस ?

महानंदा : हं—

बाबूल : मानू, या वेळी येताना तो पाहिला तेव्हा उगाच मनात आलं होतं, लग्नानंतर बायकोला घेऊन जायचं ते याच डाकबंगल्यात. आणि इथं बायको-सुद्धा मिळाली. मानू, आपलं लग्न झालं, की त्या बंगल्यात जायचं चांदणं लुटा-यला. जाताना तुझ्या अंगावर ही शाल हवीच हं. या सगळ्या सुगंधी आठवणी सांगायला.

[ स्तब्धता. ]

बाबूल : तू हे कल्याणीजवळ बोलली आहेस ?

महानंदा : ( तंद्री तुटते. ) काय ?

बाबूल : आपल्या लग्नाचं.

महानंदा : थोडंसं. निश्चित असं नाही. ( गजरा करू लागते. )

बाबूल : मग ती काय म्हणाली ?

महानंदा : ( क्षणभराने ) नाही. नको म्हणाली.

बाबूल : मी विचारून बघतो.

महानंदा : बघा विचारून.

बाबूल : तिनं 'नाही 'च म्हटलं तर ?

महानंदा : तर तुम्ही म्हणाल तिथं, म्हणाल तेव्हा पळून येईन. सावलीसारखी तुमच्या मागून येईन. ( बाबूल गप्प ) संशय वाटतोय ?

बाबूल : अंहं ! खूप समाधान, खूप सुख मनात भरभरून वाहातंय.

[ बाहेर कल्याणी येते. ]

कल्याणी : ( बाहेरून ) बाबूल, तू आसंय मा ?

महानंदा : आई आली.

बाबूल : आत्ताच विचारू ?

महानंदा : विचारा.

[ दार लोटून कल्याणी येते. ]

कल्याणी : अगो, अजून गजरो नाय दिलंस त्येका ?

महानंदा : झालो !

कल्याणी : बसा निवांत.

[ महानंदा बाबूलला खूण करते. ]

कल्याणी : ( हसत ) अरे, मानू खुणा करतासा त्यो तरी बघ—

महानंदा : ( लाजते. ) तसं नाही. हे तुला काही… यांना तुझ्याशी काही बोलायचंय.

कल्याणी : माझ्याशी ?

बाबूल : हो.

कल्याणी : ( कल्याणी बसते. ) बोल.

बाबूल : उद्या सकाळच्या बोटीनं मुंबईला परत जातोय मी.

कल्याणी : हो. जावकच व्हयां. जत्रा झाली, दिवाळी झाली. आता काय आसा इकडे ?

बाबूल : रजासुद्धा संपत आली.

कल्याणी : हो. संपतलीच कधी ना कधी—

[ स्तब्धता. ]

कल्याणी : अरे हां. तुज्या आवशीसाठी ल्हानशी भेट काढून ठेवलसंय हां ! तिका म्हणूचा गोड मानून घे. ( बसत ) माझ्या डोळ्यांक आता धड काय दिसणां नाय. फूल पडलासा डोळयांत ! ह्या गावात काय उपचार नायत.

बाबूल : मग मुंबईलाच चल. तिथं मोठ्या डॉक्टरला दाखवतो.

कल्याणी : माकारे मेलीक कसली मुंबई ?

बाबूल : मग मानूला नेतो.

कल्याणी : खंय ? मुंबईक ?

बाबूल : हो !

कल्याणी : कित्याक ? खावस्यात घालूक ?

बाबूल : तुला सोडवतो काळजीतून. हिच्याशी लग्न करतो मी.

कल्याणी : ( कपाळावर हात मारत ) अरे माज्या देवा ! ही आजची पोरां ! अगदी आपलो धर्म बिसरलीत बघ. कुळशीळवाल्याक संसाराची चट लावची

नसतां भाविणीने. तुमची सेवा करूचो धर्म आमचो. तुम्ही दितल्यात ता आमी खातलो.

**बाबूल :** पण आता दिवस पालटलेत.

**कल्याणी :** ते तुमच्या मुंबैक. या गावात पूर्वापार चालत इलेले दिवस तसेच आसत. उगवतीकच्च सूर्य उगवता, मावळतीकच मावळता. उन्हाळ्यात उन्हाळो, पावसाळ्यात पावसाळो. थंडीत थंडी. तुम्ही मुंबैकर उन्हाळ्यात फराफरा पंखे लावतात विजेचे आणि म्हणतात दिवस पालटले. छयाः भाविणीच्या पोरांक आणि लगीन ? भिकेची लक्षणां !

**बाबूल :** का नको, सांगशील ?

**कल्याणी :** आमी केला लगीन ?

**महानंदा :** आई, तुझा जमाना जुना. आताच्या मुली करतात लग्न !

**कल्याणी :** करतंत आणि मग भिकेक लागतंत.

**बाबूल :** लग्न केलं नाही, म्हणून तू कधीच नाही पस्तावलीस ?

**कल्याणी :** नाय. कधीच नाय.

**बाबूल :** लग्नाची तुला हिंमत झाली नाही म्हण. मानूला झाली.

[ स्तब्धता. ]

**कल्याणी :** पोष्टापलिकडली चंद्रीची पोर यमना ! पाच बुका शिकला. शाणा झाला. अगो, नको नको म्हटला तर आयकाना. बाहेर गावाक जाऊन जोरात लगीन केला.

**बाबूल :** शाबास.

**कल्याणी :** पण पुडे काय झाला ? दोन महिन्यात नवरो मेलो. अरे भाविणीनं लगीन केला तर देवाचो कोप नाय होवचो ?

**बाबूल :** चांगल्या घरच्या मुलींना काय वैधव्य येत नाही ?

**कल्याणी :** रवला. तो भाऊ भट. चांगली भटाची पोर करूची ती सुंद्री केल्यान गंगू भाविणीची. सगळो गाव विरुद्ध. पण ऐकात तो भट कसलो ? सहा महिन्यात अंथरुणाक खिळलो. अखेरीस देवासमोर नाक घासला. सुंद्रीक टाकली तेव्हा पायावर उभा रवली. आता कसा ? पुन्हा लगीन करून संसारात पडलो.

**महानंदा :** पण अजून सुंद्रीकडे जातो आणि बायकोला छळतो.

बाबूल : आता देवाचा कोप त्याच्या बायकोवर का झाला ? कल्याणी, मी ठरवलंय ते ठरवलंय.

कल्याणी : लगीन करून काय मोठा होतलां ? आमी खंय लगीन न्हालंव ? पण देवान काय कमी केलां आमका ?

बाबूल : तुला संसार दिला नाही, नवरा दिला नाही. याच्याहून आणखी काय कमी असणार ?

कल्याणी : नाय रे पुता ! तू भलता सलता विचार मनात आणू नको ! आणि मानू, गधडे तुका ह्यां सगळां माहीत असताना माज्या दुर्गीच्या झीलाक बोलनंस नाय ? छयाः ह्यां व्हऊंचा नाय हां ! प्राण गेलो तरी व्हऊचा नाय. ( महानंदा रडवेली होते. बाहेर जाऊ लागते. ) काय रडाचा तां आत्ताच रडान घे. पाठसून जल्मभर नको. हां.

बाबूल : तू पुन्हा शांतपणी विचार कर.

कल्याणी : ह्येतूर विचार कसलो ? उद्या गाव माझ्या तोंडात शेण घालतलो नाय ?

बाबूल : आज काय मोठं पेढेबर्फी वालतोय ? तुझ्याकडे कुणीही येतं...दोन घटकेसाठी—

कल्याणी : आमचो धर्मच आसा तो.

बाबूल : आणि हा 'पवित्र धर्म' तू मानूला देणार. ती तो आपल्या पोरीला देणार.

कल्याणी : पूर्वापारची रीतच आसा—

बाबूल : तुझा धर्म तुझ्याबरोबरच संपणार आहे. मी संपवणार आहे तो. आमचं एकमेकांवर प्रेम आहे.

कल्याणी : भाविणीक कधी प्रेम करूक इलां ? भाविणीचा प्रेम म्हणजे तेरड्याचो रंग.

बाबूल : तू आपल्यावरून मानूची परीक्षा करते आहेस. तिच्या प्रेमाची परीक्षा करायची ती तू नाही. मी करायची. एकच इच्छा आहे—तू समंजसपणानं आमच्या लग्नाला संमती दिलीस तर—

कल्याणी : नाय, तां जमाचा नाय हां !

बाबूल : मग तू म्हणतेस तेसुद्धा व्हायचं नाही !

[ बाहेरून ‘ आहेत ना घरात ? ’ अशी सोमजी मास्तरांची हाक ]

**कल्याणी :** सोमजीमास्तर ! या मास्तर.

[ सोमजीमास्तर आत येत– ]

**सोमजी :** भाचे अजून इथं ? उद्याचो बोट चुकणार बहुतेक...

**कल्याणी :** बोलतसो जुन्यो गोष्टी.

**सोमजी :** मानू कशी नाही इथं ?

**कल्याणी :** खंय गेला तां ? चला मास्तर, बाहेर बसूया आमी—

**सोमजी :** इथंच बसू की. भाचे उद्या जाणार. त्यांच्याशी बोलू जरा.

**बाबूल :** ( उठत ) येतो मी कल्याणी.

**सोमजी :** बसा हो. मग काय कल्याणीबाई, यांच्या आईला भेट काय दिली ?

**कल्याणी :** दितंय—

**सोमजी :** मानूला पाठवत नाही आहात ना ? नाहीतर मघाशी म्हटल्याप्रमाणे सुनेचीच भेट– ( हसतात. ) मनू रेगे म्याड होऊन जायचा हो मानू गेली तर. पोरीनं आधी त्याला वेडं केलं, आता मुंबईचं पाखरू आलं, त्याला पिंजऱ्यात अडकवलं.

**बाबूल :** मास्तर, जीभ लांब व्हायला लागलीय तुमची.

**सोमजी :** तू कोण ? जावई समजतोएस स्वतःला कल्याणीचा ?

**कल्याणी :** जावदे हो मास्तर.

**सोमजी :** नाही. मी विचारतोच याला. काय रे, मानूशी काय लग्नबिग्न करतोएस ?

**बाबूल :** हो करतोय. तू कोण विचारणार ?

**सोमजी :** मला...पोष्टमास्तरला ‘ अरे–तुरे ’ करतोस ?

**बाबूल :** खरं तर शिव्या द्यायच्या लायकीचा तू. इथं कल्याणीच्या घरी म्हणून सोडतोय तुला.

**सोमजी :** ( पुढे होत ) आता सांगून ठेवतो—

**बाबूल :** आणखी पुढं ये ना. तोंडातले उरलेसुरले दात घशातच घालतो तुझ्या.

[ सोमजीमास्तर थबकतात. बाबूल त्यांच्याकडे बघतो. महानंदा आत येते. ]

**सोमजी :** म्हणे लग्न करतोय ! देव कोपला तर पार वराणं उखडून टाकील.

कल्याणी : तांचं सांगतंय तेका.

सोमजी : वा रे पठ्ठे! म्हणजे सोमजीमास्तरनं केलेला अंदाज खरा ठरला.

कल्याणी : तेका भाऊ भटाची गजाल सांगी होतंय.

सोमजी : सांगा सांगा. कल्याणीबाई, परवा त्याची सुंद्री पोष्टात आली होती कार्ड घ्यायला. वाः अजून कशी ' ही ' दिसते. सगळं जिथल्या तिथं. ठसठशीत आणि मापशीर. आधी नजर जाते ती नेमकी तिच्या—

बाबूल : मास्तर, माझं अजून कल्याणीशी बोलणं व्हायचंय.

सोमजी : ठीक आहे. बोल तू.

बाबूल : अंहं ! तू गेल्यावर बोलायचंय... नीघ. नीघ आधी.

सोमजी : कल्याणीबाई, होतंय हे ठीक नाही. जड जाईल तुम्हांला.

कल्याणी : बाबूल—

बाबूल : हा मास्तरडा आधी बाहेर जाऊ दे. मग काय ते सांग. नाहीतर मी तरी जातो.

कल्याणी : इकडे आड आणि तिकडे विहीर—

महानंदा : मास्तर, तुम्ही जावं हे चांगलं. हे हिच्याशी बोलायला आले आहेत-मला देखील यांच्याशी—

सोमजी : ( बाहेर जाताना ) याच्या आधी तुझ्याकडे कोण कोण येत होतं ते सांगेन वेळ आली की.

[ सोमजीमास्तर पळ काढतात. बाबूल दार बंद करतो. ]

बाबूल : तू रागावली असशील कल्याणी.

कल्याणी : नाय बाबा. पण असा हां, पाण्यात रवान माश्याशी वैर कसा जमात ?

महानंदा : असा विषारी मासा गिळायला निघाला, तरी वैर धरायचं नाही ?

बाबूल : कल्याणी, मघाशी ' देवानं कमी केलं नाही ' म्हणत होतीस आणि हे असलं आयुष्य कवटाळून बसली आहेस... कुणीही यावं, तुझ्यावर मालकी गाजवावी.

कल्याणी : बाबूल, तू अधर्माचो विचार मनातलो काढून टाक हां ! अधर्मामुळे एकेकांचा काय काय झाला ऐकलंय मा ? ह्यो गोष्टी—

बाबूल : बोललीस त्या सगळ्या भाकड गोष्टी. तुझं स्वतःचं असं मत—

कल्याणी : देवाचा मत्त तां माझा मत्त.

बाबूल : मग तू राहा देवाला कवटाळून इथंच. मानू नाही राहायची.

कल्याणी : माझा ऐक. तू लग्नाच्या फंदात पडू नको. तिला पाडू नको. देवाचो कोप म्हणजे दगडावरली रेघ. माजी पोर मरणात गेली तरी माका चिंता नाय. माका चिंता तुझ्या भल्याची ! अरे, दुर्गीचो, माझ्या बालमैत्रिणीचो झील तू. शिकलोसवरलेलो. देवान तुझा बरावाईट केला, तर मग गावात रवाक नको माका. तुज्या मामाक माका तोंड दाखवक नको. त्यापरीस तू तुझ्या जातीतली बरी मुलगी कर. आमका लग्नाक बोलाय. मानूक एक कापाडचोपाड दी म्हणजे मग सगळा पावला.

बाबूल : लुगडं चोळी ? मानूला मी मंगळसूत्र घालणार आहे.

कल्याणी : हिका मेलीक काय सोना चिकटलंसां ?

बाबूल : मी सोन्यासाठी करत नाही लग्न.

कल्याणी : आणि एक स्पष्ट सांगतंय. देवाकडे पुढो करून. तुजी इच्छा असली तर तू वर्षातून दोनदा येणांजाणां कर. तिका पेजेपुरतां काय ना काय दी. तुज्या घरकारणीची जुनेरी दिलीत तरी चलात. देवाच्या साक्षीन ती तुजी रवात. अगदं तुझी. मी सक्त नजर ठेवीन. तिका तू तशी ठेयलंय तर देव नको म्हणना नाय. पण लग्नाचो विचार डोक्यातलो काढून टाक.

[ कल्याणी आत जाऊन नारळ घेऊन येते. ]

कल्याणी : हो नारळ घे. देवापुढे ठेवून नेम कर. ह्येच्याशी लगीन करणार नाय, पण नेमान येणांजाणां ठेवीन म्हणून सांग. देवाची कृपा रवात. लाव हात नारळाक.

बाबूल : असू दे.

कल्याणी : माजो म्हणून घेत नाय ? अरे, तुज्या मामाचोच नारळ तो. घे आणि नेम कर.

[ बाबूल नारळ घेतो. ]

बाबूल : देवा खळनाथा, मानूला शब्द दिलाय. करीन तर तिच्याशील लग्न करीन. तुला बजावून ठेवतो. तू कल्याणीला बजाव. मानू, तू हात लाव नारळाला.

कल्याणी : मानू—

[ महानंदा पटकन नारळाला हात लावते. नमस्कार करते. ]

महानंदा : देवा, तुझी कृपा असू दे.

[ बाबूल महानंदाला खूण करतो. दोघे कल्याणीच्या पाया पडायला जातात. कल्याणी रागारागाने बाहेर जाते. ]

कल्याणी : ( जाता जाता ) नाय. नाय. ह्यां जमाचां नाय. ( जाते. )

[ स्तब्धता ]

महानंदा : काल रात्रभर हेच चाललं होतं तिचं.

बाबूल : मग बोलली नाहीस तसं आधी ?

महानंदा : उगाच एक वेडी आशा होती. तुमचं ती ऐकेल. पण ती हट्टी आहे. आता डोक्यात राख घालून बसेल.

[ स्तब्धता ]

बाबूल : काही काळजी करू नकोस. तुला काय वाटतंय सांग.

महानंदा : मी तुमचीच आहे. म्हणत असाल तर आत्ता येते तुमच्याबरोबर. पुढं मग आपण आणि आपलं कर्म. देवाला पटलं तर सुखी होऊ. नाहीतर येतील भोग ते सहन करू.

बाबूल : तुझा सुद्धा आला का देव ?

महानंदा : दुसरा मार्गच कुठंय मला ? भाबीण संकटात सापडली की देवाकडेच कौल मागणार.

बाबूल : देवाकडे कौल ?

महानंदा : हो. ( एकदम ) मागायचा आपण ?

बाबूल : काही गरज नाहीए त्याची.

महानंदा : देवानं होकारी कौल दिला तर तेवढाच धीर येईल. ( तिथल्या देवाच्या तसबिरीकडे बघत ) घेता कौल ? घ्या ना. माझ्यासाठी तरी.

बाबूल : तुझ्या आग्रहासाठी घेऊ हवा तर. तुला सांगू मानू ? देवाचीदेखील ताकद होणार नाही आपल्या प्रेमाला नकार द्यायची. देवाचा कौल नाही, मी आपल्या प्रेमाची शक्ती बघेन आता. जाऊन फुलं आण दोन. याच देवाला कौल लावू.

महानंदा : पण—

बाबूल : आता काय पण ? आता माझा आग्रह आहे. आपल्या प्रेमाची शक्ती बघायचा.

महानंदा : सांगू का! कौल मिळेपर्यंत काळीज असं उडत राहतं... तुम्ही कौल घ्या, पण मी नाही इथं थांबायची.

बाबूल : आता काळीज उडेल ते देवाचं. कौल मिळाला, की कल्याणीला सरळ सांगतो.

महानंदा : जीव गेला तरी पटणार नाही तिला.

बाबूल : कौल होकारी आला तरी?

महानंदा : भाविणीला कधी होकारी कौल दिलाय देवानं?

बाबूल : प्रेमानं तरी दिलाय ना? तू जाऊन आधी फुलं आण बघू.

महानंदा : पण मी राहाणार नाही हं इथं, कौल घेताना. ( जाते. )

बाबूल : वेडी! ( हसतो )

[ महानंदा फुले घेऊन येते. ]

महानंदा : मी बाहेर उभी राहाते. तुम्ही आणि तुमचा कौल. ( जाते. )

[ बाबूल क्षणभर विचार करून तसबिरीला दोन फुले लावतो. ]

बाबूल : देवा परमेश्वरा, महानंदेवर माझा जीव आहे. तिच्याशी मला संसार करायचाय. तुझी कृपा हवीय आम्हांला.

महानंदा : ( बाहेरून ) लावलात कौल?

बाबूल : नाही अजून.

महानंदा : ( बाहेरून ) कौल लावू नका हो. उगाच उलटा आला तर—

बाबूल : नाही येणार. मी सांगतो. तुला बघायची आहे का परीक्षा?

महानंदा : ( बाहेरून ) नाही. नाही!

बाबूल : मग थांब थोडीशी. ( देवाला नमस्कार करतो. डोळे मिटतो. ) देवा, मी कौल मागतोय. आमच्या प्रेमासाठी. होकारी असेल तर उजव्या हाताचं फूल खाली टाक. ( डोळे मिटलेलेच. )

महानंदा : ( बाहेरून ) काय झालं?

[ बाबूल डोळे उघडतो. डाव्या बाजूचे फूल खाली पडते. तो विषण्ण होतो. पुन्हा फूल लावून दुसऱ्यांदा कौल घेण्याचा विचार करतो. इतक्यात दार वाजते. तो पटकन उजवे फूल खाली टाकतो. ]

महानंदा : ( दारातून ) घेतला प्रसाद?

बाबूल : अं! हो. घेतला. हे बघ उजवीकडलं फूल पडलंय.

महानंदा : ( आनंदून नमस्कार करते. ) खरंच कौल होकारी आला? बाहेर उभी राहून सारखं नाव घेत होते खळनाथाचं. इतकी मनोभावे सेवा केलीय त्याची आणि तितकाच मनोभावे जीव लावलाय तुमच्यावर. पावल्याशिवाय राहायचा नाही तो.

बाबूल : मानू—

महानंदा : अं ?

बाबूल : तरी आपण लग्न करायचं !

महानंदा : 'तरी' म्हणजे ?

बाबूल : अं ! कल्याणी नाही म्हणाली तरी.

महानंदा : देवानं प्रसादच दिलाय. आता होईल ते चांगलंच होईल.

बाबूल : उद्या मुंबईला गेल्यावर आईला सांगतो. काही असलं तरी नाताळात येऊन तुला घेऊन जातो.

महानंदा : येईन मी.

बाबूल : येण्याआधी तुला पत्र पाठवतो.

महानंदा : नको.

बाबूल : का ?

महानंदा : तो म्हातारडा सोमजी, पत्र फोडून वाचेल. आईला, मामांना सांगेल.

बाबूल : मग कसं कळणार तुला ? मी केव्हा येणार, तू मला कुठं भेटायचं, आपण कसं पळून जायचं—

महानंदा : प्रश्नच आहे.

बाबूल : हं—

महानंदा : त्या कुत्र्याला तुम्ही उगाच काठी मारलीत मघाशी.

[ दोघे विचारात पडतात. मग— ]

बाबूल : आपण तरी बावळटच.

महानंदा : का ?

बाबूल : अगदी सोपी गोष्ट आहे. मी लखोबाच्या नावानं पाकीट धाडीन. म्हणजे सोमजीमास्तरला संशयच यायला नको. जाताना लखोबाला सांगून ठेवीन. तुझ्या नावाचं पाकीट आलं पोस्टातून की लगेच धावत जाऊन मानूला दे.

महानंदा : देईल ना तो ?

बाबूल : जाताना पोरांसाठी त्याला दहा रुपये देऊन ठेवतो. तो विश्वासानं हे काम करील.

महानंदा : मामा-मामींना—

बाबूल : तो नाही बोलणार. बजावून ठेवीन मी. पत्र आलं, की गुपचूपपणे सगळी तयारी करून ठेव. सांगितल्या ठिकाणी भेट. ( विचार करतो. खिशातून पैसे काढतो. ) हे पन्नास रुपये ठेव तुला.

महानंदा : तसे थोडे आहेत माझ्याजवळ.

बाबूल : थोडे पुरले नाहीत तर ? हे असू देत. लग्न झाल्यावर हिशेब मागून घेईन मी.

महानंदा : आपण लग्न कुठं करायचं ?

बाबूल : ते मी ठरवून ठेवीन. इथून पळालो, की लगेच दुसऱ्या दिवशी लग्न.

महानंदा : ( आनंदून ) मी तुम्हांला खूप सुख देईन. दासीसारखी सेवा करीन तुमची.

[ दोघे जवळ येतात. कल्याणीची 'मानू गो' म्हणून हाक येते. मागून कल्याणी आत येते. ]

कल्याणी : ह्या बब-दुर्गीकडे ही गोष्ट मातर बोलू नको हां ! देवधर्म मानणारी बाई असा ती. कधी जमात तेव्हा दोन ओळीचा पत्र टाक. तिची खबर कळव.

बाबूल : बरं.

कल्याणी : जीव रवणां नाय म्हणून पुन्हा पाया पडून सांगतंय. देवाचो कोप—

बाबूल : सांगायची काही गरज नाहीए. देवाची शपथ घेऊन सांगायचं ते सांगितलंय मी.

कल्याणी : चल गो मानू. रेग्याचो मनू येवचो आसा.

[ बाबूल रागाने निघून जातो. नंतर कल्याणी जाते. मागून महानंदा. तसबिरीवरील डावं फूल खाली पडतं. ]

काळोख...

## अंक दुसरा
## दृश्य दुसरे

[ नाताळचे दिवस. कल्याणीचे घर. वेळ संध्याकाळची. बाहेरून मनू रेगे येतो. ]

**मनू** : आहे का कुणी घरात ? ( आतून उत्तर नाही. इकडेतिकडे बघतो. मग ) कल्याणीबाई—

**कल्याणी** : ( आतून ) कोण रे ?

**मनू** : मी. मनू रेगे.

[ कल्याणी बाहेर येते. ]

**कल्याणी** : पाठच्या दाराक शेंगो काढून घेय होतंय !

**मनू** : सोमजीमास्तर आहेत इथं ?

**कल्याणी** : नाय बा. अजून नाय इले.

**मनू** : अरेच्या !

**कल्याणी** : काय काम होता ?

**मनू** : तसं नाही. दोनदा घरी येऊन गेले कालपासनं. म्हणून शोधतोय. घरी नाहीत. तेव्हा म्हटलं इथं पाहून जावं.

**कल्याणी** : बस रे.

**मनू** : वेळ कुठंय बसायला ? नाताळ चालू झालाय ना ? दुकानावर किरिस्तावांची खरेदी चाललीय, नुसत्या कालच्या दिवसात दोनशाची विक्री झाली.

**कल्याणी** : बरां झाला. म्हणतंत ना, पैशाकडे पैसो जाता. आधीच तू पैशेवालो, तेतूर—

**मनू** : पण माझा खर्चसुद्धा तसाच असतो.

**कल्याणी** : असतलोच ! तुझो हात असो वरच असता सदाचो. ह्येका ह्यां दी, त्येकां तां दी—

**मनू** : पण त्या देण्याचं काही चीज होत नाही.

**कल्याणी** : असा कसां ? देव काय झोपलोसा ?

मनू : तुझ्या मानूचंच बघ की. तिला द्यायला काही ना काही आणतो, पण वाऱ्याला उभी राहात नाही.

कल्याणी : तुका लाजता रे तां ! पोरवय आसा अजून.

मनू : पोरवय ? आणि दिवाळीत मामीचा बाबूल आला होता तेव्हा ?

कल्याणी : ( हसत ) तुला कळणांच नाय बघ.

मनू : त्यात काय कळायचं आहे ?

कल्याणी : असा हा बाबा. मामाच्या आधारान आम्ही दोन वेळेक पोट भरतंव. त्यांच्या भाच्याक् तोडून कसा चलात ?

मनू : सोमजीमास्तर तर म्हणत असतात—

कल्याणी : जळला मेल्याचा तोंड. दोघां बोलताना दिसली तरी हो म्हणणार, दोघां झोपली होती. त्येचा काय तू ऐकू नको. मानू तुझीच आसां. देवाक स्मरून सांगतंय.

मनू : तुझी खात्री आहे ग मला. पण मानूचं काय ? बाबूल तर म्हणे लग्न करतोय तिच्याशी.

कल्याणी : मुंबैयचो पोर तो. नुसती बोलण्यात हिंमत. इतक्या असता तर दोन महिन्यात त्याचा पत्र नसता इला मानूक ?

मनू : आलंसुद्धा असेल. तुला कसं कळणार ?

कल्याणी : डोळ्यांत तेल घालून बघतय मामी ! माझां पोर काय असा वाटेत पडलासा चाकरमान्याक देऊक ? तुका सांगतंय, सोमजीमास्तरच्या बोलण्यावर जाऊ नको तू ! माझा प्वार म्हणजे शंभर नंबरी सोना आसा सोना !

मनू : पण हा सोमजीमास्तर माझ्याकडे फेऱ्या कशाला मारतोय कालपासून ?

कल्याणी : पैशे मागतलो. त्येचो पगार तो काय ? आण्याची भजीदेखील आणणां नाय कधी !

मनू : ( उठत ) त्याला गाठून तर बघतो.

कल्याणी : बघ बापडो. नायतर रावताच्या दुकानात बघ ! भजी खात बसलो असतलो. दुकानात बातम्यो मिळतात मा एकेक ? थंय जाऊन बघ.

[ मनू जातो. क्षणभराने महानंदा बाहेर येते. वाळलेल्या कपड्यांच्या घड्या घालते. ती अस्वस्थ आहे. वाट बघतेय. कल्याणी तिला निरखून बघते. महानंदा आत जाणार एवढ्यात ]

कल्याणी : मानू गो ?

महानंदा : काय ?

कल्याणी : आत्ता मनू रेगो इल्ललो.

महानंदा : आला असेल.

कल्याणी : त्याका मी शब्द दिलसंय हां—

महानंदा : मी काय जड झालेय तुला ?

कल्याणी : तसा नायगो. पण आपलो धर्म असा तो.

महानंदा : तुला मी रोज सांगतेय—

कल्याणी : आणि मीपण रोज सांगतय तुका. त्या बाबूलाक विसर आता. मुंबैयचो चाकरमानो तो. काम झाला की कानार हात ठेवतलो. आपली भाविणीची जात. लगीन न्हालो तर रवळनाथाचो कोप होणार. त्यापरीस मनू काय दितां तां घे ! आणि माझ्या पाठी देवांची सेवा कर.

महानंदा : आता तर जमणारच नाही मला.

कल्याणी : 'आता तर' म्हणजे ? अशी समोर ये मानू.

महानंदा : कशाला ?

कल्याणी : कित्याक म्हणजे ? बरी बघून घेतंय—

महानंदा : म्हणजे ?

कल्याणी : काय गडबड नाय मा ? परवा रावताकडली भजी खाइनसारखी झाल्ली तुका—

[ महानंदा रागाने आत जाते. ]

कल्याणी : ( स्वतःशीच ) देवा रवळनाथा, आता तूच निस्तरणार रे बाबा.

[ कल्याणी उठते. एवढ्यात मामा घाईघाईने येतात. ]

मामा : कल्याणी—

कल्याणी : कोण ? मामा ?

मामा : कसले डाव खेळत बसली आहेस ?

कल्याणी : ( हसत ) डाव खेळूक इकडे पत्तो असा कुणाचो ?

मामा : हासू नकोस. रेग्याचा कार्टा आत्ता बोलला म्हणून वळलो.

कल्याणी : काय बोलल्लो तो शाहणो ?

मामा : बाबूलच्या लग्नाची मोठी धावपळ चाललीय तुझी.

**कल्याणी :** विचारल्यात नाय त्याका? बाबूलच्या लग्नाची धावपळ करणारी कल्याणी कोण म्हणून?

**मामा :** मी तुला बजावलंय, कल्याणी!

**कल्याणी :** एकदा नाय. दहा वेळा बजावलात तुमी आणि मीपण दहा वेळा सांगलंय. बसा इल्यासारखे.

**मामा :** (बसत) नसती झांगटं एकेक.

[क्षणभराने] तेव्हा इथं यायचा तो?

**कल्याणी :** आपलो कधीमधी. जाताना त्याच्याबरोबर दुर्गीक भेटसुद्धा पाठवली मी.

**मामा :** त्याचं इथं पत्रबित्रं?

**कल्याणी :** छ्या! भेट मिळाली का नाय तां सुद्धा कळयला नाय. बसा. तुमका तरी त्येचा पत्रबित्र?

**मामा :** (बसत) मी दोन पत्रं पाठवली होती. आता नोकरी आहे. लग्न करून घे म्हणून. त्याचं परवा एक कार्ड आलं नागपूरहून.

**कल्याणी :** नागपूर? म्हणजे?

**मामा :** नागपूरला बदली करून घेतलीय ना?

**कल्याणी :** असा असा! आमका खबरच नाय!

**मामा :** कल्याणी, बाबूल मानूशी तर लग्न करायना नाही? मनात सारखी शंका डोकावतेय.

**कल्याणी :** मानूशी? नाय बा.

**मामा :** तुला सगळं ठाऊक असणार.

**कल्याणी :** मी तर मनू रेग्याक बोलून बसलंय. चांगलो घरंदाज पैशेवालो आसा. त्येच्या मनातसुद्धा मानूबद्दल माया आसा.

**मामा :** माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही दिलंस. (कल्याणी काही न कळल्यासारखा चेहरा करते.) तुला रवळनाथाची आण आहे. काय ठाऊक असेल ते सांग बाबूल आणि मानूबद्दल.

**कल्याणी :** तो ढीग म्हणी होतो लग्नाचां! पण मी शाप सांगितलां. म्हटलां, हो विचार खरो नाय. सोडून दी तो.

**मामा** : ( सुस्कारा सोडतात. ) हं—त्याचं मानूला काही पत्रबित्र ?

[ स्तब्धता ]

**कल्याणी** : नाय. मी नजर ठेवून आसंय.

**मामा** : कल्याणी, माझं खाऊन तू जगते आहेस. असा काही फांदा घातलास—

**कल्याणी** : देवाशपथ नाय हो—

[ स्तब्धता ]

**मामा** : हे लग्न मला पसंत नाहीए, कल्याणी.

**कल्याणी** : आणि भाका काय पसंत आसा म्हणून तेका ' नाय ' म्हटलां ?

[ एवढ्यात सोमजीमास्तरांची ' कल्याणीबाय ' —अशी हाक ऐकू येते. ]

**मामा** : हा म्हातारडा कशाला येत असतो इथं ?

**कल्याणी** : सोमजीमास्तर ना ? घरी एकटो असता. वेळ गावतो की येता गोष्टी बोलाक. आता नाय तरी कसा सांगाचा ?

[ सोमजीमास्तर येतात. ]

**कल्याणी** : या मास्तर.

**सोमजी** : कशा आहात कल्याणीबाई ?

**कल्याणी** : चाललंय.

**सोमजी** : ( मामांना ) वा ! अलभ्य लाभच म्हटला पाहिजे. मामांची भेट होतेय—

[ महानंदा आतून पणत्या लावून आणते. मांडते. ]

**सोमजी** : आमची मानू काय म्हणतेय ?

**कल्याणी** : काय नाय.

[ महानंदा आत जाताना– ]

**सोमजी** : काय ? नाताळ आला ? नाताळ म्हणजे मोठा महत्त्वाचाच. काय मामा ?

**मामा** : मी काही किरिस्ताव नाही.

**सोमजी** : तरीसुद्धा.

**मामा** : तुमच्या बोलण्याचा अर्थ नाही कळला.

सोमजी : ( हसतात. ) नाही कळला तर नको कळू दे. यंदाचा नाताळ विशेष दिसतोय, मानू !
कल्याणी : विशेष म्हणजे ?
सोमजी : पण दिसते आहेस खूप आनंदात.
कल्याणी : आनंद कसलो इलो हा ?
सोमजी : ते तिचं तिला ठाऊक. काय मामा ? कल्याणीबाई, मानू आताशा सुधारलेली दिसतेय.
कल्याणी : तिचां वयच आसा सुधारण्याचां, मास्तर ?
सोमजी : सुधारण्याचं वय, तेच बिघडण्याचं वय. काय मामा ? हो ! बरी आठवण झाली. तुमचा भाचा कसा काय आहे ?
मामा : ठीक आहे.
सोमजी : दिवाळीत गाठ पडली होती त्याची.
मामा : हं—
सोमजी : बोलायला बाकी एकदम तेज आहे हं...
मामा : प्रोफेसर आहे—
सोमजी : हल्ली नागपूरच्या कॉलेजात असतो ना ? ( महानंदा दचकते. )
मामा : तुम्हांला कसं माहीत ? इथून गेल्यावर तर त्यानं बदली करून घेतली.
सोमजी : उगाच नाही मी पोस्टमास्तरच्या हुद्यावर चढलो !–का मानू, तूच सांगत होतीस ग बदलीचं ?
महानंदा : मी ? त्याची नागपूरला बदली झालीय हे आत्ता ऐकतेय मी.
सोमजी : आश्चर्य आहे ! तुझा गुरु ना तो ?
मामा : म्हणजे ?
सोमजी : दिवाळीच्या सुट्टीत हिला त्यानंच शिकवलं सगळं !
महानंदा : आई, मी देवळात जातेय. तुम्ही काही वाट्टेल ते बोला मग.

[ महानंदा रागाने बाहेर जाते. ]

मामा : मास्तर, तुमचा तोल सुटतोय हां !
कल्याणी : मास्तर, च्या घेतल्यात ?
सोमजी : नको.

[ स्तब्धता. सोमजीमास्तर मामांकडे पाहून हसतात. ]

**सोमजी** : कल्याणीबाय, पिंगुळीच्या बहिणीचं पत्र आलं होतं, त्याला उत्तर गेलं का नाही ?

**कल्याणी** : मानून पाठयलां —

**सोमजी** : नाव काय तुमच्या पिंगुळीच्या बहिणीचं ?

**कल्याणी** : सरस्वती.

**सोमजी** : हां ! सरस्वती–सरस्वती–

[ स्तब्धता ]

**कल्याणी** : ( मामांना ) पिंगुळीक आठ दिस विश्रांतीक ये म्हणून बोलावता सारख्या. माका आणि मानूक.

**मामा** : मग जाणार आहेस ?

**कल्याणी** : जाणार कशी देवाचे पाय सोडून ?

**सोमजी** : बहिणीला वाईट वाटेल.

**कल्याणी** : वाटतलाच, पण इलाज नाय.

**सोमजी** : मानूला ठेवा इथं. देवाच्या सेवेला.

**कल्याणी** : तरणीताठी पोर एकटी कशी रवात ?

**सोमजी** : हां ! ते खरंच. आणि तुम्ही गेला तर–( मामांकडे बघत ) इथं येणारा आहे, त्याची पंचाईत व्हायची. नाही का मामा ? ( मामा गप्पच. रागावलेले.) जाऊ दे. दुसरं काहीतरी बोलू या. तुम्हांला पाहून मुद्दाम वळलोय इथं—

**मामा** : कशासाठी ?

**सोमजी** : सांगतो. सांगतो. कल्याणीबाय, यांचा भाचा एक हुशार, तर सोमजी-मास्तर दहा हुशार आहे म्हणावं. माझ्यापुढं गमज्या दाखवत होता.

**मामा** : मास्तर—

**सोमजी** : ऐका माझं आधी. तुमचा भाचा मानूशी लग्न करतोय तुम्हांला माहीत आहे ?

**मामा** : शक्य नाही.

**कल्याणी** : काय लगीन करीत ?

**सोमजी** : लफडं एकदा चालू झालं, की ब्रह्मदेवाच्या बापाचंसुद्धा कुणी ऐकत नाही. मामांची फूस असेल.

**मामा** : माझी फूस ? उलट मी त्याला पत्रं लिहिली. जातीतल्या मुलीशी लग्न कर.

**कल्याणी :** मास्तर, तुम्ही मनू रेग्याच्या कानातदेखील ह्यां विष ओतलास.

**सोमजी :** मग ? तो गधडा तुझ्या पोरीवर पैसा ओतत होता.

**मामा :** तुम्ही एकाचं दोन करणारे–

**सोमजी :** जरा दम खा. सगळं दाखवतो. हा सूर्य आणि हा जयद्रथ. तुमचा भाचा रांडीचा मला दम भरत होता. पण त्याचं वारसं जेवून बसलाय हा सोमजीमास्तर. डूक धरीन तर दंश केल्याशिवाय सोडणार नाही. हां.

**मामा :** आता एकदा सरळ काय ते सांगून टाका. हे लग्न मला नकोय. कल्याणीला सुद्धा नकोय.

**सोमजी :** मानूला तुमच्या भाच्याचं पत्रं आलंय.

**कल्याणी :** कधी ? मी तर सारखी नजर ठेवून बसलंय. रवळनाथाची शपथ खातंय.

**सोमजी :** रवळनाथ राहिलाय देवळात आणि पत्रं पडली आहेत मानूच्या हातात.

**मामा :** ऑं ? पत्रं ?

**कल्याणी :** कधी ?

**सोमजी :** भाच्यानं लखोबाच्या नावावर दोन पत्रं धाडली. लखोबाला पत्रं आलेली पाहून मला शंका आली. फोडली पत्रं आणि वाचली.

**कल्याणी :** काय होतां पत्रात ?

**सोमजी :** सगळा चावटपणा. दिवाळीत केला तो पत्रात लिहिला. लिहिलं होतं, घरून आई लग्नाला नाही म्हणाली. म्हणून नागपूरला बदली करून घेतलीय. आणि आता जे तिसरं पत्र आलंय ते महत्त्वाचं.

**मामा :** म्हणजे ?

**सोमजी :** लग्नाचं नक्की झालंय. दोघं पळून जाऊन लग्न करताहेत, नाताळच्या सुट्टीत.

**मामा–कल्याणी :** ऑं ? कधी ?

**सोमजी :** का ? अक्षता टाकायला जायचंय जोडप्यानं ? (खिशातून पत्र काढतात.) हे ते महत्त्वाचं पत्र.

**मामा :** बघू दे ?

**सोमजी :** नको. मी बघतो. (वाचतात.) 'माझ्या खूप लाडक्या मानू' …काय, कसा आहे मायना ?

**मामा :** पुढं वाचा.

**सोमजी** : माझं काय वाचन घेताय? महत्त्वाचा मजकूर ऐका... हं... रविवारी सकाळी तू गुपचूपपणे परस्पर बंदरावर ये. तिथून आपण पळून जाऊ आणि लग्न करू. नागपूरला चांगली जागा घेतली आहे. येताना तुझ्यासाठी पातळे आणि बांगड्या आणत आहे. सोन्याचं मंगळसूत्रही घेतलं आहे... पुढं सगळा फाजीलपणा आहे...

**मामा** : रविवारी म्हणजे?

**सोमजी** : उद्या! आज शनिवार...(पत्रात बघत) उद्याचीच तारीख आहे.

**कल्याणी** : पत्र मिळाल्याबरोबर तुम्ही लगेच सांगूचा नाय येऊन? कार्टीक पिंगुळीक धाडली असती.

**सोमजी** : अजून धाडा. लगेच धाडत असाल तर सोबतीला मी आणि मनू रेगे जातो.

**मामा** : पण आता वेळ कुठंय?

**सोमजी** : म्हणून त्या गाढवाला धुंडाळत होतो. रेग्याला. त्याला गाडी तयार ठेवायला सांगून इथं येणार होतो मानूची उचलबांगडी करायला. अजून जमेल. ढांगेवर पिंगुळी. म्हटलं, योग्य वेळी अडसर घालून दार बंद करावं.

**कल्याणी** : पण ह्यां खरां की—

**सोमजी** : त्याच्या मागल्या पत्रात होतं, तू तयारीत राहा. दिवस आणि वेळ पुढल्या पत्रात कळवतो. म्हणजे या पत्रात. मामा, एक करा. आत जाऊन मानूनं ट्रंक म्हणा, पिशवी म्हणा, भरून ठेवली आहे की नाही ते बघून या.

**कल्याणी** : नाय म्हटलां तरी माका संशय होतोच—

[ महानंदा बाहेरून येते. ]

**सोमजी** : या मानूबाई. झाली देवाची भेट?

[ महानंदा रागाने आत जाऊ लागते. ]

**कल्याणी** : थांब गो—

**महानंदा** : का?

**कल्याणी** : तुझी गडबड कसली चललीसा?

**महानंदा** : काय नाय.

**मामा** : हे सोमजीमास्तर काय म्हणताहेत?

**महानंदा** : माका काय माहीत?

**मामा** : मास्तर, तुम्हीच विचारा.

सोमजी : लखोबा केव्हा भेटला होता मामांचा?
महानंदा : लखोबा काय? आज सकाळीसुद्धा आला होता. नारळाची गोण घेऊन.
सोमजी : तशी नाही तू दाद देणार. लखोबानं तुला किती पत्रं आणून दिली?
महानंदा : पत्रं?
सोमजी : हो! पाकीट आहे नागपूरहून आलेलं.
कल्याणी : गधडे, माझी नजर चुकौन—
महानंदा : खोटं आहे.
सोमजी : तुला मायना सांगू पत्रातला? माझ्या खूप लाडक्या मानू—

[ महानंदा जाऊ लागते. ]

मामा : जाऊ नकोस, आधी उत्तर दे. बाबूलची तुला किती पत्रं आली?
महानंदा : दोन.
सोमजी : नाक दाबलं की तोंड उघडतं. आता पुढं. गेल्या पत्रात त्यानं काय लिहिलं होतं?
महानंदा : तुम्ही वाचलंय ना ते चोरून?
कल्याणी : जास्त बोलूचा काम नाय.
सोमजी : केव्हा पळून जायचं, कुठं भेटायचं–आलंय कानाही ते पत्र? रांडीचे माझ्याशी अढीबाजी करत होते.
कल्याणी : मास्तर म्हणतंत तां खरां आसा?
महानंदा : हो, खरं आहे.
मामा : हे लग्न होणार नाही.
कल्याणी : देवाचो कोप होईत.
महानंदा : वाटेल ते होऊ दे. आम्हांला पर्वा नाही त्याची.
कल्याणी : तू कसा पळतंय तांच बघतंय.
मामा : लखोबाला पैसे चारले आहेत तुम्ही. तो चोर तुम्हांला सामील.
सोमजी : मामा, वाद कशाला? आपण करायचं ते करू. आम्ही मानूला पिंगुळीला घेऊन जातो. तो बसू दे बोंबलत.
महानंदा : नाही.. नाही. मी कुठंही जाणार नाही. त्यांना मी वचन दिलंय.
सोमजी : तू सगळंच दिलं आहेस त्याला. कल्याणीबाई, हिला आलंसुद्धा असेल पत्र. अमक्या दिवशी तमक्या ठिकाणी पळून ये. येताना मी तुझ्यासाठी

पातळ, बांगड्या, मंगळसूत्र आणतो...बांगड्या का ? तर मागे जत्रेच्या रात्री हिच्या बांगड्या त्यानं पिचवल्या होत्या.

**महानंदा :** त्यांचं पत्र आलंय ?

**महानंदा :** तुमच्या लखोबाला विचार ना. ( हसतात. ) आता बस म्हणावं तुझ्याच हातात बांगड्या भरून. कल्याणीबाई, मामा, पिंगुळीचं पक्कं करून टाकायचं आपण. मी जाऊन मनू रेग्याची गाडी घेऊन येतो पिंगुळीला जायला. बरंय मामा. मानू, ओळख असू द्या म्हटलं गरिबाची. ( जातात. )

**कल्याणी :** गधडे, काळा फासलंय आमच्या तोंडाक ! म्हणा, भजी खाऊची वाटतंत. विचारला, तशी काय गडबड नाय मा ? तर गप बसली. आता तरी बोल गधडे. ( महानंदा गप्पच. )

**मामा :** मानू, कल्याणीला उत्तर दे. तुला बाबूलपासून दिवस नाही ना गेलेले ?

**महानंदा :** गेलेले आहेत.

**कल्याणी :** ( कपाळावर—हात मारत ) जळ्ळं माझा कर्म !

**मामा :** तू सारे म्हणत होतीस–

**कल्याणी :** कसलां काय आणि कसलां काय.

**महानंदा :** तुझ्या पाया पडते, आई. इतकं झालंय. देवानं आम्हांला कौल दिलाय. आता तू मोडता घालू नकोस. त्यांना आणि मला दुःखी करू नकोस. इथून गेले की मी आणि माझं नशीब. तुझ्या घराची पायरीपण चढणार नाही.

**मामा :** देवाचा कोप झाला तर—

**महानंदा :** तो प्रसाद म्हणूनच आम्ही सहन करू...पण आताची वेळ गेली, तर जन्मभर रडत बसावं लागेल ग आम्हांला.

**मामा :** ते काही नाही. आता मनू रेग्याची गाडी येईल, तुला पिंगुळीला गेलं पाहिजे.

**महानंदा :** मामा, पाय धरते मी तुमचे... केलंय ते मनाला स्मरून, पुण्य म्हणूनच केलंय.

**कल्याणी :** एक चकार शब्द बोलू नको. गपचूप पिंगुळीक चल—

**महानंदा :** त्यांचं पत्र आलं नाही ना ? ते तरी सांगा.

**मामा :** नाही आलेलं.

**महानंदा :** मग मला का पिंगुळीला धाडताय आत्ताच ? - की आलंय पत्र ?

**मामा :** आलं असेल नाहीतर नसेल. नाताळची सुट्टी आहे. बाबूल केव्हाही

यायचा इथं तुला न्यायला. तू इथून जावंस हे सगळ्यांच्या भल्याचं.

[ इतक्यात लखोबा येतो. मामांना बघून तसाच पळणार तोच– ]

**मामा :** ( रागाने ) लख्या, आधी समोर उभा राहा.

**लखोबा :** का ... काय धनी ?

**मामा :** आत्ता इथं कशाला आला आहेस ?

**लखोबा :** काही न्हाई...काही न्हाई.

**मामा :** तुला तुझ्या पोराची आण आहे. खरं काय ते बोल. गोष्टी गळ्यापर्यंत आल्या आहेत.

**लखोबा :** धाकल्या धन्यांची चौकशी करायला आलो होतो.

**मामा :** कशाला ?

**कल्याणी :** पोराबाळांची आण घातलीसा. सगळां सांगून मोकळो हो.

**लखोबा :** धाकले धनी मानूला नेऊन लग्न करणार होते. अजून पत्र नाही म्हणून-

**मामा :** तुलाच काळजी ना त्याची ! आता थांब इथंच. मानूला पिंगुळीला धाडायचंय आत्ता.

**लखोबा :** पण धाकले धनी आले म्हणजे ?

**मामा :** म्हणूनच तोडगा आहे हा.

**महानंदा :** मामा, आई, माझ्यावर दया करा. हवी तर मी आत्ता निघून जाते.

**कल्याणी :** खंय ? मसणात ?

**महानंदा :** बंदरावर जाऊन त्यांच्या बोटीची वाट पाहात बसते.

[ कल्याणी महानंदेला धरते. मामांना खूण करते. दोघे महानंदेला धरतात. ]

**महानंदा :** लखोबा, ते आले की कळव मला पिंगुळीला लगेच.

**मामा :** लख्या, हाललास तर तंगडी तोडून ठेवीन.

[ इतक्यात सोमजीमास्तर आणि मनू रेगे येतात. गाडीचा आवाज. ]

**सोमजी :** सोळा आणे काम झालं. मनूची रस्त्यातच भेट झाली. तो येतोय पिंगुळीला.

**कल्याणी :** देव पावलो रे मनू.

**मनू :** मघाशी म्हणत होतीस पोरगी शंभर नंबरी सोनं आहे.

**कल्याणी :** आता माका रे ह्यां काय ठाऊक ?

**मनू :** म्हणाली, सोमजीमास्तरच्या शब्दावर विश्वास ठेवू नको. त्याला दोघं

बोलताना दिसली तरी तो म्हणेल, दोघं झोपली–

**कल्याणी :** ती आपली गंमत रे.

**सोमजी :** असं ? मग ती गंमत तुमची तुम्हीच करा. सोमजीमास्तर निघाले.

**कल्याणी :** नाय हो मास्तर, हो मनूच तुमच्याबद्दल कायतरी बोलली.

**सोमजी :** हा रेग्या ना ? रांडेच्याला मानू मिळावी म्हणून मी झटतोय. ( जाऊ लागतात. ) मरा. तुमचं तुम्ही वाटेल ते करा ना–

**कल्याणी :** मास्तर, मी इकडे संकटात–आणि तुम्ही जाऊन कसा चलात ? आता वेळ घालवू नकात. काय तरी मार्ग काढा.

**सोमजी :** मार्ग एकच. पिंगुळीचा. आत्ता ह्या मिनिटाला मानूला गाडीत घालायची मनूच्या आणि गाडी थेट पिंगुळीला–

**महानंदा :** नाही–नाही. मी जाणार नाही.

**कल्याणी :** कसा जाणंय नाय तां मीच बघतंय–

**सोमजी :** मी आणि मनू हे पार्सल पिंगुळीला पोचतं करून येतो. काय मनू ?

**मनू :** दोनतीन कलाकात पिंगुळी. चला मास्तर. मानूला आधी गाडीत ठेवू या.

**महानंदा :** मी नाही येणार.

**मनू :** तुला उचलून गाडीत ठेवीन मी. हां ! चला मास्तर.

**सोमजी :** चल.

[ सोमजी आणि मनू महानंदेला धरायला पुढे होतात. ]

**मामा :** मास्तर, मानूला पिंगुळीला न्यायच नक्की झालं ?

**महानंदा :** मी उडी टाकीन गाडीतून...

**कल्याणी :** तू गप गो. उडी टाकीन. टाक उडी—

**मामा :** मग हिला मी आणि लखोबा घेऊन जातो पिंगुळीला.

**कल्याणी :** हां. ह्यां बरा. मास्तरांनी एवढां केलां, तेंका घेऊ दे जरा विश्रांती. लखोबा, तू आणि मामा चला पिंगुळीक.

**मनू :** पण एकदा ठरलंय ना, मी आणि सोमजीमास्तर—

**मामा :** नाही. ठरलंय फक्त पिंगुळीला पोचवायचं. लख्या, तू चल माझ्याबरोबर.

**सोमजी :** पण तुम्ही कशाला–

**मामा :** मानूला पोचवायचं काम महत्त्वाचं. ते आम्ही केलं काय, तुम्ही केलं काय... त्यात पुन्हा असं आहे, पिंगुळीच्या सावकाराकडेही माझं काम आहे,

तदेखील उरकून येता येईल.

मनू : तरीदेखील—

मामा : मनू, वेळ आहे का घासाघीस करायला ? बाबूल केव्हाही यायचा. ( मनू काही बोलायला बघतो. ) आता काही बोलूसुद्धा नकोस. कल्याणी, पोरीला गाडीत चढव.

महानंदा : नाही नाही.

कल्याणी : ( महानंदेला रपाटा घालते. ) तोंडातून एक अक्षर काढू नको. चल हो पुढे.

मामा : लख्या, तू थेट पिंगुळीला चलायचं. तुझी आणि बाबूलची भेट कशी होते तेच बघतो मी. दोनचार दिवस माझ्याबरोबर तिथं राहायचं.

सोमजी : आणि आम्ही ?

मामा : तुम्ही इथं कल्याणीच्या सोबतीला राहा. इथंसुद्धा कुणी जबाबदार...

मनू : आम्ही एवढी गाडी आणली—

मामा : तीच घेऊन जातोय ना पिंगुळीला ?...नसती एकेक लफडी-चला...

[ मामा आणि कल्याणी महानंदेला बाहेर नेतात. मागून लखोबा जातो. मास्तर आणि मनू चरफडतात. ]

मनू : काय झालं ?

सोमजी : तुझी टांग, गाढवा. आपल्या देखत दोघे घेऊन गेले तिला, आता बसा चोळत हात.

मनू : पण तुम्ही का नाही जोर केलात ?

सोमजी : मी म्हटलं, तू काहीतरी करशील.

मनू : मी काय करणार ? मामांनी आडमुठेपणा केला.

सोमजी : आडमुठेपणा तू केलास. मामांनी बरोबर डोकं लढवलं आणि आपल्या तंगड्या एकमेकांच्या गळ्यात अडकवल्या.

मनू : मग आता घ्या सोडवून तंगड्या आणि चालायला लागा. हॅः तुम्ही चांगलं झडझडून सांगायचं.

सोमजी : काय ?

मनू : म्हणायचं, मनू रेग्याची गाडी आहे. तिला आम्हीच घेऊन जाणार पिंगुळीला. तुम्ही जायचं नाही. गेलात तर तंगडी तोडून ठेवीन.

**सोमजी :** आत्ता सुचली ही अक्कल ? तेव्हा कुठं अक्कल गेली होती ? पिंगुळीला ? मी नाही, तू सांगायचंस.

**मनू :** जाऊ दे ना. जायची ती गेली. आता बोंबलून काय करायचं ? चार दिवस आधी टरतं तर—

**सोमजी :** गधड्या, दोन दिवस तुझ्या मागं आहे. भेटला असतास तर कालच नेली नसती मानूला ?

**मनू :** तालुक्याला केस होती.

**सोमजी :** आत्ताची केस हरलास ते बघ.

**मनू :** तुम्ही मामांना सांगायचं.

**सोमजी :** काय ? मानूला आम्हीच पळवणार आहोत म्हणून ? येडझवाच आहेस...

[ बैलगाडी चालू झाल्याचा आवाज. ]

[ काळोख. ]

## अंक दुसरा

## दृश्य तिसरे

[ दुसरा दिवस. वेळ सकाळची. कल्याणीचे घर. सोमजी आणि मनू बोलत येतात. ]

**सोमजी :** तू काही काळजी करू नकोस. माझं सगळं वजन मी खर्च करतो. ( हाक मारतो. ) कल्याणीबाई ( आतून ' ओ ' नाही. )

**मनू :** आत जाऊन बघा.

**सोमजी :** की ही देखील गेली पिंगुळीला आज ? काल मानू गेली, आज ही गेलेली दिसतेय.

**मनू :** म्हणजे तुमची पंचाईत !

**सोमजी** : तुझी-पंचाईत झालेली बघ... ( जात जात ) कल्याणीबाई–

**कल्याणी** : ( आतून ) कोण आहे ?

**सोमजी** : आम्हीच आहोत.

**कल्याणी** : ( आतून ) मास्तर का ?

**सोमजी** : हो. आणि मनूपण आलाय.

**कल्याणी** : ( आतून ) बसा. बसा.

**सोमजी** : काय स्नान चाललंय वाटतं ?

**कल्याणी** : ( आतून ) अरे कर्मा–

**मनू** : जा. बघून या.

**सोमजी** : हॉः कायतरीच !

[ कल्याणी येते. ]

**कल्याणी** : मनू, काल तू अगदी हाक मारल्यासारखो गाडी घेऊन इलंस रे बाबा ! नायतर मी रसातळाकच जावचा–

**सोमजी** : पण मी आणि मनूनं तिला नेली असती पिंगुळीला तर ?

**कल्याणी** : तुमका कशाक त्रास देव मी ? आपण होऊन मामान जातंय म्हटल्यान सुंठी वाचून खोकलो गेलो. त्यांच्या भाच्याची चूक. निस्तरू दे त्येंकाच. बसा आता.

**सोमजी** : मनोबा, कल्याणीबाईची चलाखी पाहिलीस ? तिनं पायजे तेवढा आपला डाव खेळला. मानूला पिंगुळीला पाठविली. उरलेला स्वतःचा डाव खेळला.

**मनू** : कोणता ?

**सोमजी** : तुला आणि मला इथं ठेवून मामा आणि लखोबाला मानूबरोबर धाडलं . खरं ना कल्याणीबाई ?

**कल्याणी** : माझी देवळातली अक्कल. तुमची पोष्टातली. माझो कसलो डाव ? माका तर आता वाटतां, डाव तुमचोच होतो कसलोतरी–

**मनू** : आमचा कसला आलाय डाव ?

**कल्याणी** : तुझ्या सोमजीमास्तराकनीच विचार. ( सोमजी उठतात. ) मास्तर, काल धावपळ करून थकलास हो. निदान पाणी तरी घ्या. बसा. ( पान बनवते. )

**सोमजी** : (बसत ) मामांचा भाचा बंदरावर फेऱ्या मारत बोंबलत बसला। असेल एव्हाना.

**मनू** : एव्हाना ? बंदराला बोट लागून दोन कलाक तरी झाले. ( हातातले

वड्याळ बघतो. ) कालचं काम बाकी सोळा आणे झालं.

**सोमजी** : साडेसोळा आणे म्हण. तू राहिलास इथं आणि मानू गेली पिंगुळीला. तू तरी शेळपटच. सांगायचं, मी नसेन तर माझी गाडीसुद्धा नाही.

**मनू** : हा बाबूल पिंगुळीला गेला तर ?

**सोमजी** : कसा जाणार ? मानू कुटंय, त्याला कसं कळावं ? लखोबाला विचारील तर तो तिकडेच अडकलाय. लग्न करतोय म्हणे. ( मनू हसतो. ) हसत काय बसला आहेस ? मामांच्या घराकडे चक्कर मारून ये. बाबूल तिकडे आलाय का बघून ये.

**मनू** : आणि तिथं भेटला तर ?

**सोमजी** : काही झालंय असं दाखवायचं नाही. काय कल्याणीबाई ?

**कल्याणी** : नाय तर ?

**सोमजी** : पण मला वाटतंय तो आधी इकडे येईल बघ चौकशीला. तू जाऊन बघून तर ये. देवळाच्या बाजूनं जा.

[ मनू जातो. ]

**सोमजी** : देवानं पोष्टात चिकटवलं या सोमजीला ते बरंच झालं म्हणायचं. नाहीतर कल्याणीबाई, तुझे वांधेच होते हो.

**कल्याणी** : ( पान देत ) घ्या. तुमचो माझ्यावर जीव म्हणून केलास ह्यां.

**सोमजी** : हो, पण तुझा जीव त्या मामावर.

**कल्याणी** : जीव म्हणजे ? त्येंचाच अन्न खातंय. गावाचे वतनदार ते. तुम्ही काय ? आज हंय, तर उद्या थंय. पान कसा झाला ?

**सोमजी** : तुझ्या हातचं आहे ते.

**कल्याणी** : पुरे हां. ( उठते. )

[ बाहेर गाडीचा आवाज. ]

**सोमजी** : मन्याची गाडी की काय ? ( बाहेर बघतात. ) कल्याणीबाई, आला हं.

**कल्याणी** : कोण ?

**सोमजी** : बंदरावर थांबलेला खलाशी : मामांचा भाचा.

**कल्याणी** : बाबूल ?

**सोमजी** : तोच. आता परीक्षा आहे तुझी.

[ बाबूल रागाने येतो. हातात पिशवी. ]

सोमजी : ( उठत ) बरंय कल्याणीबाई—

कल्याणी : बसा हो. अशी संकटात पडलंय. कोण तो ? बाबूल की काय ?

बाबूल : मानू कुठंय ?

कल्याणी : म्हणजे ! तुका भेटली नाय बंदरार ?

बाबूल : भेटली असती तर इथं आलो नसतो.

कल्याणी : अरे देवा ! आता काय करू रे पोरा ? लखोबाक देखील बंदरावर धाडलंय. तो भेटलो ?

बाबूल : कोणी भेटलं नाही.

सोमजी : मी हेच भाकीत केलं होतं.

बाबूल : ( हाक मारतो. ) मानू–महानंदा–

कल्याणी : कालपासून पत्तो नाय रे पोरीचो. संध्याकाळी देवळात गेलंय तर तितक्यांत वेळ साधली कार्टिनं—

[ बाबूल गांगरतो. ]

बाबूल : तिला मी पत्र पाठवलं होतं.

कल्याणी : सगळी पत्रां गावली रे तुझी, पण—

सोमजी : म्हणतात ना, दैव देतं आणि कर्म नेतं.

बाबूल : यात तुमचं काहीतरी कारस्थान आहे.

कल्याणी : खळनाथाची शपथ खातंय. अरे, दुर्गीचो झील तू. तेव्हा 'नाय' म्हटला ह्या खरां. पण एकुलती एक पोर. शेवटी कबूल झालंय. म्हटलां, बाबूलशी तर बाबूलशी न्हा लगीन. कळव त्याका. कळवलां नाय मानून ?

बाबूल : एकसुद्धा पत्र नाही तिचं.

कल्याणी : मग बरोबर.

बाबूल : काय ?

कल्याणी : परवा तुझा पत्र इला, बंदरावर ये म्हणून–गधडी 'जात नाय' बोलली.

बाबूल : खोटं आहे.

कल्याणी : मास्तरांनाच विचार.

सोमजी : मी कशाला ? तुमचं चाललंय ते चालू द्या.

कल्याणी : पोर खंय लपलीय काळां तोंड घेऊन तां एक खळनाथाक ठाऊक ! जीवाक घोर. दहावेळा म्हटलां, बाबूल बंदरावर वाट बघतलो—तू जा–बरोबर

लखोबाक घे, तर हिचां एकच. ' मी जावचंय नाय. '

**बाबूल :** पण का ?

**कल्याणी :** कर्म माझां !

**सोमजी :** कसलं डोंबलाचं कर्म ? भाविणीच्या नशिबी हेच यायचं.

**कल्याणी :** तिका बरां नाय रे.

**बाबूल :** पण मग ती पळून कशी गेली ?

**सोमजी :** बरं नाही म्हणजे काय ते स्पष्ट सांग. मुंबैकर, शिकलेला तो. आपलं गावचं बोलणं उमगायचं नाही त्याला.

**कल्याणी :** बाबूल, अरे बाईमाणसाचां जिणां. बरां काय आणि वाईट काय ?

**बाबूल :** पण झालंय काय एवढं ?

**कल्याणी :** आता कसां सांगू ?

**सोमजी :** हो, सांगणाऱ्यालाच लाज.

**कल्याणी :** मानूक दिवस गेलेत रे बाबा—

**बाबूल :** खोटं बोलते आहेस तू कल्याणी.

**कल्याणी :** खोटां नाय. देवा शपथ तिका दिवस गेलेत.

**बाबूल :** असतील. पण ती पळून नाही जाणार. ( हाक मारतो. ) मानू–

[ मनू रेंगे येतो. ]

**मनू :** लागला पत्ता मानूचा ?

**कल्याणी :** नाय रे.

**मनू :** नाही. ह्याला हाक मारताना पाहिला. केव्हा आलास रे बाबूल ? ( बाबूल गप्पच ) मध्येचसा आलास ?

**सोमजी :** अरे, नाताळच्या रजेत असेल काही कार्यक्रम इथला.

**कल्याणी :** ( मनूला ) तू बघलंय सगळीकडे ?

**मनू :** तर ? बाबूल, तुला तरी भेटली ?

**कल्याणी :** तांच विचारलां त्येका. लखोबाक धाडलंय. तेच्योसुद्धा पत्तो नाय.

**मनू :** पण जाऊन अशी जाणार कुठं ?

**सोमजी :** जाणाऱ्याला शंभर वाटा. विहिरी आहेत, तलाव आहेत, समुद्र आहेत.

**बाबूल :** कल्याणी, तुझ्या ह्या फालतू गोष्टी नको आहेत मला. मानूला कुठं ठेवली आहेस ? सांग.

**कल्याणी :** देवाशपथ, पोरगी पळाली रे घरातून, तुझा पत्र इला, मानू रड रड रडली. म्हणाली, आता तोंड कसां दाखवू त्याका ? म्हटलां, अग त्याचाच पोर असात पोटात. तर नाय—

**बाबूल :** म्हणजे ?

**कल्याणी :** पाचवो महिनो झालेलो.

**बाबूल :** कितवा ?

**कल्याणी :** पाचवो रे.

**बाबूल :** म्हणजे दिवाळीला मी येण्याआधी—

**कल्याणी :** तेव्हा तीन महिने गेलेले होते.

**बाबूल :** खोटं ! साफ खोटं ! !

**कल्याणी :** आता कसां सांगू पोरा ? जत्रेच्या दिवशी देवळात तिका घेरी इली होती. आठवतां ?

**मनू :** ती साधी घेरी नव्हती, महाराजा...

**सोमजी :** ( हसत ) डोहाळे लागले होते मुंबैकराला झुलवायचे.

**बाबूल :** घेरी साधी होती. तिनं नाटक केलं होतं. ( मनू हसतो. ) हसू नकोस तू.

**मनू :** हासू नको तर काय करू ? भाविणीच्या पोरी फक्त नाटकच करतात. तुला एक सांगतील, मला एक सांगतील... मानू मलाच सांगत होती, घेरी तसलीच होती म्हणून.

**बाबूल :** तुला ?

**सोमजी :** यालाच सांगणार ती. तिला हा दागदागिने देत होता, कपडालत्ता देत होता.

[ बाबूल मनूचा गळा धरतो. ]

**सोमजी :** याचा गळा धरून काय महिने कमी होणार आहेत ?

**मनू :** बाबूल, माझ्या वर्गातला तू. मानू इथं असती तरी मीच तुला सांगितलं असतं. बाबारे, दिसतेय तशी साधी नाहीए ही पोरगी. ( स्वतःला सोडवून घेत ) आपल्या बांदेकराचा पुतण्या मुंबईहून आला होता तुझ्या आधी...

**सोमजी :** वाः ! त्याचा मुक्काम इथंच होता.

**मनू :** हवं तर आठवडाभर थांब इथं. मानूचा पत्ता लागला की तुझ्या समक्ष विचारतो तिला.

**बाबूल :** बस्स झालं.

[ स्तब्धता. बाबूल सैरभर होतो. सगळीकडे नजर फिरवतो हातातली पिशवी उराशी धरतो. ]

**कल्याणी :** आता इल्यासारखी रवशीत मा चार दिस ? ( बाबूल गप्प. )

**सोमजी :** बरंय ! येतो मी. चल मनू.

**कल्याणी :** तुम्ही शोध ध्या रे पोरीचो. मनू, गाडी घेऊन जा तालुक्याक थंय खंय पत्तो लागलो तर कळय हां—

**मनू :** बरं, जातो रे बाबूल.

[ दोघे जातात. ]

**बाबूल :** कल्याणी, तुझ्या देवाची शपथ आहे तुला. खरं काय ते सांग.

**कल्याणी :** देवाशपथ सांगतय. पोर पळून गेला. खंय गेला, तिचा काय झाला, देवाक ठाऊक. भाविणीचो जन्म. पेजेक दितलो तो शेजेक घेतलो. तुझ्या आधी तो बांदेकर येय रोजचो. काय ना काय आणून देय मानूक. फसली पोर. दुर्गीचो झील तू. तुझ्यासारख्याक 'नाय' म्हणताना त्यावेळेक जीव जळत होतो बघ. नशीबच फुटक्या पोरीचां.

**बाबूल :** मानू कधी बोलली नाही.

**कल्याणी :** ती काय अशी बोलुची गोष्ट होती ? जीव होतो मानूचो तुझ्यावर— पण ह्यां असा झाला म्हणून गप रवली. तुझी पत्रां इली, उत्तर नाय पाठयलां. त्येका वाटला, तू मुंबईचो, बांदेकरासारखो आयत्या वेळी नाय म्हणशील. पण दुर्गीचो झील तू. बोलल्यासारखो लग्नासाठी इलंस.

[ कल्याणी बोलतच असते. बाबूल अस्वस्थ होतो. आखंड्याला धरून उभा राहतो. कानांवर हात ठेवतो तरी आवाज ऐकू येतात. ]

**मनू :** भाविणीच्या पोरी फक्त नाटकच करतात.

**महानंदा :** म्हटलं आजची भेट चुकणार. मग केलं नाटक. नाहीतर झाली असती का अशी भेट ?

**सोमजी :** याच्या आधी तुझ्याकडे कोणकोण येत होतं ते सांगेन वेळ आली की.

**कल्याणी :** भाविणीनं देवाची शपथ घेतली, तरी ती खोटांच बोलणार.

**महानंदा :** मग केलं नाटक... मग केलं नाटक... मग केलं नाटक.

[ बाबूल पिशवीतून लुगडी काढून फेकतो. जातो. ]

...काळोख...

# अंक तिसरा

## दृश्य पहिले

[ दुसऱ्या अंकानंतर जवळजवळ वीस वर्षांचा काळ लोटला आहे. मामांचे घर. वेळ संध्याकाळची. मामी जुनी भांडी काढून बसल्या आहेत. त्यातल्या दोनचार टोपांवरली नावे वाचण्याचा प्रयत्न करत आहेत. डोळ्याला जुना चष्मा. लखोबा येतो. खूप म्हातारा. हातात बाबूलची बॅग.

मामींकडे बघत थांबतो. मग खोकतो. मामी चपापल्यासारख्या होतात. ]

**मामी :** लखो काय रे ?

**लखोबा :** भाचे आले आहेत गावाहून. तुम्हांला भेटायला.

**मामी :** कोण ? बाबूल ? कुठं, आहे कुठं तो ? ( हाक मारतात. ) बाबूल—

**लखोबा :** देवळात बसले आहेत. येताहेत एवढ्यात. म्हणाले, तू पुढं हो बॅग घेऊन.

**मामी :** जुनीच सवय त्याची ( पुन्हा भांडी बघू लागतात. मग ) तब्येत कशी आहे त्याची ?

**लखोबा :** तुम्हीच डोळ्यांनी बघा ते आले की.

**मामी :** ( भांडी बघता बघताच ) जळली माझी नजर. लखोबा, नजर धड आहे का रे तुझी ?

**लखोबा :** आहे तशी. नाहीतर धाकल्या धन्यांना ओळखता पण येतं ना.

**मामी :** ते म्हणत नाहीए मी. जमलं तर या भांड्यावरलं नाव वाचायला सांगणार होते.

**लखोबा :** ( हातात भांडे घेतो. बघतो. ) नजर शाबूत असली तरी मामी, वाचायला यायला हवं. मी अडाणी माणूस.

**मामी :** मग आण तो टोप इथं ! ( त्याच्या हातून टोप काढून घेतात.) वाचता येत नाही हे आधी सांगता येत नव्हतं ?

[ स्तब्धता ]

**लखोबा :** मामी—

मामी : काय रे ?

लखोबा : धाकल्या धन्याचं वय काय असेल ?

मामी : बाबूलचं ना ?...तरी असेल बघ. पंचेचाळीस, शेहेचाळीस.

लखोबा : खरे की–पण पार रया गेलीय बघा. पहिल्यातलं काय पण नाही.

[ क्षणभराने—]

लखोबा : देवळात मानूची पोरगी आली होती. धाकल्या धन्यांना विचारायला.

मामी : कोण ? दमयंती ?

लखोबा : हो.

मामी : काय म्हणत होती बाबूलला ?

लखोबा : काय की बा. मी आधीच निघालो तिथून.

[ काही वेळ कुणीच कुणाशी बोलत नाही. मामी भांडी बघत बसतात. मग —]

मामी : आता चाळशी लावूनदेखील दिसत नाही, म्हणजे–

लखोबा : वय नाही का झालं आता ? राहू दे ते. ही कुठली भांडी काढलीत ?

मामी : कोठीच्या खोलीत नव्हती का पडली ? वेळ जाईना, तर जीवाला काहीतरी चाळा. लखो, यात एक टोप होता—नीट जपून ठेवला होता मी.

[ इतक्यात बाबूल येतो. ]

मामी : कोण रे ?

बाबूल : मी. बाबूल.

[मामी त्याच्याकडे बघत राहातात. त्यांच्या डोळ्यांत पाणी तरळतं.]

मामी : बाबूल ?

बाबूल : नाही ओळखलंस ?

मामी : सांगितलंस तेव्हा ओळखलं. काय दशा करून घेतलीस ? केस पिकले, चेहऱ्यावरलं तेज पार निघून गेलं—

[ बाबूल मामांच्या जुन्या डेस्कवर बसतो. सुस्कारा सोडतो. बोटानं ठेका धरतो. गप्प. ]

मामी : सांग, कशानं अशी दशा झाली ?

बाबूल : मामी, आता काय मी पूर्वीचा राहाणार ? झालं ! पन्नाशीला पोचत आलो.

मामी : पन्नाशी म्हणजे काय जास्त वय? मी तर सत्तरीच्या पुढं गेले.

बाबूल : तू देखील आता एकदम—( म्हातारी झालीस.)

मामी : माझं मेलीचं सोड. मी मूळचीच अशी वाईट.

बाबूल : वाईट कशी ?

मामी : वाईटच रे बाबा! लग्न झाल्या दिवसापासून कुणाला नको होते. ( डोळ्यांवर पदर ओढतात.) जाऊ दे. आमच्या शेणी गेल्या आता मसणात! उष्टी खरकटी काढण्यापुरता आमचा जल्म. लखो, अरे तू उभा का खांबासारखा गोष्टी ऐकत ? बावीवर जाऊन बाबूलला हातपाय धुवायला पाणी काढून ठेव... हयात गेली तुला काम सांगण्यात. जा आधी, तंवर मी चहा ठेवते बाबूलला.

[ लखोबा बाहेर जातो. ]

बाबूल : आठवण झाली. दारात शिरण्याआधी मामांचं असायचं. बावीवर जाऊन हातपाय धू—

मामी : हं! पण आता मला सगळं चालतं हो. वयोमानाप्रमाणे काही होत नाही हातून. लखोबानं रांधले तरी अन्न गिळते मी. कसला देव आणि कसला धर्म!

बाबूल : हल्ली लखोबा करतो स्वयंपाय ?

मामी : कधीमधी. मला मध्येच झीटबीट येते. लाकूड होऊन मी पडते. मग करतो लखोबा सगळं.

बाबूल : झीट मामा गेल्यापासून यायला लागली ? ( मामी गप्पच. ) मनावर एकदम परिणाम झाला की अशी—

मामी : जळला परिणाम आणि बिरिणाम.

बाबूल : आईचं पत्र आलं, मामा हार्टफेलनं गेल्याचं. तिनं लिहिलं होतं, तुझी इच्छा आहे, मी येऊन जावं—

मामी : तेवढंच बरं वाटतं जीवाला. आता दुसरं कोण आहे जवळचं ?

[ फटफटी थांबल्याचा आवाज. एवढ्यात बाहेरून मनू रेगे येतो. म्हातारा झालेला, पण अजून ऐटीत. ]

मनू : मामी, बाबूल आला का ?

बाबूल : कोण? मनू रेगे? (मनू बघतो.) बघतोस काय असा? मीच बाबूल आहे.

मनू : बाबूल तू—

बाबूल : तब्येतीचं सोडून बोल. तुझं कसं काय चाललंय ?

मामी : त्याचं काय विचारतो बाबा ? गावचा वतनदार तो !

मनू : माझं छान आहे म्हणशील तर. दुकान नव्या फॅशनीचं बांधून घेतलंय... पोरगा बघतो ते.

बाबूल : किती शिकलाय ?

मनू : माझ्यापेक्षा एक बुक कमीच शिकलाय. पण शिकून करायचंय काय त्याला ? दुकानात रग्गड कमावतो. मला चैनीत ठेवतो. (लखोबा येऊन उभा राहतो.)

बाबूल : मोठी मुलगी ना तुला ?

मनू : तू नागपूरची काही हकीकत सांग.

बाबूल : नागपूर केव्हाच सोडलं. त्यानंतर दोनपाच ठिकाणी नोकऱ्या केल्या.

मनू : प्रोफेसरच्या ?

बाबूल : हो.

मनू : तुला पोरंबाळं ?

बाबूल : लग्न कुठं केलं मी ? (मामी आत जातात.)

मनू : छान. आयुष्यात मौजमजा करायची म्हणजे मागं लग्नाचं झांझट नको. कसं लखोबा ? (हसतो.)

लखोबा : पाणी काढून ठेवलंय.

बाबूल : थांब जरा.

[ स्तब्धता ]

बाबूल : मामा गेल्याचं कळलं म्हणून आलो...

मनू : खूप वर्षांत आलासच नाही तू गावी.

बाबूल : हो, वीसेक वर्षं झाली. गाव पार बदललं.

मनू : तर ? बस आलीय. सिनेमाचं थिएटर झालंय... बघता बघता बॉम्बेटाईप होईल गाव.

बाबूल : हं-!

मनु : आता आहेस ना काही दिवस ?

बाबूल : हो ! आहे.

मनू : चक्कर टाकून जाईन. आता फटफटी घेतलीय. (उठतो.) मानू भेटली का ?

बाबूल : अं ?... नाही. आत्ताच तर येतोय.

मनू : इथंच असते. जायच्या आधी भेटून जा. तिला बोललोय मी तू आल्याचं.

बाबूल : बघू कसं जमतंय...

[ मनू जातो. फटफटीचा आवाज. मामी बाहेर येतात. ]

मामी : गेला ना तो ?

लखोबा : गेला.

मामी : म्हणे, माझं छान आहे. नसायला काय झालं मेल्याचं ? लोकांना फसवून त्यांच्या जमिनी खाल्ल्या—बाबूल, तू त्याला थोरल्या मुलीबद्दल विचारल्यावर पाहिलंस कसा गप्प झाला ?

बाबूल : नाही, का ?

मामी : पोरीनं भानगडी केल्या. शेवटी फास लावून जीव दिला... पोरगा जन्माला आलाय तो सगळे नाद घेऊन...

[ स्तब्धता ]

बाबूल : चल लखोबा, बावीवर.

मामी : राहू दे. चहा-बिहा घेऊन मग जा ! दमून आलाएस—( मुद्दाम. ) लखोबा, आत चुलीजवळ बस. पाणी ठेवलंय. आधाण आलं, की सांग.

[ लखोबा आत जातो. ]

बाबूल : मामा गेले तेव्हा तू, लखोबा जवळ होता ना ?

मामी : अंहं ! झोपेतच घडलं सगळं. अंगणात उन्हं आली तरी उठले नाहीत, तेव्हा लखोबाला म्हटलं, हाक मार. तो जवळ गेला तर काय ! सगळंच आटपलं होतं.

बाबूल : म्हणजे अखेरच्या घटकेला कुणाशी काही बोलणं-सवरणं—

मामी : नाही.

बाबूल : ( सुस्कारा सोडतो ) हं—

मामी : आणि मी तिथं असते तरी बोलायला हवं होतं ना त्यांनी ? हो, नाहीतर जाताना कपाळावर आठी घेऊन जायचे. बाबूल, तू लग्नाशिवाय राहिलास हे बरं नाही केलंस.

[ स्तब्धता ]

बाबूल : का ?

मामी : त्यांची इच्छा होती, तू लग्न करून इथंच राहावंस; ही थोडीशी काय इस्टेट आहे ती बघावीस—

बाबूल : हं !
मामी : विचारते म्हणून रागावू नकोस.
बाबूल : काय ?
मामी : तुझं मानूकडे जाणंयेणं होतं ?
बाबूल : छेः ! असं का विचारलंस ?
मामी : मध्ये ऐकलं होतं, तिच्याशी तुला लग्न करायचं होतं म्हणून.
बाबूल : कुणी सांगितलं ?
मामी : कुणी असं नाही, पण–
बाबूल : अंहं ! खोटं.

[ लखोबा बाहेर येतो. ]

लखोबा : आधण आलंय मामी.

[ स्तब्धता ]

बाबूल : मामांचे दिवस-बिवस सगळं व्यवस्थित पार पडलं ?
मामी : पिंड न्यायला जरा टाईम लागला.
बाबूल : हं ! जाताना कुणाशी काही बोलले नाहीत—
मामी : लखोबाच्या मुलांना महिनेमाल पन्नास नारळ पोचवू असं म्हटल्यावर सगळं मग ठीक झालं.
लखोबा : मीच म्हटलं.
मामी : हो ! ह्याची पोरं इथंच वाढली ना ? घरात जाग असावी म्हणून त्यांना इथंच ठेवून घ्यायचे शेवटी शेवटी.
बाबूल : बरं झालं. लखोबाची पोरं दुवा तरी देतील.
लखोबा : देणारच. पाण्याला आधण आलंय हो मामी.
मामी : बाबूल, आलेच हो.

[ आत जातात. क्षणभराने–]

बाबूल : तुझं बरं चाललंय लखोबा ?
लखोबा : बरंच म्हटलं पायजे.
बाबूल : तुझी मुलं—
लखोबा : जगताहेत. पोरीचं आता लगीन करायचंय. पण आधार गेला आमचा. नाहीतर शे-दोनशे हक्कानं घेतले असते.

बाबूल : कुठं ठरवलंय लग्न ?

लखोबा : पाहिलाय एक मुलगा. पण पुढं पाऊल टाकायला पैशाची काठी हवी ना हातात ?

बाबूल : काळजी करू नकोस. मी देईन तुला काय लागेल ते.

लखोबा : खळनाथाची कृपा.

[ स्तब्धता ]

बाबूल : लखोबा, मामांच्या मागं तुझ्या मुलांना महिनेमाल नारळ सुरू झाले—

लखोबा : आहे ते ठीक आहे.

बाबूल : म्हणजे ?

लखोबा : सगळी ती बतावणी हो. समजलं ना ?

बाबूल : बतावणी ?

लखोबा : तर काय ?

बाबूल : म्हणजे ?

लखोबा : पिंडाला टाईम लागला. खूप सांगणी केली सगळ्यांनी इस्टेटीबद्दल, मामीबद्दल...पण कावळा शिवेल तर शपथ.

बाबूल : मग ?

लखोबा : मग गेलो पुढं. पिंडापाशी जाऊन हात जोडले. म्हटलं, 'धनियानुं, महिनेमाल पन्नास नारळाची गोण मानूकडे रवाना होईल...' डोळे उघडतो तर कावळा पिंड घेऊन पसार.

बाबूल : असं का सांगितलंस तू ?

लखोबा : तुम्हांला नाही कळायचं.

बाबूल : का ?

लखोबा : मानू त्यांचीच लेक.

बाबूल : कुणाची ?

लखोबा : मामांची.

बाबूल : ( बघत राहातो. ) मग तुझ्या मुलांना नारळ पाठवायचे ते—

लखोबा : 'बतावणी' उगाच म्हटलं ? मानूला नारळ पाठवतो म्हटलं म्हणजे गावात गजबज होणार. वर मामी कष्टी होणार. जन्मभर भोगलंय बिचारीनं. त्यात आणखी भर नको.

बाबूल : हं !

लखोबा : कालचीच गोष्ट. माझ्या पोरांना म्हणून गोण नेली आणि मानूच्या घरी टाकली.

[ स्तब्धता ]

बाबूल : कोण कुणाच्या फेऱ्यात येईल आणि कसा वागेल याचा नेमच नाही बघ.

[ स्तब्धता ]

बाबूल : मानू मामांची मुलगी हे ठाऊक नव्हतं मला.

लखोबा : कसं असणार ? अहो, देवाधर्मापायी त्यांनी कल्याणीशी लग्न केलं नाही. त्यांच्या लग्नाआधीपासून त्यांचं जाणंयेणं होतं कल्याणीकडे. घराण्याचा रिवाज म्हणून मामीशी लग्न केलं... मामी म्हणजे तशी लक्ष्मीच. घरात आल्यापासून मामांना बरकत आली, पण तिच्या स्वतःच्या दैवात काहीच सुख नाही. कडकीनं मरता मरता जगलेली बाई.

[ स्तब्धता ]

बाबूल : लखोबा—

लखोबा : काय ?

बाबूल : मामांना माझं आणि मानूचं माहीत होतं ?

लखोबा : मग ?

बाबूल : कसं ?

लखोबा : कल्याणीनं सांगितलं होतं त्यांना.

बाबूल : चिडले असतील माझ्यावर ?

लखोबा : लग्नाचं ऐकलं तेव्हा चिडले. त्यांचा नाहीतर विचार होता, तुम्ही जातीत लग्न करून इथं राहावं आणि मग मानूशीसुद्धा—

बाबूल : ऑं ?

लखोबा : गावातल्या चार लोकांनी तिला नासवण्यापेक्षा तुमचं जाणं-येणं राहिलं असतं, तर बरं झालं असतं असं वाटायचं मामांना. जाऊ दे... झालं गेलं त्याला इलाज नाही.

[ स्तब्धता ]

बाबूल : मानूला मुलं किती ?

लखोबा : किती कुठली ? एकच मुलगी.

बाबूल : हं !

लखोबा : हुबेहूब तुमचं रुपडं.

[ बाबूल अस्वस्थ होऊन डेस्कवर बोट वाजवतो. मामी चहा घेऊन येतात. लखोबा जातो. बाबूल हळूहळू चहा घेतोय. विचार करतोय.]

मामी : देवळात मानूची मुलगी भेटली ना ?

बाबूल : अं ? हो. ( चहा घेतो... मग क्षणभराने) मामी—

मामी : काय रे ?

बाबूल : मानूबद्दल तुला कुणी सांगितलं ?

मामी : डबक्यासारखं गाव हे. एक बेडूक ओरडला तर काय दुसऱ्या बेडकाला कळत नाही ? तू दिवाळीत आला होतास बघ... तेव्हा मी तुला खोदून खोदून विचारत होते.

बाबूल : हो !

मामी : तेव्हा बोलला असतास मला, तर सगळं कसं व्यवस्थित होतं.

बाबूल : तू काय करणार होतीस ?

मामी : दिसलं असतं तुला. जीवाच्या बाजीनं भांडले असते सगळ्यांशी... जन्माचा मनातला राग ओकले असते. आयुष्यात एक तरी लग्न मनाजोगं झालं असतं. पण तू बोललाच नाहीस.

बाबूल : व्हायच्या गोष्टी !

मामी : त्या लगेच केल्या तरच होतात. नाहीतर—

बाबूल : हं !

मामी : मागाहून नाताळात आलास. गडबडीत बोलला नाहीस–चालला नाहीस. दुसऱ्याच दिवशी निघून गेलास.

बाबूल : काय करणार होतो थांबून ?

मामी : जाऊन तरी काय केलंस मोठं ? अरे, मानू सारखी दोन दोन दिवसांनी चौकशीला यायची. कुठं गेले, कधी येणार ? अग, का ते सांग, तर नाही. त्याच वेळी तिच्याशी लग्न केलं असतंस तर हे म्हातारपण असं अवेळी आलं नसतं. अरे, चार दिवस कावळे कावकाव करतात आणि मग बसतात गप्प. भावीण ठेवण्यापेक्षा लग्न लावून केलेली बरी. तू नुसतीच राख घातलीस डोक्यात—

बाबूल : नाही मामी, सगळं ठरवून आलो होतो. आईचा विरोध होता म्हणून

लगेच नागपूरला बदली करून घेतली होती. पण भाविगीची पोर. दिवाळीत मला भेटायच्या आधीच तिला दिवस गेले होते.

**मामी** : कुणी सांगितलं ?

**बाबूल** : कल्याणीनंच.

**मामी** : ती सटवी !

**बाबूल** : हा मनू रेगे देखील म्हणत होता, त्याचं आणि मानूचं—

**मामी** : माझ्यासमोर विचार त्याला. आजसुद्धा मानूचं बोट तरी मिळालंय का सांगू दे गाढवाला.

**बाबूल** : तो सोमजीमास्तरसुद्धा बोलताना म्हणायचा, माझ्या आधी मानूकडे कुणीकुणी यायचे.

**मामी** : काय पण नावं सांगितलीस साक्षीला ? ती गावभवानी आणि हे दोघे तिचे हुजरे... त्या मास्तरानं दुसऱ्याला डसण्यापलिकडे काही केलं ? पण देव झोपलेला नाही.

**बाबूल** : काय झालं ?

**मामी** : त्याला सर्पदंशानंच मृत्यू आला... तरफडून मेला रांडिचा.

**बाबूल** : आधी मी कल्याणीला बोललो होतो लग्नाबद्दल, तर तिनं देवाधर्माची नड काढली.

**मामी** : आग लागो त्याला. आम्ही कुठं काय कमी केलं होतं देवाधर्माचं ? आमचं काय बरं झालं ? जल्मभर चूल फुंकली आणि धुराचं निमित्त करून आसवं ढाळली.

**बाबूल** : जाऊ दे... लग्न म्हणजे जुगारच शेवटी.

**मामी** : कसं बोललास ? इस्पीक घेऊन जुगारी बसतात तसलं आपलं कर्म ! मिळतं त्याला मिळतं...

[ स्तब्धता ]

**मामी** : मानूला भेटलास ना ?

**बाबूल** : नाही.

**मामी** : असं नको करूस. तिला आणखी दुःख होईल.

[ स्तब्धता ]

( बाबूल सहज मामांचे डेस्क बघतो. )

**बाबूल :** हे मामांचं आवडतं डेस्क. त्यांच्या आतल्या खोलीत असायचं, दुपारी लिहित बसायचे या डेस्कवर.

**मामी :** काय लिहायचे, कुणाला लिहायचे, त्यांचं त्यांच्याजवळ. भरलंय सगळं चिठोऱ्यांनी. कुणाकुणाची पत्रं, चिठ्ठया ... तू आला आहेस, वेळ होईल तेव्हा बघ सगळी कागदपत्रं.

[ बाबूल डेस्क उघडतो. ]

**बाबूल :** या जुडग्यात आईची आणि माझी पत्रं दिसताहेत. ( जुडगा बाजूला ठेवतो.) यात–( एक कागद काढतो.) हे अर्धवट लिहिलेलं आहे. ( वाचतो. ) चिरंजीव राजमान्य राजश्री बाबूल यास अनेक... मलाच लिहीत होते बहुतेक ( वाचतो. ) ऑं ? ' वाटल्यास तू मानूशी '—

**मामी :** वाच ना.

**बाबूल :** काय वाचणार ? पुढलं पार खोडलंय. काय लिहायचं असेल ग त्यांना ?

**मामी :** माझी कुठं ओळख होती त्यांच्याशी, तर मी सांगणार ?

[ बाबूल पत्र वाचण्याचा प्रयत्न करतो. क्षणभराने— ]

**मामी :** तू माधव नाडकर्णीला ओळखतोस ?

**बाबूल :** कोण माधव नाडकर्णी ?

**मामी :** बाकी तू कसा ओळखशील म्हणा ! अरे, दूरचा आतेभाऊ तो माझा. माधव नाडकर्णी.

**बाबूल :** त्याचं काय ?

**मामी:** त्याच्याशीच लग्न व्हायचं माझं.

**बाबूल :** मग ?

**मामी :** नशीब म्हणतात ते हेच ! आमच्या आप्पांनी आपण होऊन ते लग्न मोडलं. मला चांगली पहिल्या नंबरानं पसंत केली होती त्यानं. त्या माधव नाडकर्ण्यानं.

**बाबूल :** मोडलं का लग्न ?

**मामी :** हा माधव. त्याचा थोरला भाऊ. काय बरं त्याचं नाव ? मेलं जिभेवर आहे, पण आठवायच्या वेळी आठवत नाही. तर तो भाऊ त्या टिळकांच्या पेपरात काहीबाही लिहायचा, सरकारविरूद्ध रे. आप्पा घाबरले. त्यांना वाटलं, त्यांच्यामुळं घरावर जप्तीबिप्ती येईल, त्यात आपली पोर सापडायला नको...

इथं खरकटं होऊन राहायचं कर्मात होतं ना ?

**बाबूल :** हं !

[ स्तब्धता ]

**मामी :** बाबूल, एक काम करशील ?

**बाबूल :** काय ?

**मामी :** या टोपांच्या वरची नावं वाच.

**बाबूल :** ( चष्मा काढून डोळ्याला लावत ) नावं ? कशाला ?

**मामी :** अरे, माझ्या लग्नाला हा माधव नाडकर्णी आला होता. त्यानं मला एक टोप दिला होता भेट म्हणून. यातच असणार तो.

**बाबूल :** ( एक टोप काढतो. ) याच्यावर लिहिलंय—केशव नाडकर्णी यांजकडून.

**मामी :** हां. हां. तोच टोप. केशव नाडकर्णी म्हणजे या माधवचे वडील. हाच टोप त्यानं दिला होता. अगदी माझ्या हातात. (टोप हातात घेऊन कुरवाळतात.) मला आठवतं, मागं एकदा...खूप वर्षं झाली. हा माधव नाडकर्णी या तालुक्याला मामलेदार होता. इथं येऊन गेला होता आमच्या जमिनीचा प्रश्न सोडवायला. एक वेळ जेवायलासुद्धा होता. पण माझ्याशी बोलला नाही. लग्नाच्या वेळी आप्पांच्याकडून नकार मिळाला होता ना, त्याच्या ते लागलंच असणार जीवाला. मग मीसुद्धा नाही बोलले. ह्यांच्याशी मात्र म्हणाला हो जेवताना.

**बाबूल :** काय ?

**मामी :** मासळीची आमटी छान झालीय म्हणून. मला कळावं म्हणून वर काय म्हणाला माहीत आहे ? म्हणाला, आपल्या बायकोला अशी आमटी करता येत नाही.

**बाबूल :** तू बोलायचंस त्याच्याशी.

**मामी :** मी ? आता सांगते. माझ्या मनात होतं बोलायचं, पण इकडचा संशयी स्वभाव ना ? या माधव नाडकर्णीला चार मुलगे आहेत, चार...आणि मी ही अशी राहिले वांझोटी. बाबूल रे, मी तुला मारे म्हणतेय इथं, पण मी देखील आमच्या आप्पांना तेव्हाच म्हटलं असतं ना, म्हटलं असतं ना, तर–

[ बोलता बोलता मामी मुठी वळतात. हातपाय ताठ करून बेशुद्ध होऊन पडतात. बाबूल घाबरतो. ]

**बाबूल :** लखोबा, ए लखो, लौकर ये. मामींना फीट आलीय.

[ लखोबा संथपणे कांदा घेऊन येतो. मामींच्या नाकाशी धरतो. ]

**लखोबा :** तुम्ही बसा निवांत. हे नेहमीचंच झालंय. गेली दहा वर्षं मामी अशाच लाकूड होतात. तासाभरात येतील शुद्धीवर.

**बाबूल :** पण चुलीजवळ बसताना एखादेवेळी—

**लखोबा :** म्हणून तर जगतोय मी. मामी मरेपर्यंत मला सुटी नाही. नाहीतर माझी आवडा जाऊन दोन वर्षं झाली. कशाला जगायला हवं होतं या लखोबाला !

[ काळोख. ]

## अंक तिसरा

## दृश्य दुसरे

[ कल्याणीच्या घराचा दर्शनी भाग. महानंदा फाटकाशी उभी. चेहऱ्यावरली रया गेलेली. जवळच दमयंती. ]

**दमयंती :** सारखी आरवंड्याशी काय उभी तू, आई ?

**महानंदा :** सहज ग.

**दमयंती :** छट. शक्यच नाही. कधी नाही ती आजच बरी तुला लहर आली ?

**महानंदा :** लखोबा सांगत होता, ते आज परत जाताहेत.

**दमयंती :** कोण ? बाबूल ना ?

**महानंदा :** त्यांना तू 'बाबूल' नाही म्हणायचं.

**दमयंती :** का ? ( महानंदा गप्पच ) जाईनात का जाताहेत त. इतके निरोप पाठवलेस आज तीन दिवस. एकदा तरी वळले इकडे ते ?... गेले उडत.

**महानंदा :** त्यांनी त्यांचं कर्तव्य केलं. माझं मी करतेय.

**दमयंती :** हंः नुसतं वाट बघण्याचं कर्तव्य.

महानंदा : जाताना निदान दिसतील तरी.

दमयंती : कोण ग ते एवढे ? ( महानंदा गप्प )... सांग की !

महानंदा : मामांचे भाचे.

दमयंती : बास, इतकंच ?

[ महानंदा बोलत नाही. ]

महानंदा : एवढ्यात बस आहे...

दमयंती : मघाशी माझ्या खोलीत काय करत होतीस ?

महानंदा : तयारी.

दमयंती : जायचंय कुठं ?

महानंदा : हो.

दमयंती : कुठं ?

[ महानंदा गप्प. दुरून फटफटीचा आवाज येतो. ]

दमयंती : मनूकाका येताहेत वाटतं.

[ फटफटीचा आवाज दूर जातो. ]

महानंदा : सुटले. ( बाहेर बघते. ) दमयंती, तो लखोबाच ना ?

दमयंती : ( जागेवरून न हलता ) असेल, नाहीतर नसेल.

महानंदा : लखोबाच दिसतोय. मागून ते येताहेत...दमयंती, पुढं जाऊन बोलावतेस त्यांना ?

दमयंती : काही अडलं नाहीए. मी नाही जाणार. ते 'येत नाही' असंच म्हणणार, मग कशाला—

[महानंदेचे लक्ष नाही. तो लखोबा दुरून येतोय तिकडेच बघतेय.]

महानंदा : मी जाते पुढे आणि—

दमयंती : काही जाऊ नकोस.

[ महानंदा क्षणभर थांबते. मग एकदम पुढे धावत जाते. ]

महानंदा : लखोबा, ए लखो-थांबा रे.

[ महानंदा आणि बाबूलचे बोलणे ऐकू येते. ]

महानंदा : येणार घरी ?

बाबूल : मला विचारलंस ?

महानंदा : तीन दिवस झाले, सारखी बोलावतेय.

बाबूल : आलो नाही याचा अर्थ नाही कळला ?

महानंदा : अर्थ कळला तरी बोलवायला आले, याचा अर्थ नाही कळला ? तुम्ही आला नाहीत तर जीव जाईल हो माझा. तुमच्या पाया पडते. फक्त एकदाच, शेवटचं बोलावतेय.

लखोबा : धाकले धनी, तुम्हांला जायलाच हवं.

[ महानंदा येते. मागून बाबूल. लखोबा सामान ठेवून दूर उभा राहातो. बाबूल गंभीर. दमयंती काहीशा रागाने बघतेय. ]

महानंदा : आत येताय ?

बाबूल : नको. इथंच बरंय.

महानंदा : दमयंती, चहा ठेव पटकन.

बाबूल : नको.

महानंदा : काही खाणार ?

बाबूल : छेः !

महानंदा : खरवस आवडतो तो ठेवलाय तुमच्यासाठी. दमयंती—

[ दमयंती रागाने आत जाते. ]

बाबूल : मला काही नकोय.

महानंदा : हिचं नाव दमयंतीच ठेवलं.

बाबूल : हं !

महानंदा : आपलं ठरलं होतं तेव्हा. ( बाबूल गप्पच ) हल्ली कुठं असता ?

बाबूल : जळगावला.

महानंदा : काय करून बसलात तब्येतीचं ?

बाबूल : जाऊ दे. काय करायचंय विचार करून ?

महानंदा : मध्ये छातीचा विकार झाला होता ना ?

बाबूल : हं !.. कुणी सांगितलं ?

महानंदा : मामांकडून कळलं होतं.

बाबूल : होईना विकार.

महानंदा : असं का बोलताय ?

बाबूल : वाटतं तेच बोललो. खरं.

महानंदा : आलात, खूप बरं वाटलं जीवाला.

बाबूल : खोटं !

महानंदा : वाटतं तेच बोलले. खरं.

बाबूल : निघू आता ?

महानंदा : का ?

बाबूल : उगाच प्रश्न विचारू नकोस. तुला सगळं माहीत आहे.

महानंदा : ( डोळ्यांत पाणी ) मला माहीतच आहे, फक्त तुम्हांलाच काही माहीत नाहीए.

बाबूल : शक्य आहे. तेव्हासुद्धा मला काही माहीत नव्हतं.

महानंदा : काय ?

बाबूल : मला भेटायच्या आधी तुला दिवस गेले होते ! तू मला फसवलंस.

[ महानंदाला दुःखाचा वेग असह्य होतो. मागून फटफटी गेल्याचा आवाज येतो. जातो. ]

बाबूल : तुमच्या जातीत गोड बोलण्याची, नाटक करण्याची प्रथा असते, मला ठाऊक नव्हतं. मी फशी पडलो. आज वीस वर्षे हे दुःख मनाशी जपलं. त्या दुःखानं माझं सगळं आयुष्य, सगळी उमेद गिळून टाकली. हौस, रसिकता, रुची ... काही शिल्लक ठेवलं नाही त्यानं. हा असा एकटा भुतासारखा जगतोय. मरणाची वाट पाहात बसायला, सर्वस्वाच्या होमाचा शेक घ्यायला. कशासाठी ? तर खुळ्यासारखा तुझ्या प्रेमात पडलो म्हणून. एका गरोदर बाईच्या प्रेमात.

महानंदा : खोटं...सगळं, सगळं कुभांड. ( रडू लागते. )

बाबूल : बोलताना रडलं म्हणजे खरी गोष्ट खोटी ठरत नाही. या एवढ्या वर्षांत माझे सगळे अश्रू आटले आहेत. दुसऱ्याचे दोनचार अश्रू बघून माझं मन हलत नाही आता.

महानंदा : नाही हो. असं बोलू नका.

[ इतक्यात आतून वेड्यासारखी एक किंकाळी ऐकू येते. ]

बाबूल : आवाज कसला ?

महानंदा : काही नाही.

[ स्तब्धता ]

बाबूल : एकंदरीत ठीक आहेस ना ?

महानंदा : मी ? माझं काय राहिलंय आता ?

बाबूल : देवाची सेवा करावी. दारी येईल त्याच्याशी गोड बोलण्याचं नाटक करावं. मग त्याची सेवा करावी—

महानंदा : याच गोष्टीचं बोचकं घेऊन तर जन्माला आले. तुमची भेट झाली, बोचकं फेकून तुमच्याबरोबर चांगला संसार करावा म्हटलं, तर देवाच्या नावानं सगळ्यांनी गळा कापला माझा. माझा आणि तुमचा देखील.

बाबूल : सगळ्यांनी म्हणजे कुणी ?

महानंदा : ऐकणार आहात माझं, की आपलंच सांगत सुटणार आहात ? कुणासाठी तरी आपण झुरून झुरून झिजत आहोत याचंच कौतुक वाटतंय तुम्हांला. यातच मोठेपणा धरून चालताहा... माझं काय झालं, मी कशी, का, कशासाठी जगलेय याचं तुम्हांला सोयरसुतकच नाहीए. मामीकडे चार दिवस आहात. निरोपावर निरोप पाठवले पण इथं क्षणभर यायलासुद्धा वेळ नाही तुम्हांला ? कशाला असावा ? संबंधच काय माझा ? नाही का ?

बाबूल : ( गोंधळतो ) अं ?

महानंदा : आत्तादेखील धरून आणलंय तुम्हांला. पाया पडून. मिनतवारी करून. माझंसुद्धा तुम्ही ऐकलं पाहिजे. प्रेमकहाणी दोघांना कळली नाही तर त्या कहाणीलासुद्धा वाईट वाटतं.

बाबूल : बोल. बोल महानंदा.

महानंदा : मानू म्हणा पूर्वीसारखं... म्हणा ना.

बाबूल : मानू.

महानंदा : ( खूप सुखानं ) पुन्हा म्हणा.

बाबूल : कशाला ?

महानंदा : अखेरचा श्वास घेताना हीच हाक आठवावी म्हणून.

बाबूल : मानू...मानू—

महानंदा : बोलले मघाशी, ते विसरून जा. मला क्षमा करा. मी दासी आहे तुमची. मला तो अधिकार नाही. ( रडते. ) तो कधीच नव्हता, पण तुम्ही आशा लावलीत तेव्हा...दासीची राणी होणार होती.

बाबूल : रडू नकोस मानू. तुझा गळा कुणी कापला ते सांगते आहेस ना ?

महानंदा : त्या कैदाशिणीनं आणि तुमच्या मामांनी.

बाबूल : कोण कैदाशीण ?

**महानंदा :** ती माझी आई. देवाच्या नावाखाली वेसवा झालेली.

**बाबूल :** कल्याणी ?

**महानंदा :** हं ! आपण लग्न केलं तर तुमचा सत्यानाश होईल म्हणून सगळ्यांनी माझा गळा कापला. त्यांना साथ त्या सापांची. रेग्याची आणि सोमजीमास्तरची.

**बाबूल :** सोमजी ? त्यानं काय केलं ?

**महानंदा :** मला न्यायला येतो म्हणून तुम्ही लखोबाच्या नावावर पत्र पाठवलंत. ते त्यानं फोडून वाचलं. ऐन वेळी आईला सावध केलं. तुम्ही यायच्या अगोदर मामा आणि लखोबा मला घेऊन पिंगुळीला गेले मावशीकडे. तुम्ही आलात हे कळलं त्याच क्षणी—

**बाबूल :** मला संशय आला होता, पण तेवढ्यात कल्याणी बोलली—

**महानंदा :** मला पाच महिने गेलेत. खोटं बोलली ही रांड देवाच्या नावानं, दिवाळी झाल्यावर तुम्ही गेलात आणि ही सांगायला लागली, बाबूल यायचा नाय आता, हरामी जात आहे त्याची.

**बाबूल :** म्हणाली, जत्रेच्या रात्री तुला घेरी आली होती ती—

**महानंदा :** त्या सुखाच्या क्षणी सुचलेल्या नाटकावर मी इतकी खूश होते... वाटलं नव्हतं, हेच नाटक आपल्यावर असं उलटेल. तुम्ही तेव्हाचे स्पर्श आठवले असते, तरी तुम्हांला कळलं असतं, ते शिळे नव्हते.

**बाबूल :** त्यानंतर जरी तू मला पत्र टाकलं असतंस—

**महानंदा :** टाकलं होतं. खरंच टाकलं होतं. तुम्हांला मिळालं नाही ना ते ? म्हणजे ! ते पत्र देखील सोमजीमास्तरानं उघडलं आणि फाडून टाकलं. मी समजत होते— ( कपाळावर खोक दाखवते ) ही खोक पाहिलीत ?

**बाबूल :** कसली खोक ?

**महानंदा :** दुसऱ्या दिवशी पिंगुळीहून पळाले मी. मावशीनं खोलीत कोंडलं होतं. खिडकीतून उडी मारून मी बाहेर पडले. एवढं अंतर पाय तुटेपर्यंत चालले. वाटत होतं, तुम्ही थांबले असाल. आई म्हणाली, तुम्ही गेलात. काहीसुद्धा वाटून न घेता मजेत गेलात. खिडकीतून शरीर फेकलं तेव्हाची ही जखम आहे. या जखमेत आपली प्रेमकहाणी भरलेली आहे. चिरंतन समाधानाची ही जखम आहे. दिसली की ते मोरपिसाचे दिवस डोलायला लागतात. सारा इतिहास असा ललाटी कोरलाय... माझ्या लहानश्या गौरवाचं चिन्ह आहे हे. ( तोंडात पदर कोंबते. )

[ स्तब्धता ]

महानंदा : मग... मग एकेक कळलं. कैदाशिणीकडून. रागानं तिचं डोकं मी भिंतीवर आपटलं, पण मेली नाही कुत्री.

बाबूल : आता कुठं आहे ती?

महानंदा : बघायची आहे?... बघा ना. (कमरेची किल्ली काढते. तिच्या खोलीकडे जाते.)

बाबुल : तुझ्या खोलीत?

महानंदा : ही खोली तेव्हाच बंद केली मी. म्हटलं, हिला तरी माझी परवड दिसायला नको. खोलीत फक्त अडगळ आहे. सामानाची आणि कैदाशिणीचीसुद्धा. जन्मभर देवाचं नाव घेत होती. आता मजेत आहे. ना कशाचा खेद, ना खंत! बघा तर देवाची भावीण! (दार उघडते.)

बाबूल : नको .. काय बोलू तिच्याशी?

महानंदा : तीच बोलेल तुमच्याशी. तुम्ही नुसते ऐका.

[ दोघे दाराशी जातात. महानंदा दार उघडते. रंगमंच फिरतो. आता आतली खोली दिसते. वेडी झालेली कल्याणी जुन्या सतरंजीवर बसलेली दिसते. अंगावर फाटके कपडे. ]

बाबूल : कल्याणी—

कल्याणी : कोण? मामा? उद्या तुमचा लगीन... नाय नाय भाविणीक लगीन नको. भावणीनं तसाच रवक होया सेवा करत. थुत! मी लग्नाक येव? कुठची कोग पोर तुमचो संसार करतली उद्यापासून, आणि मी? (हसते.) बाजार मांडून बसलंय मी!

महानंदा : तेच केलंस जन्मभर. आता मर.

कल्याणी : चंद्रे, तुझ्या यमन्याचो घोव मेलो गो? (हसते.) अगो, सुंद्रीचो घोवपण मराक टेकलो. देवाचो कोप नायतर? (हसते.) मी नाय तर नाय लगीन व्हाऊक आणि... आणि मानू लगीन न्हाली तर काय मी भीक मागां? (बाबूलचे पाय धरते. त्याला ओळखत नाही.) दादा, निदान रावताकडली दोन भजी दी रे हाडून—

महानंदा : जा आता नरकात.

[ महानंदा कल्याणीला ढकलते. दार लावून घेते. दोघे बाहेर जाऊ

लागतात. रंगमंच फिरतो. ]

**महानंदा** : पाहिलीत कुत्रीला ? ठार वेडी झालीय. कधी कधी अंगावर चिंधीसुद्धा ठेवत नाही.

**बाबूल** : काय दशा झालीय भयंकर !

**महानंदा** : मरेना. नरकात जागा झाली की येईल वरून पत्र. तुमच्या–माझ्या आयुष्याला काडी लावली ... मनाशी स्वप्नं बाळगली होती संसाराची, मुलाबाळांची. दिवाळी आली की काही सुचेनासं होतं. घरात एकसुद्धा पणती नको वाटते. या पणत्या, रांगोळ्या मला खिजवतात हो—

**बाबूल** : हं !

[ स्तब्धता ]

**महानंदा** : एक सांगाल ?

**बाबूल** : काय ?

**महानंदा** : तुम्ही देवाला कौल लावला होता, तो खरंच होकारी आला होता ?

[ बाबूल उत्तर देत नाही. दमयंती आतून येते. ]

[ स्तब्धता ]

**महानंदा** : एरवी काजऱ्याचं बी खाऊन जीव दिला असता. पण ही तुमची पोर पोटात होती—

**बाबूल** : ( दारात उभ्या असलेल्या दमयंतीकडे बघत ) ही ... ही—

**महानंदा** : काय बघता ? रूप सांगत नाही पोरीचं ? ( डोळे टिपते. ) दमयंती, कळलं ना ? तुझ्या बाबांची वाट बघत होते मी. मला तुमच्याकडून काही हवं, माझी दया यावी म्हणून सांगितलं नाही हे. सांगितलं, माझ्यावर डाग नको म्हणून. मी फसवलं नाही तुम्हांला. उलट तुमच्या आठवणींनी आणि या पोरीसाठी जगलेय. कशी जगते ते रवळनाथाला माहीत. तुम्ही जुनी हाक दिलीत, मी सगळं पावले.

[ स्तब्धता ]

**महानंदा** : कुठं जत्रेला जात नाही, देवाच्या पालखीला जात नाही.

**बाबूल** : का ?

**महानंदा** : काय केलंय देवानं माझ्यासाठी ? एक तुम्हांला कौल दिला, तोसुद्धा खोटाच ठरला अखेरीला.

बाबूल : दमयंती काय करते ?

महानंदा : एसेस्सी झाली गुदस्ता.

बाबूल : आता पुढं ?

महानंदा : जाईल आपल्या आईच्या वळणानं.

बाबूल : पण—

महानंदा : नाही नाही म्हणताना तिची आई गेलीच ना आपल्या आईच्या वळणानं ?

बाबूल : पण दमयंती—

महानंदा : कुठं मास्तरणीची नोकरी मिळाली तिला तर बघायचं. इथं न राहील तर बरं. देवाच्या कृपेनं आयुष्य नासण्यापेक्षा—

बाबूल : मानू, दमयंती–तुम्ही दोघी चला माझ्याबरोबर.

महानंदा : कुठं ?

बाबूल : जळगावला. तेव्हाची नशिबाची चूक दुरुस्त करू आता आपण.

महानंदा : नाही. नाही. आता उशीर झालाय. कुणाच्या घरात जाऊन राहाण्या-इतकी मी पवित्र राहिलेली नाहीए. इतकी वर्षं पापाच्या चिखलात राहिले. आता सोबत फक्त त्या चिखलाचीच.

बाबूल : नाही ... नाही.

महानंदा : तुम्ही नाही म्हणून ते पापाचे डाग धुतले जाणार नाहीत.

बाबूल : मी त्यांचा विचारसुद्धा करणार नाही.

महानंदा : पण माझं काय ? तुमच्या पवित्र घरात तर मला पापाची जाणीव सतत होत राहील. हातून घडलेली पापं मला छळत राहातील आणि तुम्हांला ताप देत राहातील. कुणी माझ्याबद्दल विचारलं, की तुम्ही संकोचणार. मी संकोचणार.

बाबूल : मानू, मी कुणाची पर्वा करणार नाही.

महानंदा : आपण पर्वा करतो की नाही याची दुनियेला थोडीच पर्वा असते ? तुम्ही मला, एका कलंकिनीला हा प्रश्न विचारलात तेवढे देखील जन्मभर पुरेल मला. नाही नाही. हा विचार मनात आणू नका. तुम्ही लाख वेळा सांगितलं तरी मी येणार नाही. मी येऊ नये हेच हिताचं ठरणार आहे, माझ्या आणि तुमच्यासुद्धा.

बाबूल : मग मी आपल्या मुलीला तरी नेतो. दमयंतीला. तिचं मी कॉलेजात नाव घालतो. खूप शिकवतो तिला.

महानंदा : खरंच ?

बाबूल : खरंच.

महानंदा : हिचं तरी लग्न होऊ दे. (डोळयांत पाणी)

[दमयंती आत पळते. बाबूल महानंदेजवळ जातो. महानंदा दूर सरकते.]

बाबूल : मानू–

महानंदा : नको.

बाबूल : का ?

महानंदा : आठवणी आहेत त्या खूप झाल्या दासीला.

बाबूल : रागावू नकोस मानू, आपल्या कर्माचा हा जुगार आहे. (पुढं होतो.)

महानंदा : (मागे जात) नको. उष्ट्या पानावर तुम्हांला बसवू ?

बाबूल : उष्ट्या–

महानंदा : तुमच्या मुलीला जपून ठेवलीय ते बघा. माझं झालं. आता मरणाच्या वाटेला लागायला मी मोकळी झाले.

[बाबूल तिथेच थबकतो.]

बाबूल : मानू. मी अजून एकनिष्ठ–

महानंदा : तुमचं ठीक आहे. पेजेची चिंता नाहीए तुम्हाला. इथं पेजेला देणार तो शेजेला घेणार.

[स्तब्धता]

महानंदा : (हाक मारते.) दमयंती– (दमयंती येते.) पाया पड यांच्या. (दमयंती बाबूलच्या पाया पडते. बाबूल तिला जवळ घेतो.) पोरी, कळलं आता ? मी जायची तयारी करत होते, ती तुझी. मनात खात्री होती, ऐकून घेतलंत सारं, तर आपण होऊन पोरीला न्यायचं म्हणाल. खऱ्या रक्ताला नातं तोडता येत नाही.

दमयंती : मी आत्ताच जायचं ?

महानंदा : हो आत्ताच. (डोळयांत पाणी दाटलेलं) अग, तेव्हाच त्या दिवाळीला यांच्याबरोबर गेले असते तर हे भोग चुकले असते. पुण्याची गोष्ट लगेच करावी, नाहीतर पापांच्या राशी वाढत राहातात.

बाबूल : (गहिवरून) तुझा गुरुनाथ आलाच नाही बघ जन्माला.

[ महानंदेला दुःख असह्य होते. ]

**महानंदा :** आता निघा. बस यायची वेळ झालीय. दमयंती, बॅग आण तुझी... नाहीतर थांब.

[ महानंदा आत जाते. ]

**बाबूल :** दमयंती– ( दमयंती गप्पच ) दमयंती, पोरी–

**दमयंती :** ( कोरडेपणाने ) काय ?

**बाबूल :** तुझ्या मनात यायचं नाहीए का माझ्याबरोबर ? ( दमयंती गप्पच. ) नाही यायचं. खरं ना ?

[ बाबूल दमयंतीला घेऊन येतो. ]

**बाबूल :** परवा देवळात तुला पाह्यलं, तेव्हाच मला तू—

**दमयंती :** खोटं. तुम्ही रागावला होता तेव्हा.

**बाबूल :** तो तुझ्या आईवर.

**दमयंती :** मला सगळं कळलंय आता.

**बाबूल :** सगळं म्हणजे ?

**दमयंती :** आईचं मुळीच चुकलं नव्हतं.

**बाबूल :** ( कौतुकानं ) केवढा आईचा कड !

**दमयंती :** मग ? घेणारच मी.

**बाबूल :** ( हसत ) पोरी, तुझ्या आईचं चुकलं नव्हतं हे मला आत्ता कळलं. इतक्या वर्षांनी. मधली तरुणपणाची वर्षे एकटेपणाच्या वाळवंटावरून चालत काढली. खरा चिडलो होतो देवावरच.

**दमयंती :** मग ' आईवर ' का म्हणता ?

**बाबूल :** तो परवा. त्या क्षणीच फक्त. पोरी, मानूवर चिडलो असतो, तर दुसऱ्या कुणाशी लग्न नसतं केलं ? सगळी हौस, सगळा उत्साह असा वाळवंटावर ओतत राहिलो. दूरचं म्हातारपण अवेळी जवळ केलं. मानू इकडे झिजत राहिली, मी तिकडे. मानूच्या सोबतीला आमची दमयंती तरी होती. तुला माहीत आहे ? दमयंती हे नाव मीच ठरवलं होतं. तुझ्या जन्माआधीच. दमयंती आणि दुसरा गुरुनाथ.

**दमयंती :** गुरुनाथ कोण ?

**बाबूल :** तुझा भाऊ असता तो. ( आवंढा गिळतो. ) संसाराची किती हौस होती

आम्हांला. छोटी रांगणारी, धडपडणारी दमयंती पाहायलाच मिळाली नाही मला. तुझे लाड करायचे राहूनच गेले बघ. आता त्यांची भरपाई करायची आहे मला. तुला खूप शिकवणार. तुझी इच्छा आहे ना शिकायची ?

**दमयंती** : मग ? मला प्रोफेसर व्हायचंच.

**बाबूल** : ( खूप आनंदानं ) होणार तू. नक्की होणार. पोरी, बघ ना. माझीच आवड तू मनात बाळगली होतीस. माझीच दमयंती ना तू ? खूप शीक, हुशार हो.

[ दमयंती विचारात पडते. दूर होते. बाबूल दचकतो. ]

**बाबूल** : तू येणार नाहीएस माझ्याबरोबर ? इतकी वर्षं आईला सोबत दिलीस. आता बाप विनंती करतोय. अग, आमच्या दोघांचा सारखाच हक्क आहे तुझ्यावर.

**दमयंती** : आई नाही येणार आपल्याबरोबर ?

**बाबूल** : आली असती तर त्यासारखा दुसरा आनंद नव्हता. पण ऐकलंस ना, ती नाहीच म्हणतेय. माझं ऐक. इथं राहिलीस तर आयुष्य वाया जाईल तुझं. माझ्या पोरीचं आयुष्य मी उघड्या डोळ्यांनी–बोल ग काहीतरी. यायचं नसेल तर नको येऊस. माझ्या मुलीच्या मनाविरुद्ध मी वागणार नाही. इतकी वर्षं एकटा राहिलो, उरलेली वर्षं जातील तशीच. दुर्दैवाच्या सोबतीनं. नाही, नाही, मनापासून बोलतोय मी. खरंच. हवं तर मानूला सांगतो. ( हाक मारतो. ) मानू—

[ दमयंती धावत जाऊन बाबूलला मिठी मारते. तो तिला कुशीत घेतो. ]

**बाबूल** : रागावलीस ?

**दमयंती** : अंहं ! मी येतेय तुमच्याबरोबर.

[ दरम्यान महानंदा आतून बॅग घेऊन येते. तिच्या अंगावर जुनी शाल. ]

**महानंदा** : ( बाबूलला ) तब्येतीला जपायचं हं. ( पुढे बोलता येत नाही. )

**बाबूल** : मानू–( त्यालाही बोलता येत नाही. )

**बाबूल** : आत ही शाल आणण्यासाठी गेली होतीस ?

**महानंदा** : हो ! त्या सुखाच्या क्षणी ही शाल भेटली. नंतर बिचारी बघत राहिली माझी दुःखच. तिला हा आनंदाचा क्षण दाखवायला नको ?

[ बाबूल तिच्या अंगावरली शाल बघतो. शाल खूप जुनी झालीय. शाल नीट करतो. मग खिशातून शंभराची नोट काढून महानंदेला देतो. ]

बाबूल : घे. नेमानं पाठवीन आता. स्वतःला जप.

महानंदा : नको. मला तुमच्याकडून आता काहीच नकोय. मिळालं तेच भरपूर आहे. आता जे करायचं ते तुमच्या लेकीला करा.

[ दमयंती पर्स घेऊन येते. ]

महानंदा : पोरी, हातानं चांगलंचुंगलं जेवण करून वाढायचं यांना. तिखटापेक्षा गोड आवडतं. खरवस करायला मिळाला कधी तर जरूर कर. त्यावर भारी भक्ती आहे.

दमयंती : हो.

महानंदा : आगि हो, आणि यांना हाक काय मारशील ?

दमयंती : बाबा !

महानंदा : बाबा ! यांना बाबा म्हणायचं. ' आई कुठंय ' म्हणून कुणी विचारलं, तर ' लहानपणी मेली ' म्हणून सांग. नाताळात. ( तोंडात पदर कोंबते. ) दमयंती जाऊ लागते. महानंदा पिशवी घेऊन येते. ही पिशवी राहिलीय तुझी.

[ बाबूल पिशवी बघतो. ]

बाबूल : काय आहे पिशवीत ?

महानंदा : डबे आहेत. एक फराळाचा, प्रवासात.

बाबूल : आणि हा डबा ? ( महानंदा गप्पच. )

[ बाबूल डबा उघडतो. काचेची तोरणे दिसतात ती काढतो डोळयांतून अश्रू वाहातात. ]

महानंदा : आपलं ठरलं नव्हतं का तेव्हा—( पुढे बोलताच येत नाही. )

[ महानंदा पुढल्या बाजूला जाते. ]

महानंदा : लखो, अरे निघा रे लौकर—आणखी थांबलात तर या समाधाना कोसळेन मी. ( घंटांचा आवाज ऐकू येतो. ) खळनाथाची हाक ऐकू येतेय. त्याची निंदाच करत होते मी, पण तो रागावला नाहीए. मला प्रेमानं साद घालतोय.

काळोख.

म. ग्रं. ... ग्रंथालय ठाणे.
वा. क्र. ९००६६ दि. २३/९/८२
वि. ...ना/८५

IRBK-0119066

IRBK-0119066